रविवार, २० ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी


विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 20 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-24 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

महत्त्वाची बातमी

## प्रियंका गांधी मोदींविरोधात लढणार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये ( २०१४ आणि २०१९ ) उत्तर प्रदेशमधल्या वाराणसी मतदारसंघातून निवडणूक लढत आहेत. आगामी लोकसभा निवडणूकही पंतप्रधान याच मतदारसंघातून लढण्याची शक्यता आहे. तसेच नरेंद्र मोदींना वाराणसीत काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी टक्कर देऊ शकतात. शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी यासंबंधी वक्तव्य केले आहे. प्रियांका गांधी वाराणसीतून लोकसभा निवडणूक लढतील आणि जिंकतील असा विश्वास चतुर्वेदी यांनी व्यक्त केला आहे. प्रियांका गांधी निवडून याव्यात यासाठी इंडिया आघाडी प्रयत्न करेल असंही चतुर्वेदी म्हणाल्या. ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी म्हणाल्या, आम्ही सगळे ( इंडिया आघाडी ) फ्रंट फूटवर खेळतोय. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संसदेपासून ते लाल किल्ल्यावरील भाषणापर्यंत सगळीकडेच केवळ इंडिया आघाडीवर टीका करत आहेत.आम्ही सध्या २६ पक्ष एकत्र आलो आहोत. या २६ पक्षांचे जितके आमदार-खासदार आहेत त्या प्रमाणात मतदार आहेतखासदार चतुर्वेदी म्हणाल्या, प्रियांका गांधी या अमेठी, रायबरेली किंवा वाराणसीतून लोकसभा निवडणूक लढणार असतील तर मला वाटते वाराणसीतली जनता त्यांना साथ देईल. प्रियांका गांधी वाराणसीतून लोकसभा निवडणूक लढतील आणि जिंकतील.

# उगाच फडतूस ब्रेकिंग न्यूज चालवतात

## राज ठाकरे : पिंपरी-चिंचवड एडिटर्स गिल्डच्या वतीने पत्रकारांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : पूर्वी चुकीचे काही घडले की पत्रकार फटकारुन काढायचे, सळो की पळो करायचे, पण आता असे काही घडत नाही. उगाच फडतूस ब्रेकिंग न्यूज चालवतात. काय तर राज ठाकरे घरातून निघाले, असे म्हणत राज ठाकरेंनी पत्रकारांचा चिमटा काढला. पिंपरी-चिंचवड एडिटर्स गिल्ड आयोजित पत्रकार हल्ला विरोधी कायदा परिषदेत पत्रकार हक्कासाठी लढणाऱ्या राज्यातील पत्रकारांचा गौरव राज ठाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आकुर्डीतील ग.दि. माडगूळकर सभागृहात हा कार्यक्रम झाला. खासदार श्रीरंग बारणे, मनसेचे नेते अनिल शिदोरे, अमित ठाकरे, माजी नगरसेवक राहुल कलाटे आदी उपस्थित होते.**

महाराष्ट्रातील अस्थिर राजकारणावरुन राज ठाकरेंनी प्रश्नचिन्ह निर्माण केले. पंतप्रधान आठवडाभरपूर्वी काहीतरी बोलतात, त्याचे पडसाद उमटतात आणि काही दिवसांत अजित पवार थेट शपथविधी घेतात, त्यानंतर पत्रकार परिषदेत ते वाट्टेल ते बोलतात अन् पत्रकार तिथे हसतात, ही काय पत्रकारिता आहे का? असे म्हणत राज ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत पत्रकारांनाही चांगलेच खडसावले आहे. मुळात अजित पवार सत्तेत गेले याची चीड यायला हवी, असे म्हणत राज ठाकरेंनी पत्रकारांवरही रोष व्यक्त केला. राज ठाकरे यांनी पत्रकारांकडून दिल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्यांवरही भाष्य केले. तसेच त्यांनी पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबत चिंताही व्यक्त केली. यावेळी राज ठाकरे म्हणाले, हल्ला कुणावरही होऊ नये. पण हल्ला झाल्यावर जसा पत्रकारांना राग येतो, तसा आम्हालाही (राजकीय व्यक्तींना) राग येतो,असे राज ठाकरे म्हणाले. पुढे ते म्हणाले, पत्रकार मला म्हणतात, तुमच्या सभांना गर्दी होते, पण मते मिळत नाहीत. आता तुम्ही पत्रकार आहात, म्हणजे तुम्ही काय आमचे वाभाडे काढणार का? राज ठाकरे आहे मी, हे मी खपवून घेणार नाही. मी यावर व्यक्त होणारच.

**विनाकारण खोट्या बातम्या देणे चुकीचे**

पत्रकारांना उद्देशून राज ठाकरे पुढे म्हणाले, तुमचे काम आमचे डोळे उघडणे आहे. तुमचे काम आम्हाला चिमटे काढणे आहे. तुमचे काम प्रबोधन करणे आहे. जर समजा आम्ही काही चुकीची पावले टाकत असू तर आम्हाला सुधरवणे, हे तुमचे काम आहे. विनाकारण खोट्या बातम्या देणे चुकीचे आहे. नको त्या बातम्या करणाऱ्या पत्रकारांवर तुमची संघटना काय कारवाई करणार आहे का? हे सांगावे. बाकी इतर बाबतीत राज ठाकरे तुमच्यासोबत आहे.



महाराष्ट्रातील पत्रकारिता आजही जिवंत आहे. मीही पत्रकारितेत काम केले आहे. मार्मिकमध्ये ब्लॉक लावण्याचे काम केले. तिथपासून ते आतापर्यंतच्या वृत्तपत्राच्या छपाईपर्यंतचा प्रवास पाहिला आहे. पत्रकारिता पाहिली नाही. तर, अनुभवली आहे. पत्रकारितेतून राजकारणात आलो. आताची पत्रकारिता बघत आहे. पत्रकारिवेवरील हल्ले निषेधार्थ आहेत. ट्रोलिंगकडे लक्ष देऊ नका, मोबाईलमुळे अनेकजण व्यक्त व्हायला लागले आहेत. राजकीय पक्षांनी लोक पाळले आहेत. त्यावर कशाला प्रतिक्रिया देता. महाराष्ट्र हितावर निर्भीडपणे बोलावे, लिहावे. आज अनेक पत्रकार वाया गेले आहेत. तेच महत्त्वाच्या हुद्यावर बसले आहेत. पत्रकार मंत्र्यांकडे कामाला लागले आहेत. पूर्वी लपून-छपून करत होते. आता उघडपणे काम करत आहेत. हे लेबल लावलेले पत्रकार परिषदेत येतात आणि आम्हाला प्रश्न विचारतात. हे काय म्हटला आणि तो काय म्हटला असेच प्रश्न विचारत आहेत. राजकारणाचा स्तर, भाषा बदलली आहे. तुम्ही दाखवता म्हणून ते बोलतात. तुम्ही नाही दाखविल्यावर स्वच्छतागृहात बोलतील का, असेही ते म्हणाले.

# सप्टेंबर महिन्यात खगोलप्रेमींसाठी पर्वणी

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** ग्रहांप्रमाणेच सूर्यमालेचाच सदस्य असलेले धूमकेतू हे नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. सूर्याच्या भोवती लंबवर्तुळाकार प्रवास करणारे अनेक धूमकेतू असून ते ठराविक कालवधीनंतर सूर्याला वळसा घालत असतात. यापैकी काहीच धूमकेतू हे आत्तापर्यंत माहित झाले असून अनेक धूमकेतू अज्ञात आहेत, काही धूमकेतूंचे अस्तित्व तर सूर्याच्या जवळ जातांनाच लक्षात येते. यापैकीच एक धूमकेतू म्हणजे C/2023 P1 NISHIMURA. हा धूमकेतू सध्या पृथ्वीपासून दूर आहे. असं असलं तरी पृथ्वी ज्या कक्षेत सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते ती कक्षा ओलांडत त्याने सूर्याजवळून जाण्यासाठी प्रवास सुरु केला आहे. या धूमकेतूचा शोध जपानमधील हौशी खगोल अभ्यासक हिदेओ निशिमुरा यांनी काही दिवसांपूर्वीच म्हणजे ११ ऑगस्टला लावला. त्यांनी शोध लावला म्हणून त्यांच्या नावावरुन या धूमकेतूला C/2023 P1 NISHIMURA असे नाव आता देण्यात आले आहे. तेव्हा आता जगभरातून या नव्या धूमकेतू बद्दल निरिक्षणे सुरु झाली आहेत. याचा नेमका आकार अजुनही समजू शकलेला नाही. सूर्याच्या जवळ जात असल्याने उष्णतेमुळे या धूमकेतूच्या शेपटाचा पसारा आणखी वाढणार आहे. सध्या खगोलीय दुर्बिणीतून हा धूमकेतू न्याहाळता येत आहे. येत्या ११ सप्टेंबरला तो पृथ्वीपासून सर्वात जवळच्या अंतरावर असेल आणि सूर्योदयापूर्वी पूर्व क्षितीजावर हा धूमकेतू साध्या डोळ्यांनीही बघता येईल. त्यानंतर पुढील साधारण दोन दिवस त्याचे दर्शन होईल आणि मग दुर्बिणीतूनच त्याला बघता येईल.

# अजित पवारांची बीडमध्ये सभा होणारच

## धनंजय मुंडे यांची ट्विटरवर माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शरद पवारांच्या बीड जिल्ह्यातील सभेला प्रत्युत्तर देण्यासाठी अजित पवार यांची होणारी सभा रद्द होणार, अशा चर्चा होत्या. पण मंत्री धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांची सभा होणार असल्याची माहिती दिली आहे. धनंजय मुंडे यांनी ट्वीट करत अजित पवार यांची बीडमध्ये 27 ऑगस्ट रोजी उत्तर सभा होणार असल्याची माहिती दिली आहे. बीडमधील सभेमध्ये शरद पवारांनी धनंजय मुंडे आणि अमरसिंह मुंडे या अजित पवरांच्या गटातील नेत्यांवर जोरदार टीका केली होती. 27 तारखेला होणाऱ्या उत्तर सभेतून धनजंय मुंडे अथवा अजित पवार काय उत्तर देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड येथे 27 ऑगस्ट रोजी जाहीर सभा होणार असून या सभेला उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. ही सभा रद्द झाल्याबाबत माध्यमांवर येणाऱ्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या असून माध्यम प्रतिनिधींनी कृपया खात्री केल्याशिवाय सभेबद्दल अशा चुकीच्या व निराधार बातम्या देऊ नयेत, ही विनंती, असे ट्वीट धनंजय मुंडे यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांची बीडला सभा झाल्यानंतर त्याला उत्तर देणारी उत्तर सभा ही बीड शहरातील मल्टीपर्पज ग्राउंडवर होणार आहे. ही सभा होणार नसल्याची चर्चा सकाळपासून सुरू आहे. मात्र या संदर्भामध्ये धनंजय मुंडे यांनी सभा होणारच, अशी भूमिका जाहीर केल्यानंतर बीडचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी सुद्धा बीडमध्ये नियोजित सभा होणारच असल्याचे सांगितले आहे. या सभेला मंत्रिमंडळातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नऊ मंत्री येणार असल्याचेही चव्हाण यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी 27 तारखेला सभा होणार आहे, अशी माहिती दिली आहे.

# उद्योगपती रतन टाटा यांना पहिला उद्योगरत्न पुरस्कार प्रदान


## २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र

आधुनिक केसरी न्यूज



मुंबई : उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी प्रदान करण्यात आला. टाटा यांना त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार प्रदान केला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, टाटा सन्सचे चेअरमन तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते. तत्पूर्वी रतन टाटा यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी टाटा यांच्यासमवेत चंद्रशेखरन आदींशी उद्योग आणि राज्यातील विकास प्रकल्पांविषयी चर्चा केली.

'टाटा म्हणजे ट्रस्ट. टाटा म्हणजे विश्वास अशी जगभर ख्याती असलेल्या उद्योग समूहाचे रतन टाटा यांना हा पुरस्कार देण्याने पुरस्काराचा सन्मान वाढला आहे,'असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरस्कार प्रदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. 'मीठापासून ते वाहने, विमानांपर्यंत टाटा समूहाच्या उद्योगातून निर्मिती होते. टाटा समुहाने देशासह, जगभरात उद्योग क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. टाटा म्हणजेच विश्वास हे नाते आहे. राज्य शासनातर्फे उद्योग क्षेत्रातील योग्य व्यक्तीला पहिला पुरस्कार देण्यात येत असल्याचा आनंद आहे. या पुरस्काराने पुरस्काराचा मानसन्मान वाढला, उंची वाढल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराच्या धर्तीवर या वर्षीपासून राज्य शासनाने 'महाराष्ट्र उद्योग पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. यात उद्योगरत्न पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक पद्मविभूषण रतन टाटा, उद्योगमित्र पुरस्कार सिरम इन्स्टिट्यूटचे अदर पुनावाला यांना तर उद्योगिनी पुरस्कार किर्लोस्कर समूहाच्या गौरी किर्लोस्कर, उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार विलास शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे. हे पुरस्कार उद्या रविवारी (दि.20) समारंभपूर्वक राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. हा समारंभ वांद्रे-कुर्ला संकुलमधील जीओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधील जास्मिन हॉलमध्ये दुपारी दोन वाजता होणार आहे. 'उद्योगमित्र' पुरस्काराचे स्वरूप 15 लाख, सन्मानचिन्ह व मानपत्र, 'उद्योगिनी' पुरस्काराचे स्वरूप 5 लाख, सन्मानचिन्ह व मानपत्र तर 'उत्कृष्ट मराठी उद्योजक' पुरस्काराचे स्वरूप 5 लाख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्यांनी असे अनेक प्रकारचे पारंपरिक बियाणे जपून ठेवायला सुरुवात केली. त्याची लागवड करून ते वाढवलं. एवढंच नाही तर लोकांनाही ते द्यायला सुरुवात केली.' 'पण आई, गावरान किंवा देशी पारंपरिक बियाणं म्हणजे ते हेच का ?' राजेशने विचारले. 'हो राजेश, बरोबर आहे. असं बियाणं म्हणजे शेतात स्वतः पिकवलेल्या धान्यातील काही भाग बाजूला काढून ठेवून ते पुढील वर्षासाठी वापरणे. पूर्वीच्या काळी शेतकरी असेच करत असत. त्यांच्या शेतात उत्पन्न होणाऱ्या पिकातील उत्तम भाग बियाण्यांच्या स्वरूपात ते राखून ठेवत असत. त्याचाच वापर पुढील वर्षासाठी करत असत. पण काही वर्षांपूर्वी जेव्हा आपल्या देशात अन्नधान्याची टंचाई होती तेव्हा झालेल्या नवीन संशोधनात जास्त उत्पन्न देणाऱ्या संकरित बियाण्याचा शोध लागला. शेतकरी जास्त उत्पादनासाठी त्याचाच वापर करू लागले. अन्नधान्याच्या बाबतीत त्यामुळं आपला देश स्वयंपूर्ण झाला खरा पण शेतजमिनीचा कस मात्र कमी होत गेला. या संकरित धान्यातील पोषणमूल्ये सुद्धा कमी झाली. शिवाय आजारांचे प्रमाण वाढले. लोकांची प्रतिक्रारशक्ती कमी झाली.

'या राहीबाईंना बीजमाता असे म्हटले जाते. त्यांच्या प्रयत्नातूनच अहमदनगर जिल्ह्यातील कोंभळणे गावी पहिल्या बीज बँकेची स्थापना झाली. आता या गावातील अनेक महिला या अभियानात सामील झाल्या आहेत. संकरित बियाण्यांविरुद्ध त्यांनी 'बीज स्वातंत्र्य' नावाची मोहीम सुरु केली आहे. त्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रकारच्या डाळी, तांदूळ, भाजीपाला, औषधी वनस्पती आणि अन्य पिकांचे सुमारे २०० पेक्षा अधिक प्रकारचे बियाणे जतन करीत आहेत. त्या सगळ्यांच्या प्रयत्नाने या गावाला एक प्रकारची राष्ट्रीय ओळख मिळाली आहे.' श्यामलाताई म्हणाल्या. पिंकी म्हणाली, 'असे प्रयत्न इतर ठिकाणी झाले नाहीत का ? खरे तर अशा प्रयत्नांना सगळ्यांचा पाठिंबा मिळाला पाहिजे.'' बरोबर आहे पिंकी. असे प्रयत्न अन्य काही ठिकाणी झाले आणि होत आहेत. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या प्रयत्नात अशिक्षित लोकांचा सहभाग मोठा आहे. ते शिकलेले नसलेले तरी या गोष्टींची उपजतच जाण त्यांच्यामध्ये आहे. ओडिशातील कंधमाल जिल्ह्यातील आदीवासी महिला अशा स्वदेशी पारंपरिक वाणाचे जतन करीत आहेत. मध्यप्रदेशातील बालाघाट, प. बंगालमधील झारग्राम तसेच राजस्थानातील बांसवाडा जिल्ह्यात अशा प्रकारच्या बियाण्यांची साठवण काही व्यक्ती आणि कुटुंबियांकडून केली जाते.' श्यामलाताई म्हणाल्या.



## समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## साठवणीतील आठवणी विसरता येत नाहीत

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडलंय, हे आपल्याला माहिती असतंच किंवा ते कालांतरानं माहिती होतंच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणं हे नेहमीच उपयोगाचं ठरतं असं नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचं नुसतं ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचं सोनं करण्याचं भान आपल्याला असणं आवश्यक असतं. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. काहीवेळा नकारात्मक विचार आपल्या अंतर्मनांत थैमान घालायला लागतात आणि भ्रमातले आपण संभ्रमांत जखडून राहतो. चांगलं-वाईट, चूक-बरोबर, खरं-खोटं अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दुःख आणि निराशा पदरी येते. मग आपण दोष मात्र आपल्या नशिबाला नाहीतर परमेश्वरालाच देत राहतो. आपण वर्तमानांत आपलं जीवन जगत असताना खरं तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणं महत्वाचं, गरजेचं आणि म्हणूनच आवश्यक असतं. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणं आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचं असतं. आठवणी म्हणजे आनंदाचे कंद, हे एकीकडे आपण अनुभवत असतो, पण त्या आठवणींत आपण स्वतः किती व्यस्त व्हायचं, ह्याचं भान राखणं देखील महत्वाचं ठरतं. जोपर्यंत काही घडतंय तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकतं. ह्याची जाणीव आपल्याला होणं अधिक महत्वाचं आहे.

# काटे....

आधुनिक केसरी

फुला पानांसारखं जगायचं असतं... काटेजवळ असले तरी त्यांना घाबरायचं नसतं... गुलाबाच्या झाडाला असंख्य काटे असतात .पण गुलाब कधी रडतो का?? पानं कधी सुकतात का?? नाही !उलट फुल व पान खूप आनंदाने काट्यांसोबत राहतात. कारण गुलाबाला नेहमी असं वाटतं की काटे माझं रक्षण करतात. जे फूल तोडील त्याला काटा टोचल्याशिवाय राहत नाही. आधी काट्यांशी सामना मग हातात गुलाब. "आधी हाताला चटके मग मिळते भाकरी ".तसेच गुलाब हवा असेल तर आधी काटा. काटा बोटात घुसला तर तो खूप

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.12

सलतो. खूप वेदना होते. बोट लाल होते .तो निघतो तेव्हा वेदना थांबते. पायात सुद्धा शेतात गेल्यावर काटे टोचतात, घुसतात, खुडतात. मग काटे काढताना काट्यांचा किंवा सुईचा वापर करतात. काटे काढताना धारदार वस्तूच वापरावी लागते. काट्याने काटा काढतात. पायात घुसलेला काटा काढला नाही तर तो सलतो. कुरूप होते, तसंच मनातलं वाईट काढून टाका.....कसं ???? ध्यानाने.... मग मनात काहीच राहणार नाही. मनाला वेदना होणार नाही. काटे रक्षक ही आहेत आणि भक्षकही. शेताला कुंपण करताना काटेरी झाडांच्या फांद्यापासून करतात. झाडांना देखील काटेरी कुंपण फांद्या लावून करतात. जनावरे व माणसांपासून रक्षण व्हावे म्हणून. काटेरी कुंपण रोपांना लावले नाही तर माणसे रोप उपटतात व जनावरे खाऊन घेतात. साबराचे झाड देखील खूप काटेरी असते. त्याचे फळ पण काटेरीच असते. खूप जपून ते फळ खातात. जर जीभेत त्यांचा काटा घुसला तर जिभेवर मीठ चोळून ते काटे काढतात. ज्याप्रमाणे वेगवेगळ्या वाटा असतात. प्रकाशवाटा, पळवाटा, धूळवाटा,काळ वाटा, रानवाटा, वाकड्या वाटा, सरळवाटा. त्याप्रमाणे काट्याच्याही वाटा असतात. परंतु या सगळ्या वाटांमधून रस्त्यातील काटे बाजूला करून आपण आपल्या वाटा शोधाव्यात. सत्कर्म करणाऱ्या व्यक्तींना निश्चितच काट्यातूनही वाट सापडत असते. रस्त्यात काटे आले तर ते बाजूला करावेत. जेणेकरून आपल्याला सुद्धा वाट मोकळी होईल. आणि आपल्या नंतर येणाऱ्याला सुद्धा काट्यांचा त्रास होणार नाही. आणि सरळ मार्गाने ते निघून जातील असा विचार मनात करून काट्यांना बाजूला करावं. ऐरवी सुद्धा मानवाला आपल्या जीवनात नेहमीच काटे बाजूला करून देवूनच वाटचाल करावी लागते. रस्त्यातील काटे आणि मनातील काटे दोन्हीही शरीराला वेदना देणारे आहेत. रस्त्यातील काटे आपण सहज दूर करू शकतो. परंतु मनातील काट्यांना लवकर बाहेर फेकणे फार अवघड असतं.स्वतःच्या मनातील काटे तरी काढता येतील, परंतु दुसऱ्यांच्या मनातील काटे काढणे फार अवघड असतं. दुसऱ्यांच्या मनातील काटे काढायला संतांनाच पुढाकार घ्यावा लागतो. वारंवार त्यांच्या उदबोधनाने अशा लोकांच्या मनातील काटे कमी झाले तर होऊ शकतात. आणि कदाचित त्यांनाच हे यश मिळतं. प्रत्येकाने आपल्या मनातील काटे वेळीच काढून टाकावेत. जेणेकरून त्याचा त्रास स्वतःला होणार नाही व दुसऱ्यांनाही होणार नाही. काटे आपल्या जवळ बाळगले तर लोक आपल्यापासून दूर पळतात. कारण ते काटे लोकांना टोचतात. अशी टोचणारी माणसं लोकांना नको असतात. गुलाबाच्या फुलाप्रमाणे सुगंधी कोमल असावं. तेव्हा ठरवू या "फुलांसारखे फुलायचं की काट्यासारखं सलायचं... फुलांसारखंच फूलू या...

# निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**त्वं शक्तिरूपिणी देवी लक्ष्मीर्विद्या तथैव च | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ७० || तू शक्तिरूपिणी देवी आहेस. तू लक्ष्मी तसेच विद्या आहेस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**जड़ माया को त्याग कर, निराधार उत्थान । आतम ऊर्ध्व प्रवाह में, भक्ति महासुख खान ।।०२।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/०२ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : जेंव्हा जड मायेस त्यागून निराधार उत्थान होते तेंव्हा आत्म्याचा ऊर्ध्व-प्रवाह चेतन महामंडलाकडे होऊ लागतो, यालाच भक्ती म्हणतात.**

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**हमामा घालितां भ्याला तुका । त्यानें सांडिली गड्याची सोई । यादवांचा मूल एक । विठोबा त्यासवें चारितो गाई ॥५॥ आम्हां घरीं एक गाय दुभता हे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥१॥**
**वान ते सांवळी नांव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ध्रु.॥ वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥२॥ चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥३॥**
**तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ॥४॥**

# आत्मदर्शन

आधुनिक केसरी

परमेश्वर हा शाश्वत,निरंतर,निराकार, अनंत,अपार,सर्व व्यापक आहे. तो अनेकात व्यापक असला तरी तो एक आहे. परमात्मस्वरूपाचे




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ज्ञान माहिती करून घेणे मी तोच आहे हा तर परमार्थाचा प्राण आहे. एकदा का देह रूपाचा हव्यास जडला की अहंकार हा विकार जडतो आणि आपल्याच अंतरात्म्यात निवास करत असलेल्या परमात्म स्वरूपाची ओळख आपच विसरतो. आपण देहरूपाच नको एवढा गर्व करतो आणि त्याचा परिणाम म्हणजे आपल्या मध्ये एक खरा व एक खोटा असे दोन "मी" वावरतात. तर देहबुध्दी ने पोसलेला खोटा मी सर्वस्वी नाहींसा झाल्याशिवाय आत्मबुध्दी चा खरा "मी"आपल्याला सापडत नाही. हा खोटा "मी "नाहींसा करण्यासाठी सर्वांना एक सर्व समावेशक उपाय म्हणजे आपल्यातला "मी" हा दंभभाव बाजूला सारून भगवंताच्या चरणीं एकरूप होणे . यालाच "आत्मनिवेदन भक्ति असे म्हणतात. एकदा का आत्मनिवेदन प्राप्त झाले की आपल्यातला अहंकार गळून पडतो.आणि शाश्वत ब्रम्हाची लक्षणे समजायला लागतात. खरा मी सापडला की परमात्म स्वरूप समजायला वेळ लागत नाही. देव पहायला जावे तर स्वतः देव होऊन रहातो. "स्वानंदघन आत्मा तो मीच आहे या संतवचनावर जगण्याची उमेद निर्माण झाली की सतत साधनेत रहावेसे वाटते. समाजातील बाहेरील झगमगटाला दुय्यम स्थान देऊन स्थूल,सूक्ष्म,कारण आणि महाकारण या चार देहांचा साधनेच्या बळावर लोप होतो. शास्त्रप्रचीति, गुरूप्रचीति व आत्मप्रचीति या तीनही प्रचीती कशा आहेत याचें सुक्ष्मज्ञान होते.

# मूल होऊन भगवंतापाशी जावे

आधुनिक केसरी

या जगात कर्माशिवाय कोण राहतो ? पण कर्म यथासांग होत नाही याचे कारण, आपण कर्म कशाकरिता करतो याची जाणीवच होत नाही आपल्याला. अधिष्ठानाशिवाय कर्म साधत नाही. मालक पाठीशी असला की कर्म करणाऱ्याला जोर येतो. काही चांगली कर्ममार्गी माणसे भक्तिमार्गी लोकांना नावे ठेवतात. भक्तिभावाने जो राहतो तो दुसऱ्याला नावे ठेवीत नाही. 'मी कोण' हे जाणायला ज्ञान आणि भक्ति लागतेच. तसेच, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' म्हटले तरी त्याचा अनुभव येण्यासाठी कर्म करावेच लागते. उपासना भगवंताला ओळखून करावी. लहान मूल आईकडे डोळे करून मुकाट्याने दूध पिते, त्याप्रमाणे समर्थांसारख्यांनी जे सांगितले ते आम्ही निमूटपणे करावे. डोळे मिटून जितके काम होईल, अंधश्रद्धेने जे होईल, ते अभिमानाने, ज्ञानाचे डोळे उघडे ठेवूनही नाही होणार. मूल होऊन भगवंताला ओळखावे. याला अडचण एकच असते; माझे 'शहाणपण' आड येते. भक्त मुलांसारखे वागतात देव त्यांचे लाड पुरवितो. कुणी असे म्हणतील की, "भगवंताची आणि आमची ओळख नाही, तर त्याची आम्ही कशी पूजा करावी ?" "त्याला ओळखल्या शिवाय मी भजन करणार नाही" असे म्हणणे वेडेपणाचेच आहे. भगवंताला पुष्कळ मार्गांनी ओळखता येईल. पांडुरंगाकडे जाण्यासाठी काही मार्ग आधी आक्रमणे जरूर आहे. संतांनी अखंड जागृत राहण्याचा मार्ग सांगितला; तो असा की, देहाने प्रपंच करा, पण मन भगवंताच्या ठिकाणी अर्पण करा. मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर झाल्याशिवाय इतर काहीही करून उपयोग नाही. ध्येय सत्य असल्याखेरीज चित्ताची स्थिरता होत नाही. पण सत्य अशा ध्येयावर अगोदर पूर्ण श्रद्धा



पाहिजे. प्रपंचात जशी प्रेमाची गरज आहे तशी परमार्थात श्रद्धा पाहिजे. 'देव माझा आहे' असे म्हणण्याऐवजी 'मी देवाचा आहे' असे म्हणावे, म्हणजे श्रद्धा उत्पन्न होते. समुद्राचा तरंग असतो, तरंगाचा समुद्र असतो असे नव्हे समाधानात निश्चितपणा असेल तर त्यात समाधान आहे; म्हणून साधन श्रद्धेने करीत जावे. जशी श्रद्धा तशी फळे. आपण भगवंताच्या स्मरणात निर्धास्त असावे. प्रपंचात कधीच धीर सोडू नये. ज्याप्रमाणे मुंग्यांची राणी जागेवरून हलवली की तिच्यामागे असणाऱ्या हजारो मुंग्या तिच्याबरोबर नाहीशा होतात, त्याचप्रमाणे एक देहबुद्धी काढून टाकली, की आपल्या मनात उठणारे हजारो संकल्प नाहीसे होतात. या देहबुद्धीच्या पलीकडे गेल्यावर जे ज्ञान होते त्यालाच आत्मज्ञान म्हणतात. असे आत्मज्ञान झाल्यावर जे पूर्ण समाधान मिळते तेच खरे भगवंताचे दर्शन होय.

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

**ज्याची दृष्टी रामरूप झाली तो खरा गुरू.**



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

**जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. खरोखर, सद्गुरु म्हणजे मूर्तिमंत नामच होय. गुरूने सांगितलेले अक्षरशः पाळणे हेच खरे साधन. संत कुणालाही देहाने कायमचे लाभले नाहीत. संतांना भगवंताचा जो ध्यास असतो तो महत्त्वाचा आहे. पुष्कळांना संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत. व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फळाची आशा आपोआपच सुटेल. आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात. आता मला लवकरात लवकर अनुग्रह कसा मिळेल हा जर प्रश्न असेल तर उत्तर देखील तेवढेच सोपे आहे. बुफे काऊन्टर --- एखाद्या समारंभात अनेक काऊन्टर असले तरी ज्या प्रमाणे सर्वत्र चव एकच,गोडी एकच, कारण ते सर्व अन्न तयार एकत्रच झालेले असते.**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम् ।कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद्धनम् ॥**
**स्पष्टीकरण : विद्या केवळ पुस्तकात असून चालत नाही. तिच्यातला काही – महत्त्वाचा भाग तरी आपल्या स्मरणात असला पाहिजे. काही काही भाग तर तोंडपाठच असला पाहिजे. तरच ती विद्या प्रसंगी आपल्या उपयोगी पडते. धनाचेही तसेच. ते एकदा परक्याच्या हाती गेले, की आपल्या गरजेच्या वेळी आपल्या हाती येईलच असे सांगता येत नाही. तेव्हा शहाण्या माणसाने कोणत्याही प्रसंगी आपली नड भागवील इतके तरी धन संग्रही ठेवावे.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २० ऑगस्ट २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# दर्जेदार शिक्षणासह उत्तम आरोग्य सुविधा निर्माण करा

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार : मनपा आरोग्यवर्धिनी केंद्र व व्हाट्सअ‍ॅप चॅटबॉटचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मानवाचा विकास तसेच समाजाची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी शिक्षण आणि आरोग्य या दोन बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत जेवढ्या सहजपणे शिक्षण पोहोचेल तेवढ्या गतीने त्या समाजाची प्रगती होते; आरोग्य हा देखील अत्यंत महत्वाचा घटक असून शिक्षण व आरोग्य हे मानवी जिवनातील अविभाज्य घटक आहेत. म्हणूनच जिल्ह्यात दर्जेदार शैक्षणिक व्यवस्थेसह उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा निर्माण करायला हव्या अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

महानगरपालिकेद्वारा आयोजित आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन व डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेच्या नूतनीकरण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला महानगरपालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल, उपायुक्त अशोक गराटे, मंगेश खवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आविष्कार खंडाळे, मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार, झाकीर हुसेन उर्दू शाळेचे मुख्याध्यापक श्री. शहजाद, राहुल पावडे, मंगेश गुलवाडे, सुभाष कासनगोट्टूवार आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, आझाद गार्डन येथे राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत व्हॅक्युम असेस रोड स्वीपर ही अत्याधुनिक मशीन मनपाच्या माध्यमातून स्वच्छतेसाठी तर शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयोग करण्याच्या दृष्टीने 49 लक्ष 35 हजार रुपये खर्च करून फॉगर मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्याचा शुभारंभ करण्यात आला. आरोग्याच्या दृष्टिकोनातून वाढते प्रदूषण, खानपानाची बदललेली व्यवस्था, रासायनिक खतांचा अतिवापरामुळे निर्माण झालेले विषारी अन्न या सर्वांचा सामना करतांना आरोग्य बिघडते. यावर उपाय म्हणून राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय केले आहेत. महाराष्ट्राचे वर्णन चांदा ते बांदा पर्यंत केले



जाते तसेच चांदाचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचे वर्णन पूर्ण होऊ शकत नाही. चंद्रपूर पुढे गेल्याशिवाय महाराष्ट्र प्रगत राज्य म्हणून मानले जाऊ शकत नाही. त्यासाठी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने 700 "आपला दवाखाना" महाराष्ट्रात सुरू करण्यात आले आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत उत्पन्नाची मर्यादा 1 लक्ष 50 हजार होती.

**व्हाट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणालीचे लोकार्पण :** चॅटबॉटच्या माध्यमातून मनपाच्या विविध योजनांची माहिती घेता येईल, 8530006063 या क्रमाकांवर हाय मॅसेज केल्यास मनपा अंतर्गत असणाऱ्या विविध योजनांची माहिती मोबाईलवर प्राप्त होणार आहे . अशा तंत्रज्ञानाचा वापर करून जिल्हा विकासाच्या क्षेत्रात पुढे न्यावा, असे पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले .

ती 5 लक्ष्यापर्यंत वाढविण्यात आली. या योजनेत 5 लाखांमध्ये साधारणतः 900 पेक्षा जास्त आजारांचे ऑपरेशन पूर्ण केल्या जात असल्याचेही ते म्हणाले. विश्वगौरव प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी 50 कोटी लोकांसाठी आयुष्यमान भारत योजना निर्माण केली. भारताची खरी संपत्ती ही योगा आहे. या संपत्तीचा उपयोग नागरीकांनी केल्यास दवाखान्यात जाण्याची गरज भासणार नसल्याचेही ते म्हणाले.

पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, भारतीय भूमी ही संस्कारी भूमी आहे. जिल्ह्यात उत्तम दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उत्तम व्यवस्थेसह निर्माण व्हाव्यात यासाठी प्रयत्न केल्या जात आहे. डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेच्या माध्यमातून उत्तम विद्यार्थी घडावे, ही सदिच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हयात अपघात तसेच विविध कारणांमुळे दिव्यांग मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे दिव्यागांना मदतीचा हात पुढे केल्यास, समाजाची काळजी एकमेकांच्या मदतीने घेता येईल. या आरोग्यवर्धिनी केंद्रात येणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावर वेदना तर जाताना सुख व समाधान घेऊन जाईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मनपा आयुक्त विपिन पालीवाल म्हणाले, शहरातील झोपडपट्टी क्षेत्रात पाहिजे त्याप्रमाणात आरोग्य सुविधा नव्हत्या, याकरीता शासनाने महानगरपालिकेला 12 प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केली. त्यापैकी मागील 1 मे रोजी 10 आरोग्यवर्धिनी केंद्राचे लोकार्पण करून जनतेच्या सेवेत रुजू करण्यात आले. शहरी भागात आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पुन्हा ९ आरोग्यवर्धिनी केंद्रे मंजूर झाली असून यासाठी लागणारे मनुष्यबळ, डॉक्टर, नर्सेस व आवश्यक संसाधने आदींची प्रक्रिया सुरू असल्याचे ते म्हणाले.



# तायक्वांदो स्पर्धेचे यशस्वी आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व लोकमान्य महाविद्यालय सोनखेड अंतर्गत अंतर महाविद्यालयीन क झोन तायक्वांदो मुले व मुली या क्रीडा स्पर्धा दि.18 ऑगस्ट रोजी क्रीडा संकुल विद्यापीठ नांदेड येथे संपन्न झाल्या. सदरील स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला उद्घाटक म्हणून स्वारातीम विद्यापीठ नांदेड येथील क्रीडा संचालक, डॉ.मनोज रेड्डी उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमान्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच आर आगलावे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.महेश वाकरडकर C झोन स्पर्धा चेअरमन पानसरे महाविद्यालय अरजापुर,डॉ. बालाजीराव जाधव क्रीडा संचालक एसीएस कॉलेज शंकर नगर, स्पर्धेचे निवड समिती चेअरमन डॉ. उदय चव्हाण एल बी एस कॉलेज धर्माबाद व निवड व ऑफिकॅल समितीचे चेअरमन डॉ. उस्मान गणी प्राचार्य व क्रीडा संचालक वसंतराव काळे महाविद्यालय नांदेड तर विशेष उपस्थिती डॉ.माधव अनेराव उपप्राचार्य लोकमान्य महाविद्यालय सोनखेड, डॉ. व्यंकट माने क्रीडा संचालक, माजी अभ्यास मंडळ चेअरमन, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर. यांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले. सदरील स्पर्धा ठीक सकाळी नऊ वाजता स्वारातीम विद्यापीठ नांदेड इनडोअर हॉल येथे घेण्यात आले असून सर्वप्रथम स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून स्पर्धेला सुरुवात झाली या स्पर्धेमध्ये पंच व ऑफिशियल मास्टर बालाजीराव जोगदंड आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तथा नांदेड जिल्हा असोसिएशन तायक्वांदो पंच ऋषिकेश टाक वैभव सगुरे, अतुल गोडबोले,राष्ट्रपती नरवाडे,बाबुराव कंधारे, विनोद दाड, आळने तसेच शुभांगी देशमुख यांनी स्पर्धेचे पंच म्हणून अतिशय उत्कृष्ट रित्या काम पाहिले बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.माधव आनेराव यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

# संजय शिरसाट यांचे वडेट्टीवारांना प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेसचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्तेबाबत नुकताच एक मोठा दावा केला आहे. आमचे सरकार येणार नाही, परंतु, मुख्य खुर्चीवरील व्यक्ती बदलेल, असं सूचक वक्तव्य त्यांनी केले आहे. वडेट्टीवार यांच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार हे सत्तेत सहभागी झाल्यापासून मुख्यमंत्री बदलाच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. परंतु, यावर स्वतः अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर या चर्चा मावळल्या. परंतु, आता विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या नव्या दाव्यामुळे पुन्हा एकदा मुख्यमंत्री बदलाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

विजय वडेट्टीवार म्हणाले, कधी पुण्यातल्या बैठकीला उपमुख्यमंत्री दांडी मारतात, तर कधी नागपूरमधील बैठकीला दुसरे उपमुख्यमंत्री दांडी मारतात. तिघेही कधी एकत्र येत नाहीत. दोन उपमुख्यमंत्री एकत्र आले तर तिथे मुख्यमंत्री येत नाहीत. यावरून कळतं तिकडे ( महायुती ) सगळं काही आलबेल नाही. हा सगळा तमाशा महाराष्ट्रातील जनतेला दिसतोय. येत्या १५ ते २० दिवसात महाराष्ट्रात काय बदल होईल हे जनता बघेल. यात मुख्य खुर्चीपासून ( मुख्यमंत्रीपद ) बदलाला सुरुवात होईल. सप्टेंबर २०२३ हा महिना या राज्यातल्या सत्ताबदलाचा असेल.





दरम्यान, विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्यावर राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रवक्ते आणि आमदार संजय शिरसाट यांनी विजय वडेट्टीवार यांना प्रत्युत्तर दिले आहे. शिरसाट म्हणाले, एक गोष्ट लक्षात घ्या, या पदावर ( विरोधी पक्षनेते ) बसल्यावर प्रत्येकाला विरोधात बोलावे लागते. विजय वडेट्टीवार तीच भाषा बोलत आहेत. ही भाषा पहिल्यांदा बोलली जात आहे का ? तर नाही. पूर्वी पण अशी भाषा वापरली जायची. आमदार संजय शिरसाट म्हणाले, एक महिन्यात सरकार पडेल, दोन महिन्यात किंवा सहा महिन्यात सरकार पडेल, असे बोलले जात होते. काय झाले त्याचे ? अशा प्रकारची वक्तव्ये करून आपणही राजकीय प्रवाहात आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी ( विजय वडेट्टीवार ) सुरू केला आहे. त्यात काही चूक नाही. परंतु, सप्टेंबर महिन्यात सरकार पडेल, ऑक्टोबरमध्ये पडेल अशी स्वप्ने ते पाहत राहतील आणि दुसऱ्या बाजूला सरकार मजबुतीने काम करेल.

# वडेपुरी ते काळेश्वर विष्णुपुरी पालखी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जाज्वल्य श्री माता रत्नेश्वरी देवीची सर्वदूर ख्याती असल्याने येथे दैनंदिन हजारों भाविक दर्शनासाठी येतात. दसरा महोत्सव कालावधीत येथे दहा दिवस यात्रे दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तर श्रावण मासातील पहिल्या सोमवारी माता रत्नेश्वरी देवीची पादुका असलेली पालखी पदयात्रा मागील सहा वर्षांपासून वडेपुरी ते विष्णुपुरी दरम्यान काढली जाते. यंदा दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजता माता रत्नेश्वरी देवीची पादुका असलेली पालखी पदयात्रा वडेपुरी रत्नेश्वरी देवी पासून विष्णुपुरी येथील काळेश्वर महादेव मंदिरापर्यंत काढण्यात येणार आहे. असे आवाहन माता रत्नेश्वरी देवी मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



दसरा मोहत्सवा दरम्यान तर नवरात्रोत्सव सोहळ्यात रत्नागिरी गडावर मोठी यात्रा भरते. देवीच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागतात. माता रत्नेश्वरी देवी रत्नागिरी गडावरून दररोज विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिरात जावून पूजा अर्चना करण्यासाठी जात असल्याची अख्यायिका असल्याने मंदिर संस्थानच्या वतीने दरवर्षी श्रावण मासातील पहिल्या सोमवारी मातेच्या पादुका असलेली पालखी पदयात्रा प्रभात समयी निघते. यावर्षी दि. २१ ऑगस्ट रोजी पहिल्या श्रावण सोमवार निमित्त सकाळी ६ वाजता सदरील पदयात्रा मौजे वडेपुरी येथून प्रारंभ होऊन जनापुरी, वाडीपाटी, विद्यापीठ कमान मार्गे विष्णुपुरी येथील काळेश्वर महादेव मंदिरात दुपारी १२ वाजता पोहांचणार असून पूजा, तीर्थप्रसाद, भोजन कार्यक्रम आटोपून सदरील पदयात्रा दुपारी २ वाजता काळेश्वर येथून परत श्री नानकसर गुरुद्वारा, झरी मार्गे सायंकाळी ६ वाजता वडेपूरी येथील रत्नेश्वरी गडावर पोहचणार आहे. सदरील पदयात्रेत धनगरवाडी, डेरला, झरी, ढाकणी, किवळा, वडगांव, टेळकी, हरबळ, सोनखेड, दगडगांव, जानापुरी, खरबी, बामणी, मोहनपुरा, पिंपळगांव, मर्कड, कल्हाळ, मुसलमानवाडी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी सहभागी व्हावे.




# विवेकनिष्ठ भूमिका




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**श्रध्दा, अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि त्यातून घडणारा लोकाचार, लोकसमज यासोबतच प्राच्यविद्येचे व्यक्तिपरत्वे आकलन आणि स्पष्टीकरण या सर्व गदारोळात आजचा माणूस भांबावल्यागत झाला आहे, यात शंकाच नाही. कारण आपण वागावे कसे हे आज त्याच्या हाती राहिले नाही, अशी एकूण परिस्थिती. भरीस भर म्हणून की काय जागतिकीकरण, चंगळवाद या गोष्टी आहेतच. स्वानुभवातून मार्ग निवडावा तर त्याला खूप मर्यादा आहेत. ज्या अगदी प्राचीन काळापासून आपणास ज्ञात आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर एक मार्ग आहे. तो म्हणजे विवेकवादाचा, विवेकनिष्ठ भूमिकेचा.**

आपण व्यवहारात अनुभवासारखा गुरू नाही, असे नेहमी ऐकतो; परंतु हा अनुभव आपल्याकडून मोठी किंमतही वसूल करतो. तुम्ही यशस्वी झालात तर पुढे जाल आणि अपयशी ठरलात तर ज्ञानी व्हाल. ज्ञानप्राप्तीसाठी कोण कशाला अपयश ओढवून घेईल. त्यापेक्षा पुढे जाण्याचा दुसरा एखादा मार्ग शोधण्याची धडपड माणूस अव्याहतपणे करत असतो. तो दुसरा मार्ग आहे विवेकवादाचा. अनुभव श्रेष्ठ की विवेकवाद यावर पाश्चात्य जगतामध्ये खूप चर्चा झाली आहे. प्लेटो, अरिस्टॉटल, देकार्त अशी विवेकवादाची एक परंपरा तर जॉन लॉक, डेव्हिड ह्युम यांची अनुभववादी परंपरा आपणास दाखवता येईल. ही सर्व शास्त्रीय माहिती असली तरी मुळात विवेकवाद म्हणजे काय याचा उलगडा झाल्याशिवाय त्याबद्दल काही भाष्य करता येणार नाही. विवेकवाद म्हणजे यथार्थ ज्ञान. कोणाच्या वैयक्तिक अनुभवामुळे यात काही फरक पडणारा नसतो. कारण हे ज्ञान निश्चित स्वरूपाचे असते. अगदी गणितीय भाषेत बोलायचे झाल्यास दोन अधिक दोन बरोबर चारच होणार. मग तुम्ही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात जा. विवेकवाद माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्यातील मनुष्यत्वाला अधिक उजागर करण्याचे काम करते. मग आपणास प्रश्न पडेल की वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजेच विवेकवाद नव्हे का? नाही. त्याचे कारण आपण साधनालाच साध्य समजू लागलो आहोत. मुळात विज्ञान निरपेक्ष कार्य करणारे क्षेत्र आहे. त्याचा उपयोग आयुधासारखा होऊ शकतो. ज्यांना आपण पुरोगामी आणि प्रतिगामी असे संबोधतो, ते सर्वच विज्ञानाचा आधार घेऊन आपली मतप्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न करतात, हे सर्वांना माहीत आहे. विज्ञान निरपक्षतेचे क्षेत्र आहे तर विवेकवाद सापेक्ष आहे. त्याच्या मुळाशी मनुष्यता विकसित करणे, भेदाभेदाला तिलांजली देणे आणि ज्या गोष्टी आपल्या बाबतीत घडू नयेत असे वाटते त्या इतरांच्या बाबतीत आपण घडवून आणू नये याचे सम्यक ज्ञान मिळते ते विवेकवादातूनच. हे सम्यकत्व केवळ अनुभवातून प्राप्त होणे कठीण आहे. कारण अनुभवाला स्वतःच्या काही मर्यादा आहेत. चक्रधर स्वामींनी प्रतिपादन केलेल्या चार आंधळ्याच्या कथेसारखी आपली गत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कारण प्रसंग वैयक्तिक असो अथवा सार्वजनिक त्याची अनुभूती शेवटी वैयक्तिकच असणार. ही अनुभूती आपली आकलन क्षमता, संस्कार, पूर्वग्रह, धारणा, राहणीमान या सर्वांची गोळाबेरीज असते. विवेकातील निश्चितता आणि सर्वत्रिकता किंवा सार्वत्रिक सत्यता यात असेलच असे नाही. हे सर्व खरे असले तरी विवेकवादामध्ये कोण येतात हा प्रश्न उपस्थित होतो. मानवाच्या नाविन्यपूर्ण प्रगतीचे दिशादर्शक विचारवंत हे विवेकवादाच्या अग्रस्थानी असतील. येथे विचारवंत कोणाला म्हणावे याबद्दल खल होऊ शकतो. तुम्ही किती लिहिता किंवा किती बोलता यावर ही संकल्पना आधारलेली नसून काय बोलता आणि कसे बोलता यावर ती उभी आहे. नाविन्यपूर्ण प्रगतिशील विचार हा अत्यंत दुर्मीळ असतो. या नाविण्याच्या आधारे मानवता वृद्धिंगत करू पाहणारे विचारवंत या प्रकारात मोडतील. यथार्थ ज्ञानाचे दुसरे संप्रेषक म्हणून आपणास व्रतस्थपणे आयुष्य कंठणारे समाजसेवक लक्षात घ्यावे लागतील. कारण विवेकी विचाराच्या प्रचारार्थ घरावर तुळशीपत्र ठेवणारे हे समाजसेवक द्रष्टे असतात. आजच्या चंगळवादी युगात आपणास त्यांची महत्ता कदाचित जाणवणार नाही. परंतु यथार्थ ज्ञानाची अनुभूती त्यांना प्रखरपणे आलेली



## क्षितिजापल्याड

असते. नरेंद्र दाभोलकर हे त्याचे उत्तम उदाहरण होऊ शकते. तिसरा आणि शेवटचा प्रकार आहे तो अध्यात्मविदांचा. कदाचित शेवटच्या प्रकाराबाबत आपल्या मनात काही प्रश्न उपस्थित होऊ शकतील म्हणून थोडे विश्लेषण गरजेचे आहे. ज्यांना आपण पुरोगामी म्हणतो त्यांच्या दृष्टीने अध्यात्म म्हणजे काहीतरी त्याज्य गोष्ट असते. मुळात धर्माच्या छायेत आजपर्यंत अध्यात्माची वाढ झाल्यामुळे आपला तसा दृष्टिकोन बनला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अध्यात्माचा आणि तुम्ही आस्तिक आहात की नास्तिक याचा तसूभरही संबंध नाही. तुम्ही मनुष्यता जाणता आणि मानता म्हणजे तुम्ही अध्यात्मिक आहात. येथे तुमच्या विशिष्ट धर्माचा देखील संबंध नाही. म्हणून मनुष्यता वाढीस लागण्यासाठी जेवढी वैज्ञानिकांची आवश्यकता आहे त्यापेक्षा कितीतरी जास्त अध्यात्मविदांची असणार आहे. कारण आपल्या अगदी घराघरात घुसलेला चंगळवाद थोपवायचा असेल किंवा त्याला काही पर्याय उपलब्ध करून द्यायचा असेल तर समाजातील विवेकवाद वाढला पाहिजे. या तीन पध्दतीनेच तो वाढू शकतो. कलावंत, अध्यापक, राजकारणी, धर्माचे ठेकेदार ही सर्व मंडळी अनुभवजन्य ज्ञानावर आधारित असतात. त्यांच्याकडून शाश्वत मूल्ये प्रतिष्ठापण्याची किंवा संवर्धित करण्याची अपेक्षा ठेवता येणार नाही. राष्ट्र उभारणीसाठी म्हणून जी काही नैमित्तिक मूल्ये आवश्यक असतात ती मात्र या गटाकडून चांगल्यारीतीने होऊ शकतात. पण अखिल मानवजातीला दिशा देण्याचे कार्य विवेकवादाशिवाय होऊ शकणार नाही. कारण राजकारण विसंगतीने गतिमान होते तर विवेकवाद विसंगतीवर बोट ठेवते. त्यामुळे व्यवहारात विवेकाच्या उपयोजनेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आधुनिक काळात राजकीय विचारप्रणालीतून समाजाची दिशा निश्चित होणे अपरिहार्य आहे. याचा अर्थ शीर्षस्थानी असलेल्या मंडळींकडून हवा तसा समाजबदल करून घेणे असा होतो. म्हणूनच प्लेटोने आपल्या आदर्श राज्याच्या संकल्पनेत सत्ताधारी हा अत्यंत ज्ञानसंपन्न व आदर्श गुणांनी युक्त असावा,अशी अपेक्षा व्यक्त केली होती. शेवटी एकूण मानवी कल्याणासाठी आपण सर्वांनीच विवेकाची कास धरली पाहिजे.

# मन सिद्धींचे कारण



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**मन वढाय वढाय उभ्या पीकांतलं ढोर, किती हांकला हांकला फिरी येतं पिकांवर.  देवा, कसं देलं मन आसं नहीं दुनियांत ! आसा कसा रे यवगी काय तुझी करामत !  बहिणाबाई चौधरी मनाचे किती सुंदर वर्णन करतात आणि या मनाच्या चंचलतेवर अप्रतिम भाष्य करतात. खरंच मन समजणे मोठेच अवघड असते. मनाची चंचलता कमी करणे किंवा त्याला काबूमध्ये ठेवणे इथूनच कदाचित अध्यात्माची सुरुवात होते. पण हे इतके सोपे कुठे असते महाराजा.....? मन तर पाखरू क्षणात भुईवर तर क्षणात आभाळात. इंगळी, विंचवाचं तरी विष उतरेल पण विष भरल्या मनावर उतारा मिळणे अवघड. हे विष अर्थातच अज्ञानाचे. अज्ञान म्हणजे तुम्ही शिकला आहात की नाही हे नाही हो....!!! तुम्ही डिग्री मिळवली आहे की नाही हे नाही.... तर आपल्याला आत्मज्ञान नसलं म्हणजे आपण अज्ञानी असतो. देह बुद्धीत अडकलेलं मन म्हणजे मी पणात अडकलेलं मन म्हणजे अज्ञान.**

मन एखाद्या शेता सारखे असते खरंतर.मन म्हणजे सुपीक जमीन. पण सद्गुरू  सारखे सकस बीज मिळाले, अध्यात्म निरूपणाचा पाऊस योग्यवेळी योग्य तितका झाला आणि मग असंख्य विकल्पांपासून, विषयांपासून, द्विधा मनस्थिती पासून बहारदार पिकाचं संरक्षण झालं की मग अध्यात्माची साधना सुरू होते आणि मग मात्र येणार पीक म्हणजेआत्मज्ञान.  म्हणजे स्वानंदाचा अनुभव.

मग या स्वानंदापर्यंत पोहोचायचं असेल तर मनाचे शोधन करावेच लागेल ना.... मनानेच मनाचे शोधन करावे लागते. हा आनंद, स्वानंद भोगण्यास त्या मनाला पात्र करावे लागते आणि म्हणूनच श्री समर्थ रामदास स्वामी मनाच्या श्लोकातून मनालाच उपदेश करतात. ते म्हणतात मनाच्या अंगी प्रचंड सुप्त सामर्थ्य वास करून असते पण या  सामर्थ्याच्या अज्ञानापयी माणूस दुःख भोगतो. अज्ञान मनात राहते. अज्ञानी मन चुकीच्या कल्पना करते आणि आपण केलेल्या कल्पना चुकीच्या आहेत असे मनाला पटवून दिले की अज्ञानाचा आसन हालतं, डळमळीत होतं. मग भगवंताच्या स्मरणाचा अभ्यास चिकाटीने चालू ठेवला तर हे अज्ञान दूर होण्यास वेळ लागत नाही. यासाठी गुरु हवा.

तुकाराम महाराजांनी बघा मनाला कसे वर्णिले आहे...

**मन करा रे प्रसन्न ॥ सर्व सिद्धींचे कारण ॥**
**मोक्ष अथवा बंधन ॥सुख समाधान इच्छा ते ॥१ ॥**
**मनें प्रतिमा स्थापिली ।मनें मना पूजा केली ॥**
**मने इच्छा पुरविली ॥मन माऊली सकळांची ॥ २ ॥**
**मन गुरु आणि शिष्य ॥करी आपुलेची दास्य ॥**
**प्रसन्न आपआपणास ॥गति अथवा अधोगती ॥ ३ ॥**
**साधक वाचक पंडित ॥श्रोते वक्ते ऐका मात ॥**
**नाही नाही आन दैवत ॥तुका म्हणे दुसरे ॥४ ।तु.गा.१५२**

अर्थात मनासारखे दुसरे दैवत नाही मनाला जे समजवाल ते मन मानत राहते. तुकाराम महाराज म्हणतात मनाला तुम्ही पहिल्यांदा आपलंस करा.मन प्रसन्न करा. म्हणजे आपल्याला अनुकूल करून घ्या मग जेवढ्या म्हणून काही सिद्धी आहेत त्या सर्व तुम्हाला मिळाल्याच म्हणून समजा. मनच मनाची पूजा करू लागेल. महाराज मनाला आईची उपमा देतात हो.... किती सुंदर ही उपमा..... आई सगळ्यांच्या इच्छा पूर्ण करत असते.... आई कुणालाही दुखवत नाही आणि म्हणून आईची उपमा त्यांनी मनाला दिलेली आहे. शांतीब्रह्म एकनाथ महाराज म्हणतात मनाला एकाग्र करा. मनाला जिंकून घ्या. मनाला दृढ बांधून ठेवा.

**मन एके ठायीं ।राहे ऐसें करीं कांहीं ॥१ ॥**
**सर्व साधनांचें सार ।मनीं करावा विचार ॥२ ॥**
**एकाग्र तें मन ।करूनि करावें भजन ॥३ ॥**
**मन जिंकावें पां आधीं ।तेणें तुटेल उपाधी ॥४ ॥**



**एका जनार्दनीं मन ।दृढ ठेवावें बांधुन ॥५ ॥**

पण मंडळी मनाला दृढ बांधून ठेवणे हीच तर आपली समस्या असते. म्हणूनच गोंदवलेकर महाराज म्हणतात सामान्य माणसाने मोठे ग्रंथ वाचण्याच्या नादी लागूच नये त्याने मनाचे श्लोक पाठ करावेत आणि त्यात सांगितल्याप्रमाणे साधन करावे म्हणजे त्याला खात्रीने भगवंताचे दर्शन होईल.

श्री समर्थ रामदास स्वामी मनाला किती सुंदर उपदेश करतात,

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे ।**
**मना बोलणे नीच शोषित जावे।**
**स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे ।**
**मना सर्व लोकांसि रे निववावे ।।म.श्लो.७**

भक्ती साधना अगदी एका शब्दात सांगतात समर्थ. समर्थ म्हणतात गिळायला शिकावे म्हणजे कसे... ? तर अपमान जसा गिळावा तसा मानही गिळावा. यश गिळावे तसे अपयशही गिळावे. सुखही गिळावे आणि दुःखही गिळावे. संपत्ती गिळावी आपत्ती पण गिळावी. संयोग गिळावा आणि वियोग पण गिळावा. अर्थात हे गिळणं.... यासाठी मात्र मोठे धैर्य लागते. थोडक्यात समर्थ सांगतात कुठल्याही परिस्थितीत विवेकाने, संयमाने स्तब्ध रहावे. अलिप्त रहावे. स्थितप्रज्ञ रहावे. तोंडावर झालेली व्यर्थ स्तुतीही घ्यावी आणि निंदाही गिळावी. ते सोपे नसले तरी त्याच्यासाठी ते धारिष्ट अंगी बाळगावे.

तुकाराम महाराजही हेच सांगतात

**मन गुंतले लुलया ।जाय धांवोनी त्या ठाया ॥१ ॥**
**मागे परतवी तो बळी ।**
**शूर एक भूमंडळी ॥२ ॥**
**येऊनिया घाली घाला**
**नेणो काय होईल तुला ॥३ ॥**
**तुका म्हणे येणे ।**
**बहु नाडीले शहाणे ॥४ ॥**

उगाच का हो ही मंडळी संत म्हणून गणली जातात .... ? काय हा विचार..... महाराज म्हणतात या मनाला विषयापासून जो मागे पडतो तो बलाढ्य होय. या भूमंडळावर तोच एक शूर आहे. पुढे महाराज म्हणतात आजपर्यंत या मनाने पुष्कळ शहाण्या लोकांना फसवले आहे. अगदी आपल्या मनातलं बोलल्यासारखे वाटतात की नाही महाराज.... ? अहो ओळखणारच ते मनाला....त्यांनी मनाला ओळखलं जिंकलं म्हणून तर ते संत झाले.अर्थात या मनावर उपायही तुकाराम महाराजच सुचवतात महाराज म्हणतात,

**मन माझे चपळ न राहे निश्चळ ।**
**घडी एकी पळ स्थिर नाही ॥१ ॥**
**आता तू उदास नव्हे नारायण।**
**धावे मज दीना गांजियले ॥२ ॥**
**धांव घाली पुढे इंद्रियांचे ओढी।**
**केले ताडातोडी चित्त माझे ॥३ ॥**

तुका म्हणे माझा न चले सायास  राहिलो मी आस धरुनी तुझी ॥४ ॥ ॥तु.गा.११३६ ॥ अर्थात महाराज म्हणतात की नारायणा आता तू स्वस्थ बसू नकोस. तूच आता धावून ये. या माझ्या मनाने मला फार गांजले आहे. इंद्रियांची ओढ मनास लागलेली असल्यामुळे मन सारखे तिकडेच धाव घेते आणि माझ्या चित्ताची  ओढाताण होत आहे. त्यामुळे आता मी तुझ्याच आशेवर आहे की तूच येऊन मला आता यातून सोडव. आणि मग म्हणतात

**असे हित माझे तुझे काही एक ।**
**धरी विठ्ठली प्रेम हे पायि सूख ।।तु.गा.३३५५ ॥**

अर्थात विठ्ठलाच्या पायाशी राहिले तर मनाची चंचलता कमी करणे काही अवघड नाही. ज्या देवाने मन देऊन करामत केली आहे त्या देवाच्या पायाशीच त्या मनाला वाहिले पाहिजे तरच आपले काही कल्याण होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फडणवीस गृहखात्याकडे लक्ष देतील का : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जनतेला खोटी स्वप्ने दाखवून २०१४ साली



सत्तेवर आलेल्या भाजपाचा खरा चेहरा जनतेला उमगला असून आपली फसवणूक झाल्याने जनतेला पश्चाताप होऊ लागला आहे. 'एकही भूल कमल का फुल' अशी प्रतिक्रीया लोकांमधून उमटली होती, आता तर, ज्या बोटाने भाजपाला मतदान केले ते बोटच कापून टाकण्याचा प्रकार मनाला सुन्न करणारा आहे. भाजपाला मतदान करून आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली अशी लोकांची भावना वाढली असून याची मोठी किंमत भाजपाला चुकवावी लागेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भय आणि भ्रष्टाचार हेच भारतीय जनता पक्षाचे चाल व चलन आहे. केंद्रातील भाजपा सरकारप्रमाणेच महाराष्ट्रातील भाजपाप्रणित सरकारही जनतेला नकोसे झाले आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदार, खासदार खुलेआम दादागिरी करत आहे. मुंबईतील शिंदे गटाच्या आमदार पुत्राने एका अधिकाऱ्याचे अपहरण करून त्यांना मारहाण केली, दुसऱ्या आमदाराने गोळीबार केला, एक आमदार महाशय अधिकाऱ्यांचे डोळे काढण्यापर्यंतची भाषा करत आहे. केंद्रातील मंत्री तर औकात दाखवण्याची भाषा करत आहेत. सत्ताधारी पक्षाच्या आमदार, खासदार व त्यांच्या सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून उल्हासनगर मधील नंदकुमार ननावरे यांनी १ ऑगस्ट रोजी पत्नीसह तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली पण पोलिस मात्र तपासात चालढकल करत होते. आरोपींना अटक होत नसल्याने नंदकुमार यांचा भाऊ धनंजय ननावरे यांनी, ज्या बोटाने भाजपला मतदान केले होते, ते बोटच सुऱ्याने कापून टाकले. जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दर आठवड्याला शरीराचा एक भाग कापून पाठवणार असल्याचा इशारा दिला आहे. हा प्रकार मन सुन्न करणारा व संताप आणणारा आहे. गृहखात्यावर फडणवीस यांचा वचक नाही, राजकीय पक्ष फोडण्याच्या व्यस्त कार्यक्रमातून त्यांना गृहविभागाकडे लक्ष देण्यास वेळही मिळत नाही. भाजपा व फडणवीस यांच्या राजकीय साठमारीत महाराष्ट्राची जनता मात्र भरडली जात आहे, हे दुर्दैव आहे.

उल्हासनगरच्या ननवरे दाम्पत्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडणाऱ्यांना तात्काळ बेड्या ठोकून कठोर शिक्षा होईल याकडे मुख्यमंत्री व गृहमंत्री लक्ष घालतील अशी अपेक्षा आहे. ननावरे प्रकरणात छोटा-मोठा आरोपी असा भेदभान न करता कारवाई करण्याची हिम्मत सरकारने दाखवली पाहिजे. केवळ विरोधी पक्षांच्या लोकांवर कारवाई करण्यात आपली मर्दुमकी दाखवणाऱ्या फडणवीस व शिंदे यांनी त्यांच्या पक्षातील सत्तेचा माज आलेल्या आमदार-खासदारांवर कारवाई करून लगाम घालावा, असेही पटोले म्हणाले.



# महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना उरण यांच्या वतीने उरण येथील नाईक नगर झोपडपट्टीत गरजू विद्यार्थ्यांना शाळेपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश निकम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.कोणाला काही अडचण असेल, समस्या असेल तर पोलीस स्टेशनला संपर्क साधण्याचे त्यांनी आवाहन केले.या प्रसंगी आदर्श शिक्षिका सुनंदा कुमार मॅडम यांचा वाढदिवस सुद्धा साजरा करण्यात आला.या प्रसंगी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे गणेश पाटील, वैभव पवार,राजेश म्हात्रे, प्रशांत भोईर,जयेश मोकल,रवि मोकल,स्वप्नील कुंभार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. पप्पू सूर्यराव यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिवीगाळ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे शहरातील बाबूराव काळे नगर येथील महिलेला तपासून मृत घोषित केले असता नातेवाइक असलेल्या नातवाने वैद्यकीय अधिकाऱ्यास शिवीगाळ करत लोटलाट केली.

ही घटना सोयगाव ग्रामीण रुग्णालयात गुरुवारी दि १७/८/२३ रोजी रात्री घडली. या प्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नील गाडे यांनी सोयगाव पोलिसांत शुक्रवार दि १८/८/२३ रोजी रात्री उशिरा दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करून आरोपीस अटक केली आहे. सोयगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी गाडे हे गुरुवारी रात्री ८.५० वाजेदरम्यान रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात रुग्णांची तपासणी व औषधी लिहून देत होते. यावेळी सोयगाव शहरातील काळेनगर भागातील काही लोक लीलाबाई कडूबा सुरडकर यांना घेऊन आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी गाडे यांनी आधीच मृत असलेल्या महिलेला तपासून मृत घोषित केले. दरम्यान, मृत महिलेचा नातू सनी नंदू सुरडकर याने डॉ. गाडे यांच्याजवळ येऊन त्यांना अश्लील शिवीगाळ करत धक्काबुक्की केली.

यावेळी ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून आरोपी सनी सुरडकर यास रुग्णालयाबाहेर काढले. या प्रकरणी वैद्यकीय अधिकारी स्वप्नील गाडे यांनी शुक्रवारी रात्री सोयगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी सनी सुरडकर याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.सपोनि अनमोल केदार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस कर्मचारी करत आहे.

# भाजपाच्या घर चलो अभियानाला आजपासून सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतीय जनता पार्टी चंद्रपूरच्या 'घर



चलो अभियानाला रविवार 20 ऑगस्ट पासून तुकुम येथून सुरवात होणार आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते शुभारंभ झाल्यावर ते तुकुम परिसरातील जनतेशी सम्पर्क साधणार आहेत. यावेळी पालकमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, भाजपा जिल्हाध्यक्ष (ग्रा.)हरीश शर्मा, जिल्हाध्यक्ष (श)राहुल पावडे यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहेत.

अवघ्या काही महिन्यांच्या अंतरावर लोकसभा निवडणूक होऊ घातली आहे. पक्ष संघटन मजबूत करीत जनसंपर्क वाढविण्याचा व मोदी सरकारने केलेली कामे जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा संकल्प भारतीय जनता पार्टीने केला आहे. त्या अनुषंगाने रविवारी सकाळी 11 वाजता घर चलो अभियानानंतर दु 12 ते 2 वा.पर्यंत प्रदेशाध्यक्ष आ.बावनकुळे महानगरातील प्रतिष्ठित लोकांच्या भेटी घेतील. दु.2 वाजता बुरडकर सभागृह येथे ते राजूरा, बल्लारपूर व चंद्रपूर विधानसभेच्या मुख्य पदाधिकाऱ्यांचा मेळाव्याला संबोधित करतील व संवाद साधतील. यावेळी विधानसभा प्रमुख आ.डॉ.रामदास आंबटकर, बल्लारपूर विधानसभा प्रमुख व भाजपा ज्येष्ठनेते Jचंदनसिंह चंदेल,देवराव भोंगळे( राजुरा विधानसभा) यांची उपस्थिती राहणार आहे.भाजपा आजी माजी सर्व पदाधिकाऱ्यांनी न चुकता उपस्थित रहावे असे आवाहन हरीश शर्मा व राहुल पावडे यांनी प्रसिद्धीपत्रकातून केले.




# उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी घन:श्याम कडू

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी घन:श्याम दामोदर कडू यांची फेरनिवड करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षपदी घनश्याम कडू यांची फेरनिवड झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी पत्रकार संघाचा ३७ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. उरण तालुका मराठी पत्रकार संघाचा ३७ वा वर्धापन दिन पत्रकार संघाच्या कार्यालयात जेष्ठ पत्रकार हसमुख भिंडे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी अहवालाचे वाचन करून त्याला सर्वानुमते संमती देण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या निधनानिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पत्रकार संघाला मदत करणाऱ्यांचे व विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांचेही अभिनंदन करण्यात आले. पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन कार्यकारणीने पुन्हा त्यांची अध्यक्षपदी फेरनिवड करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958







# आंबेडकरी चिंतन; बौद्ध तत्त्वज्ञानाच्या वलयातील साहित्यकृती

आधुनिक केसरी

**८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भीमराव सरवदे लिखित; आंबेडकरी चिंतन; हा ग्रंथ बौद्ध तत्त्वज्ञानाच्या वलयातील लेखकाच्या चिंतनशील संशोधनाची प्रगल्भ साहित्यकृती आहे. अभ्यासाचे केंद्र मुख्यतः बुद्ध आणि डॉ. आंबेडकरच असले तरी वर्तमानासह इतिहासाला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नावरील भीमराव सरवदे यांचे भाष्य विचारांची उदात्तता व व्यापकता सिद्ध करणारे आहे. डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेशी विसंवादी असणाऱ्या कम्युनिस्ट व अण्णा भाऊ साठे यांच्या विचार विश्वातील संवादी जागा सुद्धा अधोरेखित करण्याचा लेखकाचा विवेक गौरवास्पद आहे. राजर्षी शाहू राजे व सयाजीराव गायकवाड महाराज यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्यातील योगदान लेखक सरवदे सप्रमाण मांडतात, पण बडोदा संस्थानातील डॉ. आंबेडकरांवर झालेला अन्याय सयाजीराव महाराज यांनी पुरेशा गांभीर्याने का समजून घेतला नाही? या प्रश्नाचे उत्तर लेखकाला मिळत नाही. अस्पृश्यांना हिंदू हॉटेलात प्रवेश नव्हता. पारशी धर्मशाळेतील काही दिवसांच्या वास्तव्यात दंडुके घेतलेल्या धर्मांध लोकांनी बाबासाहेबांना हाकलून लावले. डॉ. आंबेडकरांचे बडोद्यात राहण्याचे सर्व मार्ग खुंटले, तेव्हा ते एका सरकारी उद्यानात संध्याकाळ होण्याची वाट पाहत बसले. याप्रसंगी अत्यंत दुःखावेगामुळे ते तेथे ढसढसा रडले.**

विद्वत्ताप्रचूर बाबासाहेबांच्या अश्रू बाबत महाराज सयाजीराव गायकवाड मौनात का राहिले ? हा प्रश्न लेखकास पडला आहे. ब्रिटिश सत्तेसमोर न झुकणारे महाराज बडोदा संस्थानातील जातीवाद्यांपुढे का झुकावेत ? हा प्रश्न कायम अनुत्तरित राहिल्याची खंत या लेखनात नमूद केलीय. सयाजीरावांच्या अनेक चरित्रकारांनी या भयान वास्तवतेकडे दुर्लक्ष केल्याचे लेखकाचे मत वस्तुनिष्ठ आहे. महाराजांच्या सर्वार्थाच्या सामाजिक कार्याचा सप्रमाण गौरव भीमराव सरवदे यांनी जरूर केला आहे. पण बाबासाहेबांना त्याच बडोदा संस्थानात ढसाढसा रडावे लागले याबद्दल लेखक विशेष संवेदनशील आहेत. पुणेरी ब्राह्मणांच्या दबावातूनच महाराजांना बाबासाहेबांचा कैवार या संदर्भाने घेता आला नसण्याची टीका भीमराव सरवदे समजून घेतात आणि त्यातील तथ्यांशाबाबत आपली साशंकता ही स्पष्ट करतात, परंतु याच अन्यायामुळे डॉ. आंबेडकरांना उच्चनीच भेदभावांना नष्ट करण्याची प्रेरणा मिळाल्याबद्दल लेखकांनी बडोदा संस्थानचे ऋण व्यक्त केले आहे. ही जागा अत्यंत मार्मिक चिंतनाची आहे. बडोदा संस्थानाच्या निमित्ताने भीमराव सरवदे यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या संवेदनशीलतेविषयी प्रश्नचिन्ह उभे केले आहे. महाराजांचे डोंगराएवढे समाजकार्य वंदनीयच पण त्याच संस्थानात बाबासाहेबांना अश्रू ढाळावे लागले. त्या अश्रूचे मूल्य का जाणले गेले नाही ? या प्रश्नाचे उत्तर इतिहासासह वर्तमानातही नाही. त्यामुळे महाराजांच्या कर्तुत्वाची मर्यादा स्पष्ट होते का ? भीमराव सरवदे यांनी अत्यंत सूचकपणे पण सत्यनिष्ठ विवेचन करून प्रबोधन व परिवर्तनाच्या प्रवाहातील एका नाजूक प्रश्नाचा अचूक वेध घेतलाय. राजर्षी शाहूंच्या आरक्षण धोरणाचा पुराव्यासह आढावा या लेखनात महत्त्वपूर्ण ठरलाय. कोल्हापूर संस्थानातील प्रशासनात ७१ पैकी ६० पदावर ब्राह्मण अधिकारी असण्याचा अर्थ बहुजनावरील कळत नकळत अन्यायासंबंधाने समजून घेता येते. ५० टक्के आरक्षणाचा पहिला कायदा शाहू राजांनी केल्यावर १९१२ मध्ये ९५ पैकी केवळ ३५ अधिकारी ब्राह्मण राहिले. वेदोक्त प्रकरणाचीही दुसरी व्यवहारिक बाजू महत्त्वाची आहे. राजवाड्याच्या कर्मचाऱ्यांपैकी गंगाराम कांबळे यास अस्पृश्याच्या गुन्हा प्रकरणी मराठा संतराम व इतरांनी बेदम मारहाण केली. हे कळताच शाहू राजांनी संतरामासह इतरांना चाबकाने फोडून कामावरून काढले. दलितावरील अन्यायाच्या परिमार्जनार्थ शाहू राजे तात्काळ सज्ज होतात. पण बडोदा संस्थान मात्र अशा संदर्भात कमी का पडले ? याची खंत लेखकाने संयमित शब्दात सूचकपणे व्यक्त केलीय. दोन्ही राजांच्या सामाजिक जाणीवेचा व कार्याचा गौरव या लेखनात जरूर आहे. पण विशिष्ट संदर्भाने सामर्थ्यासोबत मर्यादा ही नोंदण्याचे विवेकी कर्तव्य पहिल्यांदा भीमराव सरवदे करताना दिसतात. बुद्ध-आंबेडकरी पर्व व प्रवाहाची अस्मिता कायम ठेवूनही इतर प्रवाहातील परिवर्तनाच्या केंद्रांना बेरजेत आकळण्याचे सूत्र या लेखनात स्वयंसिद्ध दिसते. शाहू महाराज, सयाजीराव महाराज, अण्णा भाऊ साठे या मानदंडाचा यथायोग्य सन्मान इथे दिसतो. मार्क्सचा स्वीकार नसला तरी बहिष्कारही नसल्याचे वास्तव विचारप्रवर्तकच म्हणावे लागेल! या चिंतनाच्या पार्श्वभूमीत लेखकाचा वस्तुनिष्ठ अभ्यास आहे. सत्यनिष्ठा आहे. विवेकाची बांधिलकी आहे. बुद्धाच्या करुणेचा प्रभाव आहे आणि मानव कल्याणाचा ध्यास आहे. कर्मठ व आंधळ्या अनुयायांच्या अज्ञानामुळे व वजाबाकीमुळे आंबेडकरी पर्व डागाळले जाताना नव्या पिढीचे नवे शिलेदार लेखक सरवदे नवे मूल्यभान पेरण्यास सरसावले आहेत. बाबासाहेबांच्या चळवळीतील असंख्य ऐतिहासिक व क्रांतिकारक घटना अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचा विषय का होऊ शकल्या नाहीत ? हा लेखक सरवदे यांचा प्रश्न खरोखरच अस्वस्थ करून सोडतो. मार्क्सचा विरोध बाबासाहेबांकडून जसा झाला तसाच तो कम्युनिस्टांकडूनही डॉ. आंबेडकरांचा झाला. या संघर्षात शाहीर अण्णा भाऊ तरुण वयापासूनच लालबावट्याच्या कैवारात रमल्यामुळे आणि कॉ. डांगेसारख्या नेत्यांचे प्रेम व सन्मान मिळाल्याने अण्णा भाऊ कामगार चळवळीशी निष्ठावंत राहिले. १९५८ च्या दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची नोंद अण्णा भाऊंनी घेतली नसल्याचा लेखक सरवदे यांचा मुद्दा अस्वस्थ करणारा जरूर आहे. मॅक्झिम गॉर्की मार्क्सवादी कादंबरीकार म्हणून अण्णाभाऊंना जवळचा असणे समजून घेता येते. पण ज्या मनुस्मृतीने साठे-आंबेडकरांच्यासह सर्व पूर्वजांना गुलाम केले तिच्या दहणाचा पराक्रम अण्णाभाऊंकडून का विसरला जावा ? हा लेखकाचा प्रश्न मेंदूला झिनझिन्या आणतो.; जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव; ही अण्णा भाऊंची भावना व भूमिका नजरेआड करता येत नाही. तेव्हा लेखक सरवदे यांच्या काही मुद्द्यांशी याबाबत सहमत होऊनही उर्वरित विचार सूत्रावर मतभेदाची नोंद अटळ ठरते. अर्थात लेखकांच्या अपेक्षांबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. वर्णव्यवस्थेच्या भारतात मार्क्स अपयशी ठरल्याचे लेखक सरवदे यांचे मत मर्यादित अर्थाने स्वीकारता येते. कम्युनिस्टांच्या संघटनेच्या कार्यालयात दलित व ब्राह्मणांसाठी वेगळे पाण्याचे भांडे ठेवण्याचे वास्तव अमानुषच! पण मार्क्सवाद आणि आंबेडकरवादातील शोषणमुक्तीच्या ध्येयवादाचे साम्य खुद्द डॉ आंबेडकरासह भीमराव सरवदे यांनीच मांडलेय. शिवाय




मार्क्सवादावरील बाबासाहेबांनी केलेला हिंसेचा आरोप हा कम्युनिस्टांच्या अघोरी व्यवहाराला लागू होतो. तो मूळ मार्क्सवादी दर्शनाला लागू होत नाही. या सूत्रावरील वस्तुनिष्ठ लेखनाचे असंख्य ग्रंथ जगभर आहेत. या ग्रंथात बाबासाहेबांच्या पुस्तक प्रेमासह त्यांच्या वकिली व्यवसायाचे व यशाचे सुंदर चित्रण करण्यात आलेले आहे. देशाचे दुश्मन; या पुस्तकाचे लेखक दिनकरराव जवळकर यांना बाबासाहेबांनी अपिलात न्याय मिळवून दिला. श्रीधरपंत टिळकांना डॉ आंबेडकरांनी सच्चे लोकमान्य म्हटल्याचा संदर्भ अर्थपूर्ण आहे. संविधानातील कलम ३२ हा राज्यघटनेचा; आत्मा व हृदय असल्याचे बाबासाहेबांचे मत व त्यावरील लेखकांचे भाष्य मुळातूनच वाचणे योग्य! दारिद्र्य, वाढती लोकसंख्या, शेतीचे संकट आणि बेरोजगारी यांचा आपसातील संबंध अभ्यासून डॉ आंबेडकरांनी कुटुंब नियोजनाचा सांगितलेला उपाय या लेखनात निर्णायक महत्त्वाचा ठरला आहे. हा मुद्दा नेहमीच दुर्लक्षित होता. म्हणूनच लेखकाचा विशेष गौरव अटळ! धार्मिक असहिष्णुता आणि जातीय वैमनस्याबरोबरच सेक्युलर प्रबोधनाबाबत आंबेडकरी भूमिकेचा लेखक सरवदे यांनी सम्यक परामर्श घेतलाय. या विवेचनात डॉ. आंबेडकरांच्या भाषणांचे संदर्भ घटना - प्रसंग व इ.स.सह इथे अर्थपूर्ण ठरतात. त्यावरील लेखकाचे भाष्य वस्तुनिष्ठ व सप्रमाण असल्याने त्यातील सत्यता पटते. डॉ. आंबेडकरांच्या विद्यार्थी जीवनाचे दर्शन घडवताना त्यांच्या शिक्षण विषयक तत्त्वज्ञानाचा लेखकाने घेतलेला परामर्श सर्वार्थाने गौरवास्पद आहे. डॉ आंबेडकर महामानवच आहेत तरीही डोळसपणे त्यांच्या प्रत्येक भूमिकेचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न भीमराव सरवदे करू पाहतात. अर्थात या मूल्यमापन प्रक्रियेत आंबेडकरी सामर्थ्याचीच यादी मोठी असून ती स्वाभाविक मानता येते. बाबासाहेबांच्या भूमिकेच्या काही मर्यादा आहेत का ? या प्रश्नाच्या उत्तरात निदान मतभेदाचे मुद्दे तरी एखादा चोखंदळ वाचक अपेक्षित करील! पण कुठेही अतिशयोक्त स्वरूपात हे लेखन अंधश्रद्धेत वहात जात नाही. लेखकाची दृष्टी निर्मळ, पारदर्शी आहे. विवेचन विवेकपूर्ण व समतोल आहे. अकारण कुणाचा दुस्वास-शत्रुत्व स्वीकारून विष पेरणीचे पाप ही लेखणी करीत नाही. आंबेडकरी चळवळीतील गट- तट-मठ व नेत्यांच्या स्वार्थावर लेखक सरवदे फटकारे मारतात. आत्मपरीक्षणाची ही परखड भूमिका आंबेडकरी विचार सहित्यात फार कमी विद्वान घेतात. म्हणूनच सरवदे यांच्या सत्यनिष्ठेचे मूल्य श्रेष्ठ ठरते. त्यांची आंबेडकरवादी निष्ठा अव्वल व अभिजात आहे. ती कर्मठ-अंध नसून प्रामाणिक व पारदर्शी आहे. या संदर्भातील; बाबासाहेबांच्या स्वप्नांना चूड लावणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे; हा लेख आंबेडकरी जयघोषात स्वार्थाची दुकानदारी करणाऱ्या भक्तांना अंतर्मुख व्हायला भाग पाडतो. आरपीआय व पँथरच्या असंख्य गटा-तटांची वास्तवता दलित शक्तीच्या वजाबाकीची शोकांतिका सांगते. त्यासाठी सर्व संघटनांच्या एकात्मतेचा उपाय लेखकाने तळमळीने मांडलाय.

बुद्ध दार्शनिकता, नव्या भारताची जडणघडण लोकशाही आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा अनुबंध, विश्वाच्या अनेक देशात रुजलेला धम्म, बाबासाहेबांचे बौद्ध इतिहासातील योगदान, धम्माचे पर्यावरणीय अनुबंध, विज्ञान आणि बौद्ध मूल्यात्मकता, वांशिक राष्ट्रवाद आणि भारत - अमेरिका अशा अनेक संदर्भांची भीमराव सरवदे यांनी या ग्रंथाच्या पानापानावर सत्यनिष्ठ अभ्यासपूर्ण मांडणी केलीय. भीमराव सरवदे यांनी पेरियार रामासामी या दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर चळवळीच्या मानदंडाला मराठी प्रवाहात सन्मानित करण्याचा पराक्रम केलाय. आंबेडकरी तत्त्वज्ञानावरही त्यांनी ग्रंथ लेखन केलेय. नुकताच त्यांचा आंबेडकरी तत्त्वज्ञानः विद्रोह, मानवता व संविधान मूल्यांचा सम्यक अनुबंध; हा मौलिक ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. या ग्रंथामुळे त्यांच्या भूमिकेतील विचार सूत्रांचा विस्तार वाढलाय. विवेक चिब्बर, सेलिंग एस हॅरीसन, कार्लाइल, मार्क्स, डॉ हर्बर्ट बेन्सन, एडविन सेलिग्मन, डॉ रिचर्ड डेव्हिडसन अशा पाश्चात्य विद्वानांच्या संदर्भासह असंख्य भारतीय विद्वानांच्या मतांचा सन्मान या ग्रंथात केला गेलाय. मायावती, प्रकाश आंबेडकर, चंद्रशेखर आझाद, जिग्नेश मेवाणी पासून योगेंद्र यादव व ग्रंथपाल रेगे पर्यंतच्या अनेक व्यक्तींचे संदर्भ इथे अर्थपूर्ण ठरलेत. भीमराव सरवदे यांनी जे एन यु विद्यापीठाच्या चारित्र्यापासून न्यायालयीन कॉलेजियम पद्धती पर्यंतचे वास्तवातील ज्वलंत प्रश्न ऐरणीवर आणलेत. असंघटित कामगार, कोरोना काळातील टाळेबंदी, नवबौद्ध, बौद्ध संस्कृतीकता, आंबेडकरी चळवळीतील संवाद-विसंवादाचे द्वंद्व अशा असंख्य प्रश्नांचा सम्यक वेध घेऊन विवेकी विचारांचे नवे दर्शन भीमराव सरवदे घडवू पाहतात. कर्मठ आंबेडकरवाद्यांची दिशा दुरुस्त करून विवेकी नवआंबेडकरवाद रुजवण्याचा लेखक सरवदे यांचा ध्यास मला वंदनीय वाटतो.

पुस्तकःआंबेडकरी चिंतन; लेखकः भीमराव सरवदे
प्रकाशकः कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठेः १२८मूल्यः रु. १३०/-

**डॉ. श्रीपाल सबनीस, ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष**

# सर ती बेलवाली कविता एकदा म्हणा ना...!

आधुनिक केसरी

**कोरोना..कधी स्वप्नातही विचार केला नव्हता अशा भयानक स्थितीतून संपूर्ण जगाला मार्गक्रमण करावे लागले, आजही जेव्हा कोरोना हा शब्द उच्चारला जातो तेव्हा डोळ्यासमोर असंख्य दुःखदायक त्रासदायक घटना,प्रसंग उभे राहतात लॉकडाऊन, मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंग अशा अनेक गोष्टी या काळात आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनल्या होत्या अनेक कुटुंबाचे आधारस्तंभ, प्रिय व्यक्ती या कोरोनाने हिसकावून नेल्या, या काळात कोरोना योध्यांनी दाखवलेल्या अतुलनीय धैर्याबाबत त्यांचे मानावे तेवढे आभार कमीच होतील. क्षणा भराचीही उसंत न घेणाऱ्या या संपूर्ण मानव जातीचे अखंड धावत असणारे चाकच वर्ष दीड वर्षापर्यंत थांबले होते.**

सातत्याने कार्यशील असणारा मानव समाज घरातच बंदिस्त झाला होता, कारण कोरोनाच्या विळख्याने दोन लॉकडाऊन सर्वांना अनुभवावे,भोगावे लागले या कालखंडाविषयी जेवढे बोलावे तेवढे कमीच.. शालेय जीवनात निबंध लिहीत असताना अनेक विषयांपैकी एक विषय असायचा तो म्हणजे शाळा बंद झाल्या तर..एकेकाळी ची गोष्ट स्वप्नवत वाटायची ती गोष्ट दुर्दैवाने सत्यात उतरली होती ती कोरोनामुळे संपूर्ण विश्वच थांबलं होतं त्याला शाळा तरी कशा अपवाद राहतील.. ? चिमुकल्या बाळगोपाळांच्या किलबिलाटाने शाळा नेहमी गजबजलेल्या असायच्या, इथल्या मूर्त भिंतींना मैदानांना सगळ्यांना बोलकं करण्याचं दैवी सामर्थ्य केवळ विद्यार्थ्यांमध्येच असते,पण कोरोनामुळे हे सगळं थांबलं होतं शाळा विद्यार्थी शिक्षक हे समीकरण काही काळासाठी बिघडवून टाकलं होतं ते कोरोनाने.. माझ्या काशिनाथराव पाटील जाधव प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडलं आणि नंतर लगेचच पहिल्या लॉक डाऊन ची घोषणा झाली, परीक्षेआधीच शाळेला सुट्टी लागली या आनंदात असणारे विद्यार्थी आता कधी हा कोरोना जाईल आणि कधी आम्ही आमच्या शाळेत परत जाऊ अशीच आतुरतेने वाट पाहत होते. विद्यार्थी पालक शिक्षक, सर्व काही सुरळीत व्हावे आणि शाळा सुरू व्हाव्यात याची आतुरतेने वाट पाहत होते, त्याच अनुषंगाने मी आता तरी शाळा सुंरू झाल्या पाहिजे ही कविता लिहिली होती व याच कवितेचा एक सुंदर व्हिडिओ सुद्धा बनवला होता. विद्यार्थी पालक वाचक मित्रपरिवार यांनाही कविता खूप आवडली होती थोड्याफार प्रमाणात ही कविता व्हायरल ही झाली होती, कोरोनाचे प्रमाण थोडे कमी झाल्यानंतर शासकीय निर्देशानुसार काही नियम व अटी सहित शाळा सुरू करण्यास परवानगी देण्यात आली होती. शाळा सुरू झाल्यानंतर असेच एके दिवशी अनुष्का डोळस व आदिती भोसले या दुसरी इयतेतील चिमुकल्या विद्यार्थिनी माझ्याकडे आल्या व म्हणाल्या सर ती बेलवाली कविता एकदा म्हणाना..
अर्थात कवितेला नाव आता तरी शाळा सुरू झाल्या पाहिजे असं दिल होतं, पण या कवितेचा व्हिडिओ बनवत असताना मी बेल वाजवून कवितेची सुरुवात केली होती, त्यामुळेच या चिमुकल्या अनुष्का व अदिती बेलवाली कविता असं म्हणाल्या असाव्यात, मग काय बाल रसिकांसमोर

**कान आतुर झाले होते या बेलचा आवाज**
**ऐकण्यासाठी डोळेही आसुसले होते**
**चिमुकल्यांनी भरलेलं शाळेचे मैदान**
**पाहण्यासाठी जसे फुलांविना बागेला शोभा**
**नाही तसेच मुलांविना शाळेला शोभा नाही**

या कवितेच्या काही ओळी ऐकवल्यानंतर त्यांनी वाजवलेल्या टाळ्या, त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, सर खूपच छान कविता आहे.. हा निरागस प्रतिसाद मनाला मनस्वी आनंद देऊन गेला, मुळात कुठलीही



साहित्यकृती ही निरपेक्ष निस्वार्थ भावनेतून आणि आत्मिक समाधान देण्यासाठी निर्माण करायची असते ना की कोणत्या पुरस्काराच्या अपेक्षेने.. परंतु सात आठ वर्षाचे अनुष्का आदिती सारखे चिमुकले चाहते रसिक जेव्हा तुमच्या कलाकृतीला अशी मनमुराद निरागस दाद देतात,सोबतच कु ऋतुजा मगर हिच्या सारख्या तुमच्या विद्यार्थिनीच्या बाल कवयित्रीच्या कविता जेव्हा दोन वेळा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना साठी निवडल्या जातात तेव्हा त्यापेक्षा कोणताच पुरस्कार मोठा नसतो, आणि याच सदिच्छा तुम्हाला लिहीत ठेवण्यासाठी प्रेरणादायी ठरतात आणि या बेल वाल्या कविता काळजात कायमच घर करतात...!

**प्रविण दाभाडे पाटील**
संपर्क क्र. 8805463143

# भक्तीचा सुगंध दरवळणारा... श्रावण मास



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**अधिक मास संपून आज निज श्रावण मास म्हणजे नियमित येणारा श्रावण महिन्यास सुरुवात होतेय. व्रत वैकल्ये सुरु होत आहे.... श्रावण महिन्यात निसर्गाने आपले रूप बदललेले असते. श्रावण सरी कोसळतात. पाऊसही क्षणात येतो क्षणात जातो. सर्वदूर हिरवे गवताचे गालिचे पसरले असतात. हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमलीचे.....किंवा || श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे क्षणात येते सर सर शिरवे, क्षणात फिरुनी उन पडे.. असे ज्याचे कवितेत वर्णन केले आहे. श्रावण हा सणांचा राजा मानला जातो. श्रावणातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व वेगवेगळे आहे. वातावरण भक्तिमय झालेले असते. भक्तिचा सुगंध दरवळत असतो. श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी त्याचे पूजन आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे.आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे. श्रावणात शिवपूजनालाही खूप महत्त्व आहे. शक्य होईल तसे जोतिर्लिंगाचे दर्शन घेतात.**

त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, भीमाशंकर,या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. अनेक ठिकाणी,मंदिरात, किंवा घरी, रुद्रपाठ करतात. श्रावणी सोमवार, मंगळागौर, जिवतीची पूजा, नृसिंह पूजन, जन्माष्टमी, (गोकुळाष्टमी) राखी पौर्णिमा, नारळीपौर्णिमा, बैल पोळा, याप्रमाणे श्रावणातील सण-उत्सवही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. नवविवाहित स्त्रियांनी श्रावणातील प्रत्येक मंगळवारी करावयाचे सौभाग्यदायी मंगळागौरी ह्या देवतेचे एक व्रत. या व्रतात शिव आणि गणपतीसह गौरीची पूजा करतात. लग्नानंतर पहिली पाच वर्षे किंवा सात वर्षे हे व्रत पाळल्यानंतर या व्रताचे उद्यापन करतात. सुवासिनी स्त्री श्रावणातल्या मंगळवारी आपल्या विवाहित मैत्रिणींसह शिवासमवेत असलेल्या गौरीची पूजा करतात. पहिल्या वर्षी माहेरी हे व्रत करण्याची प्रथा आहे. हे व्रत विशेषतः महाराष्ट्रीय ब्राह्मण स्त्री वर्गात विशेषतः केले जाते. विवाहितमैत्रिणी एकत्र जमून मंगळागौर रात्रभर जागवितात. निरनिराळे खेळ, गाणी, उखाणे इत्यादींनी मजेत दिवस व रात्र घालवितात व दुसरे दिवशी पहाटे पूजा-आरती करून सांगता करतात. हे व्रत सौभाग्यवती स्त्रियांकरिता आहे. 'जय जय मंगळगौरी' म्हणून सोळा वातींची मंगल आरती भक्तिभावाने करतात आणि नंतर हातात तांदूळ घेऊन बसतात व मंगळागौरीची कहाणी ऐकतात. ती कहाणी तात्पर्याने अशी : सुशीला नावाच्या एका साध्वीस मंगळागौरी प्रसन्न झाली व पुढे तिला वैधव्य प्राप्त झाले असताना मंगळागौरीने यमदूतांशी युद्ध करून तिच्या पतीचे प्राण परत आणले आणि तिला अखंड सौभाग्यवती केले. मंगळागौरीच्या भक्तिपूर्वक केलेल्या पूजेचे हे फल होय. ही कहाणी ऐकल्यावर सुवासिनी हातातील तांदूळ देवीला वाहतात. दुपारी मौन आचरून भोजन करतात. पाच अथवा सात व्रते केल्यावर उद्यापन करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील सण आहे.या दिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसापासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते.

एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियम पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध-लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात व आपले संरक्षण कर अशी प्रार्थना करतात. अनंत (म्हणजेच शेष), वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या आठ नागांची या दिवशी पूजा केली जाते. नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करताना महिला या दिवशी महिला घराची स्वच्छता करतात. जमिनी शेणाने सारवितात. अंगणात रांगोळी काढतात. नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात. भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते दूध- लाह्य ह्या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. पुणे - बेंगलोर महामार्गावर कोल्हापूरकडे जाताना, पेठ नाका (इस्लामपूर)पासून उजव्या बाजूला एक फाटा फुटतो. तेथून साधारण २० कि.मी वर बत्तीस शिराळा गाव आहे. सांगली जिल्हातील हा निसर्गसमृद्ध भाग आहे. बत्तीस शिराळ्यापासून जवळच चांदोली अभयारण्य, चांदोली धरण आहेत. जेव्हा पूर्वी नागपंचमीचा हा उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जाई. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित होत. सर्वात उंच फणा काढणारा नाग, सर्वात लांब नाग अशा पकडलेल्या मंडळांना बक्षिसे मिळत. नागपंचमीस नागाचे खेळ पाहण्यासाठी हजारो नागरिक येत. यांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे २ वर्षाच्या बालकापासून ते वयस्कर माणसांपर्यंत सर्वजण न घाबरता गळ्यात नाग घालून फोटो काढत. शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांतही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाखो लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीवप्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेश देऊन सापांना पकडणे, त्यांचा खेळ करणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे, त्यांच्या स्पर्धा भरवणे यांना बंदी केली. तसेच या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन, जिल्हा कोर्ट, वन खाते आणि पोलिसांवर सोपविली.

त्यामुळे काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतीकात्मक मिरवणूक काढली जाते. हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो.हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. नारळी पौर्णिमा हा सण समुद्रकाठी राहणाऱ्या व प्रामुख्याने मासेमारी करणाऱ्या मुख्य कोळी लोकांचा सण आहे. पावसाळ्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो. बोटी जहाजांची वर्दळ या काळात बंद असते. समुद्राचा कोप होऊ नये, जहाजे, नौका सुरक्षित रहाव्यात, समुद्र शांत होण्यासाठी कोळी लोक समुद्राला नारळ अर्पण करतात. महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा अखंड समुद्रकिनारा लाभलेला आहे. या ठिकाणी राहणाऱ्या कोळी लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन किंवा



व्यवसाय हा मासेमारी आहे. ते लोक श्रावणी पौर्णिमेला नारळी पौर्णिमा असे म्हणतात. नारळी पौर्णिमेच्या काही दिवस अगोदर कोळी बांधवांनी समुद्रात जाणे बंद केलं असते. पावसाळ्यात समुद्रामध्ये मासेमारीसाठी उतरणारे कोळी लोकांना समुद्रापासून धोका असतो. त्यामुळे श्रावणी पौर्णिमेनंतर पावसाचा जोर थोडा कमी झालेला असतो. समुद्र हे वरून देवतेच्या वास्तव्याचे ठिकाण मानले जाते. समुद्राची कृपा कोळी लोकांवर रहावी. म्हणून रीतसर पूजा करून वाजत-गाजत सोन्याचा नारळ अर्पण करतात. अशा प्रकारे नारळाची पूजा म्हणजेच निसर्गाची पूजा अर्थात वृक्षवल्ली, आम्हा सोयरे ! जलदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नारळी पौर्णिमा हा सण साजरा केला जातो. गोकुळाष्टमी हा श्रावण महिन्यात येणारा सर्व बालगोपाळांचा आणि गोविंदांचा आवडीचा सण आहे. कृष्ण जन्माच्या या दिवसाला श्रीकृष्ण जयंती, दहीहंडी, श्रीकृष्ण जन्माष्टमी असेही म्हणतात. या दिवशी भगवान श्रीकृष्णांचा जन्म मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपूर्ण भारतात साजरा केला जातो. श्रीकृष्णाचा जन्म श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्री, रोहिणी नक्षत्रावर चंद्र वृषभ राशीत असताना झाला. म्हणूनच या दिवशी गौळणींचा लाडका कान्हा श्रीकृष्ण याचा जन्मोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे.

कृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत असे पुराणात वर्णन आहे. तसेच भगवान श्रीकृष्ण हे वासुदेव आणि देवकीचे आठवे पुत्र होते. यादिवशी बरेचजण गोकुळाष्टमीचा उपवास करतात. सगळीकडेच यादिवशी लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत सर्वचजण 'आला रे आला गोविंदा आला' असा जयघोष करत असतात. दहीहांडी म्हटलं की, आपल्या सर्वांच्याच डोळ्यासमोर दिसतात त्या उंचच उंच दहीहंड्या आणि ती फोडण्यासाठी उभे असणारे गोविंदा. भगवान श्रीकृष्णांना दही, दूध, लोणी हे पदार्थ खूप आवडत असे. श्रीकृष्ण हे चोरून दही खात असे त्यामुळेच कृष्णाला माखन चोर असेही म्हणतात. दही,दूध, लोणी आणि लाह्या हे सगळे एकत्र करून बनवलेला पदार्थ म्हणजे काला. श्रीकृष्ण गायी चरताना स्वतःची व सवंगड्यांची शिदोरी एकत्र करून ते सर्व खाद्यपदार्थ एकत्र करून त्याचा काला करत असे आणि आपल्या सवंगड्यांसह खात असे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला साजरा करतात. गोपाळकाल्याच्या दिवशी दही, दूध, लोणी आणि लाह्या, पोहे,दाणे, लोणचे, मीठ, यांचा काला "गोपाळकाला' करून प्रसाद म्हणून सर्वांना वाटतात.तसेच पंजिरी-( धनापावडर,गुळ,खोबर ,सुंठ,खडीसाखर. ) यांच दिवशी दही दुधाने भरलेली हंडी उंच बांधून ही दहीहंडी सर्व गोविंदा एकत्र येऊन फोडतात.. आपल्या या भारतीय संस्कृतीमध्ये गोकुळाष्टमीला एक अनन्यसाधारण महत्व आहे. वृंदावन, मथुरा, गोकुळ, द्वारका या ठिकाणी तर हा सण खूप मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कारण याच ठिकाणी भगवान श्रीकृष्णांचे जन्मस्थान असल्यामुळे तिथे मोठ्या उत्साहात गोकुळाष्टमी साजरी होते.

हिंदू लोक श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी उपवास करतात. यादिवशी श्रीकृष्णाची पूजा करतात, रात्री उशिरापर्यंत जागतात आणि श्रीकृष्ण जन्माच्या वेळेला रात्री १२ वाजता प्रार्थना, पूजा करतात. कृष्णाच्या लहानपणीचा फोटो किंवा मूर्ती पाळण्यात ठेवतात.

आत्ताच्या या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रिय जगात गोकुळाष्टमी साजरी करताना, दहीहंडी जास्त उंच न बांधता, खाली बांधून तिचा आनंद घ्यावा.जर उंच बांधली असेल तर संरक्षणासाठी उपाययोजना कराव्यात आणि मगच या दहीहंडी फोडण्याच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. कारण दरवर्षी बऱ्याच गोविंदांना यामध्ये आपला जीव गमवावा लागतो.नाचगाण्याचे बीभत्स कार्यक्रमास स्थान नसावे.

# आमच्या शाळेतील स्वातंत्र्यदिन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी सोहळा साजरा करत आहोत. सर्वप्रथम सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या भरभरून शुभेच्छा... या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने काही जुन्या आठवणी आल्या... पुन्हा एकदा बालपणातील तो झेंडावंदन ...तो स्वातंत्र्य दिना सोहळा आठवला... परभणी जिल्ह्यातील दुर्डी या छोट्याशा खेडेगावात माझे प्राथमिक शिक्षण झाले. गावात फक्त चौथीपर्यंत शाळा होती. एकाच वर्ग खोलीत चारही वर्ग भरायचे. आम्हाला दोन गुरुजी होते. गडे गुरुजी व पोपळाईत गुरुजी अशी त्यांची नावे होती. आम्ही त्यांना गुरुजीच म्हणायचो... चौथीचा वर्ग सर्वात मोठा असल्याने आम्हाला बाहेर एखाद्या झाडाखाली बसवून गुरुजी शिकवायचे. आजच्या या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने त्या सर्व जुन्या आठवणी हा उजाळा...**

सकाळी नऊ ते बारा व दुपारी एक ते चार अशी आमची शाळेची वेळ होती. परभणी शहरातून गुरुजी सायकलवर आम्हाला शिकवण्यासाठी दररोज यायचे. गुरुजी शाळेत येण्यापूर्वीच आम्ही त्यांची शाळेत येऊन वाट पाहायचो.आमचे गाव खूप छोटे असल्यामुळे विद्यार्थी संख्या ही तशी खूप कमीच होती... स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन,मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, अशा राष्ट्रीय सणांना शाळेत झेंडावंदन केले जायचे. त्यावेळेला स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिन या विषयी काही माहीत नव्हते. फक्त शाळेत झेंडावंदन आहे एवढेच कळायचे. झेंडावंदन ची आम्ही खूप तयारी करायचो.

स्वातंत्र्य दिनाच्या आदल्या दिवशीच सर्व शाळा ,शाळेचे अंगण झाडून स्वच्छ केले जायचे. आम्ही मुलं -मुली अंगण शेणाने सारवून घेत. सर्वांना त्यात एक वेगळाच आनंद वाटायचा. नंतर शाळेत पताके लावले जायचे. गुरुजी पताक्यांना खळ लावून देत. आम्ही मुलं पताके सुतळीला चिकटत असू... नंतर वेगवेगळ्या रंगातील हे पताके उंचावर बांधले जात. ते पताके पाहतांना आम्हाला खूप आनंद वाटायचा. पताके व शेणाने सारवलेला शाळेचा समोरील परिसर खूप सुंदर दिसायचा.ही सर्व सजावट पाहून शाळेविषयी आपुलकीची भावना मनात निर्माण व्हायची.

आमचे गुरुजी वेगवेगळे देशभक्ती गीत, कविता सादर करण्याची तयारी आमच्याकडून करून घ्यायचे. शाळेतील तयारी होताच आम्ही घरी यायचो. घरी आल्यावर शाळेचा गणवेश आईने स्वच्छ धुतलेला असायचा. एखाद्या पितळेच्या तांब्यात चुलीतील पेटते निखारे टाकून त्या तांब्याने गणवेशाला आम्ही इस्त्री करायचो. आमचे एकत्र कुटुंब असल्यामुळे मी व चार-पाच चुलत भावंड अशी साऱ्यांची इस्त्री करण्याची धांदल उडायची. तो उत्साह खूप वेगळा असायचा. एखादा कोळसा गणवेशावर पडून गणवेश जळायची भीती वाटायची. पण इस्त्री करण्याचीही भारीच हौस असायची... तेव्हा आजच्यासारखे मेहंदी कोन वगैरे नव्हते. मेहंदीचे पानं वाटून हातावर लावत असू... किंवा फार -फार तर गणपती छाप मेहंदी पुड्यातून मेहंदी भिजवून ती काडीने हातावर काढली जायची. गावातील जी काही फुले मिळतील ती पहाटेच उठून गजरा करण्यासाठी आणायचो. जेवढं जास्तीत -जास्त नटता येईल तेवढं नटण्याचा सर्व मैत्रिणींचा प्रयत्न असायचा. हा राष्ट्रीय सण म्हणजे आम्हा मुलींसाठी एक मोठा उत्सवच वाटायचा. सर्व तयारी करून आम्ही पहाटेच शाळेत जायचो.

शाळेत गुरुजींना सर्व प्रकारे मदत करण्यासाठी पुढे असायचो. चबुतऱ्याभोवती रांगोळी काढणे, खुर्चीवर महात्मा गांधीजींचा फोटो मांडणे. या कामात आम्हाला आनंद वाटायचा. त्यावेळी शाळेत फक्त दोन लाकडी खुर्च्या होत्या. व एक लाकडी टेबल होते. आजच्यासारख्या खुर्च्या तेव्हा उपलब्ध नव्हत्या. झेंडावंदन च्या वेळेला सर्व विद्यार्थी रांगेत उभे राहायचे. गावातील काही प्रतिष्ठित नागरिक ही त्यावेळेला शाळेत उपस्थित असायचे. माझे वडील सरपंच असल्यामुळे त्यांच्या हस्ते ध्वजारोहण व्हायचे. ते शाळेतील सर्व मुलांसाठी गोळ्या ,बिस्किट आणायचे.

झेंडावंदन व राष्ट्रगीता नंतर सर्व प्रमुख पाहुण्यांचे ,गुरुजनांचे मार्गदर्शन लाभायचे... शेवटी मुलांना




गोळ्या बिस्किटांचे वाटप केले जायचे. तेव्हा सहसा मुलांना आजच्यासारखे गोळ्या, बिस्कीट, चॉकलेट मिळत नसत . त्यामुळे त्या गोळ्या ,बिस्किटांची अपुर्वाई वाटायची... गोळ्या बिस्किट मिळाल्याच्या आनंदात आम्ही घरी जायचो. अशाप्रकारे आमचा झेंडावंदन खूप आनंदात पार पडायचा. जेव्हा केव्हा मी गावाकडे जाते तेव्हा आवर्जून शाळेकडे पाहते. शक्य झालं तर तिथल्या गुरुजनांची भेट घेते. ती शाळा पाहून पुन्हा एकदा बालपण आठवते. त्या शाळेला महात्मा गांधींचा एक फोटो मी भेट दिला होता. तो अजूनही त्या शाळेत लावलेला आहे. आम्हाला शिकवणारे ते गुरुजी आता त्या शाळेत नाहीत. पण त्यांच्या आठवणी मात्र अजूनही तिथेच आहेत. गडे गुरुजींचे तर निधन झाले. काही महिन्यांपूर्वीच पोपळाईत गुरूजींची भेट झाली. अनेक वर्षानंतरही मी त्यांना ओळखले. माझा आई तू... हा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्याचे सांगितले. त्यांना खूप आनंद वाटला. त्यांनी मायेने डोक्यावर हात ठेवून मला आशीर्वाद दिला.आजच्या या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माझ्या बालपणातील या काही सुंदर आठवणी ....

# आठवांचं गाठोडं



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**प्रिया आज थोडी भावूक झाली होती. तो उगवता दिवसच सोबत आठवांचे गाठोडे घेऊन आला होता.जुन्या आठवणी मनात खोलवर किती दडपल्या तरी ठराविक दिवशी त्या उफाळून वर यायच्याच. मग तिची पावलं आपोआप घराच्या कोपऱ्यात ठेवलेल्या जुन्या कपाटाकडे वळायची. आजही तसंच झालं.ती कपाटासमोर उभी राहिली. ते कपाट जणू तिला आपल्या कवेत घेण्यासाठी पुढे येतंय असच तिला वाटू लागलं. थरथरत्या हातांनी तिने ते कपाट उघडले. बरेच दिवस बंद असल्याने उघडताच आतून वेगळाच दर्प आला. तिने तो वास आपल्या खोल श्वासात भरला आणि खालून वरपर्यंत नजर फिरवली. एका कप्प्यात तिचा पती माधवची कपडे होती. अन दुसऱ्या कप्प्यात तिच्या लग्नातला शालू. ते कपाट दोघांनी सोबत घालवलेल्या क्षणाचे साक्षीदार होते. साडीतील कोणता रंग तिला अधिक खुलून दिसतो. हे तिला तोच सांगायचा.**

ती त्याच्या आवडीची साधी परिधान करायची अन कपाटावरील आरशात स्वतःला न्याहाळताना हळूच पाठीमागून माधव आपला हात तिच्या गळ्यात टाकायचा. आरशातली दोघांची गोड प्रतिमा ती डोळ्यांत साठवायची. मनाचा गाभारा आनंदाने फुलायचा.त्या क्षणाने ती मोहरून जायची. त्यामुळे तिचं रूप अधिकच खुलून दिसायचे. तिला ते क्षण तसेच मुठीत पकडून ठेवावेत असं वाटून जायचं.सगळं छान चाललं असताना नियतीच्या मनात काहीतरी वेगळच होतं.माधवला झालेल्या अपघाताने सगळंच विस्कटलं होतं. त्याने ऐन तारुण्यात जगाचा निरोप घेतला होता.प्रियावर दुःखाचा डोंगरच कोसळला होता.या घटनेला कित्येक वर्षे उलटून गेली होती तरी तिने त्याची कपडे जपून ठेवली होती. कारण त्या कपड्यात तिला तिचा माधव असल्याचा भास व्हायचा. तिने आपला हात हळुवार त्या कपडयाच्या घडीवर फिरवला.अन तो स्पर्श तिला भूतकाळात घेऊन गेला.तिच्यावर जीवापाड प्रेम करणारा तिचा पती,जीवन सखा अचानक एक दिवस हे जग सोडुन गेला हे वास्तव पचवणे तेंव्हा तिला फारच कठीण झाले होते.या आघाताने ती वेडापिसी झाली होती .दोन लहान लेकरं, वयोवृद्ध आईबाप तिच्या पदरात टाकून तो गेला होता. जेमतेम तिशी पार केलेल्या प्रियाला सगळीकडे फक्त अंधार दिसत होता. सात वर्षांच्या संसारात माधवने कुटूंबाला भरभरून प्रेम दिले होते.आईवडीलाच्या सेवेतही तो कुठेच कमी पडला नव्हता, तसाच मुलांच्या संगोपनातही.सुट्टीचा दिवस तर आवर्जून मुलांच्या सोबत घालवयाचा. त्यांनी नवीन काहीतरी शिकावं यासाठी तो सतत धडपडत असायचा. कधी लहान होऊन तो त्यांच्या सोबत खेळायचाही. तिला आपल्याला मिळालेल्या सुखाचा हेवा वाटायचा. खरं तर तिनंहीआपलं जीवन त्याच्यासाठी समर्पित केलं होतं. केसात गजरा माळणं,त्याच्या आवडत्या रंगाची साडी नेसून तयार होणं,डोळ्यातील काजळ, ओठांवरची लाली ,सारं काही त्याच्यासाठीच होतं.पण आता तिच्याजवळ त्याच्या आठवणी शिवाय काहीच उरलं नव्हतं. रात्रंदिवस ती रडत अन नशिबाला कुढत बसायची. अन्नपाण्यावरची तिची वासनाच उडाली होती. खोल गेलेले डोळे, विस्कटलेले केस, कोरडे पडलेले ओठ, कृश झालेलं शरीर. तिचं रूपडंच पार बदलून गेलं होतं. माधवचे म्हातारे आईबाप स्वतःचे दुःख बाजूला सारून तिला आधार देत होते. "प्रिया अशी धीर सोडू नको गं. आमचं झालं गेलं पण तुझ्याशिवाय तुझ्या लेकरांना कोण आहे सांग बाळा! तू अशी रडत बसलीस तर दोन लेकरांचं कोण पाहील ?त्यांना अजून हे जग नीटसं कळलंही नाही तोवरच त्यांचा आधार नियतीने हिरावून घेतला. बाळा शेवटी तुझ्या लेकरांसाठी तुलाच आईबाप व्हावं लागेल. तिलाही वाटायचं, "किती दिवस मी अंधारात बसलेय .त्याच्या आठवणीने डोळ्यातील अश्रू तुटत नाहीत पण तो काही साधा उजेडाचा कवडसाही घेऊन येत नाही की तू अशी का बसली अशी साधी विचारपूसही करत नाही. मला वास्तव स्वीकारावे लागेल. लेकरांसाठी, त्याचे भविष्य घडवण्यासाठी, थकलेल्या त्याच्या आईवडिलांसाठी मला उठावे लागेल, अशी ती मनाशी विचार करत सारा धीर एकवटीत होती. अशी कामाला सुरुवात करायची अन.परत हळवी व्हायची. कारण घरातल्या प्रत्येक कानाकोपऱ्यात त्याच्या आठवणी लपल्या होत्या त्या जाग्या व्हायच्या.नकळत भावनांचा बंध सुटायचा. असं बरेच दिवस चालले होते.या घटनेमुळे शेताकडे लक्ष देणारे आता कोणीच उरले नव्हते. त्यामुळे पीक वाळून चालले होते. माधवच्या ऑफिसमध्ये कागदांची पूर्तता करण्यासाठी तिला बोलावणेही आले होते. काय करावे या विचारात सासरे होते. एके दिवशी तीच सासऱ्यांना म्हणाली, "बाबा आपण दोघे शेतावर जाऊयात. मी काम करेन. तुम्ही आमच्या सोबत रहा. तिचे बोलणे ऐकून त्यांनाही बरे वाटले. त्या दिवशी सासऱ्यांना सोबत ती शेतावर गेली. तिन्हीसांजेची वेळ झाली होती. सूर्यनारायण डोंगराआड लपत होता. त्याच्या सोनेरी छटा ऊसाच्या पात्यावर पडल्या होत्या. वाऱ्याची मंद झुळूक अधूनमधून येत होती. त्या झुळकेने ऊसाची पाती हलत होती. जणू सोन्याची उधळण होत होती. सोनेरी लाटा सळसळ करत असल्याचा भास होत होता. तेवढ्यात पलीकडच्या शेतातील धोंडीराम काकांनी जोरात हाक दिली. "उशिर केला जी शेताकडं यायला". तशी तिची तंद्री उडाली. तिचे सासरे बांधावर टेकत म्हणाले, "व्हय रं, वकुत झाला. अवसान



गळून गेलंय बघ माधव गेल्यापसनं. पर लेकरांसाठी उठावं लागलं. उभं पीक वाळून जायला लागलं. मन रहावंना झालंय बघ. माझ्याही मागं दुखणं लागलंय. शरीर साथ देत नाय. तवा सुनबाईच्या खांद्यावर समधी जबाबदारी टाकावी म्हणतोय. व्हय बरोबर हाय तुमचं. आपणही पिकली पानं, गळून कधी पडल हे बी सांगता यायचं नाय. त्यासनी तुमच्या कडून शिकून घेतलेलं चांगलं हाय. तिनेही बऱ्याच गोष्टी समजावून घेतल्या. त्या दिवसापासून ती रोज शेतावर जाऊ लागली. दिवसरात्र कष्ट करू लागली. तिची ती नाजूक काया उन्हातान्हात पार करपून गेली. नाजूक हाताला भेंगा अन पायाला चिरा पडल्या.पर तिचं काळीजच भेगाळलं होतं त्यामुळे तिला या भेंगाची कसली पर्वाच उरली नव्हती.पण वर्षभर शेतात राबूनही फारसं काही उत्पन्न हाती लागायचे नाही म्हणून तिने शेतीला काही पूरक व्यवसाय करायचे ठरवले. जेणेकरून तिच्यासोबत आणखी चार महिलांच्या हाताला काम मिळेल.त्या ही त्याच्या कुटुंबाचा थोडाफार भार उचलू शकतील. तिच्या या निर्णयाला सासऱ्यांनी पाठबळ दिले. सुरुवातीला तिने बचतगट स्थापन केला. त्याच्या माध्यमातून थोडे कर्ज उपलब्ध झाले. "तिच्याजवळ काही माधवच्या मृत्यूनंतर मिळालेले पैसे होते. घरगूती वस्तू तयार करणे व गोधड्या शिवण्याचे प्रशिक्षण तिने आधी स्वतः घेतले. मग महिलांना शिकवले.तिची या कामासाठी खूप धावपळ व्हायची. कधी कधी यायला तिला उशीर व्हायचा .लगेच भेदक, वासनांध नजरा तिच्यावर पडायच्या. उगाच बसमधून खाली उतरताना जाणीवपूर्वक केलेला स्पर्श तिला जाणवायचा. या गोष्टीमुळे तिच्या मनावर एक भीतीचं सावट असायचं. ती स्वतःच बाईपणाला दोष द्यायची. तिच्या शेजारी राहणाऱ्या शांता काकूला तिन तिच्या मनातील ही सल बोलून दाखवली. त्यावर ती काकू तिला म्हणाली, "सुखात बाईनं कळी असावं पर दुःखाच्या प्रसंगी तिन कणखर बनावं . संसाराचा जू तुझ्या खांद्यावर हाय बाळा. तूच हरलीस तर सारं संपलं बघ.जग काय म्हणतंय त्याकडं लक्ष देऊ नकोस. चांगलं विचार घेण्यासाठी,तुझ्यातलं बळ जागं करण्यासाठी कान उघडं ठेव पण, तुलाच मागे ओढणारे शब्द असतील तर जाणीवपूर्वक बहिरी हो. त्या शब्दांना आत शिरू देऊ नकोस. कोणत्याही परिस्थितीत धीर सोडू नकोस. सगळं चांगलं होईल." असं म्हणत काकूंनी तिच्या डोकीवर मायेनं हात फिरवला तसं तिच्या डोळ्यात टचकन पाणी उभा राहीलं. तिने खूप प्रयत्न करून छोटा उद्योग उभा केला. अनेक महिलांना रोजगार मिळाला. त्यांनी शिवलेल्या गोधड्या परदेशात विक्रीसाठी जाऊ लागल्या. हळूहळू आर्थिक उलाढाल वाढत गेली. परिस्थिती बदलू लागली. प्रियाही अनुभवाने बरंच काही शिकून गेली होती.संसाराचा गाडा तिने सक्षम पणे पुढे ओढला होता. मुले आता मोठी झाली होती. त्यांनाही परिस्थितीची जाणीव होती. दोघांनीही चांगले शिक्षण घेऊन नोकरी स्वीकारली होती. तिने मुलांची लग्ने मोठया थाटामाटात केली.व्यवसायाची जबाबदारी लेंकासुनावर टाकली.आयुष्यभर कष्टलेल्या तिला आता थोडा विसावा हवा होता.आता काही क्षणतरी स्वतःसाठी जगायचं होतं. थकलेल्या सासुसासऱ्यांना आधाराचा हात दयायचा होता. तिने सर्व जबाबदारी लेकसूनावर सोपवली. उर्वरित आयुष्य आनंदात घालवण्याचे ठरवले. तिच्यासारख्या मैत्रणींना सोबत घेऊन तिने अनेक ठिकाणाच्या सहली केल्या. त्या सगळं दुःख विसरून मनमुराद हसल्या अन लहान मुलांसारख्या नाचल्याही.आवडीचा पदार्थ खाल्ला. कधी नव्हे ते त्यांनी अंगावर चांगले ड्रेस चढवले. त्या पोशाखात एकमेकींना पाहून हसल्या आणि मनातून खुशही झाल्या.

खरं जगणं तर यालाच म्हणावं ,आनंदाने गाणं गुणगुणत राहावं हे तिला परिस्थितीने शिकवले होते. वयामानाने सासू सासरे निघून गेले. तिच्या आयुष्यात परत एक पोकळी निर्माण झाली. पण तिनं तेही स्वीकारले होतं.पण तिलाआजही कधी कधी एकटेपणा जाणवतो.तेंव्हा मनापासून तिच्यावर प्रेम केलेला तिचा माधव तिला आठवतो. आपसूक तिची पावलं त्या कपाटाकडे वळतात. आजही तेच झालं होतं. तिच्या लग्नाचा आज पंचेचाळीसवा वाढदिवस होता. ती काही महत्त्वाचे दिवस विसरूच शकत नव्हती. तिने माधवची कपडे घट्ट आपल्या छातीशी धरली. जणू तोच तिला अलिंगन देत होता. "तू आज तो लाल रंगाचा शालू नेसून दाखव ना! असं जणू तिला म्हणत होता." तिनेही आपले पिकले केस छान बांधले. फटफतीत कपाळावर लाल रंगाची टिकली लावली. तो शालू अंगावर टाकला. स्वतःला आरशात पाहिले. डोळ्यांच्या डोहातून आपसूक अश्रूं ओघळले. तिने आपले डोळे घट्ट मिटले. अन माधवचा हात आपल्या गळ्यात असल्याचा तिला भास झाला. अन ती सुखावून गेली-त्या आभासी दुनियेत.

# मानसिक स्वातंत्र्याचे काय...?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**देशाला १५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटीशांच्या अन्यायकारी, व लुटारू शासनापासुन सुटका करून घेतली. व ब्रिटीशांनी भारत कायदेशीर सोडून देऊन देशाला स्वातंत्र्य जाहीर केले. देश स्वातंत्र्य झाला. आपण स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने साजरा करून एक दिवस काही वेळेसाठी का होईना राष्ट्रप्रेम उफाळून आल्या शिवाय राहत नाही. किमान एक दिवस का होईना देशातील जनता स्वातंत्र्य लढ्यात शहिद झालेल्या शहिदांना आदरांजली वाहुन त्यांचा सन्मान केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळून देश स्वातंत्र्य झाला, २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागु होऊन माणुस स्वातंत्र्य झाला. कारण संविधान लागु होण्या अगोदर या देशात माणसाचा माणसाला विटाळ व्हायचा, सार्वजनिक ठिकाणी सर्वजाती धर्मातील लोक एकत्र येऊ शकत नव्हते. खालच्या जाणीतील माणसाचा स्पर्श चालत नव्हता, शिक्षण नोकरी करण्याचा अधिकार नव्हता, सत्य असुन बोलता येत नव्हते, महिलांची परिस्थिती तर त्याहून बिकट होती.**

सर्वासमोर उभे राहता येत नव्हते, माणसासोबत किंवा माणसा अगोदर जेवता येत नव्हते, चौकट ओलांडून जाता येत नव्हते, कोणत्याही प्रकारचे मत मांडता येत नव्हते, घर दार किंवा कोणत्याही संपतीवर कोणताही अधिकार सांगता येत नव्हता, शिक्षण नोकरी तर कल्पना शक्तीच्या पलीकडची गोष्ट होती. परंतु संविधान निर्माण करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर माणसाला केंद्रस्थानी ठेवून संविधान लिहले व स्त्रीपुरुष यांना समान हक्क अधिकार, संधी निर्माण करून बोलण्याचे, फिरण्याचे, शिक्षणाचे, नोकरी चे, धर्माची उपासना करण्याचे स्वातंत्र्य देऊन माणसाला स्वातंत्र्य मिळवून दिले. देशाच्या स्वातंत्र्या बरोबरच मानवी स्वातंत्र्य हि अत्यंत आवश्यक बाब असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ती पुर्ण केली. मानवी स्वातत्र्यांची जाणीव अनेक लोकांना नाही, सुशिक्षित महिलांनी संविधान वाचले नाही, ज्या महिलांसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी राजीनामा दिला त्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना कधी समजून घेतले नाही. ज्या महिला संविधानामुळे शिक्षण घेतात, नोकरी करतात चांगला पगार घेतात त्या महिला म्हणतात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांचे आहेत, ज्या महिलांना पतीच्या व वडिलांच्या संपत्ती मधील हिस्सा बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळवून दिला, माझ्या सही मुळे बापाची संपती भावाला विकताच येत नाही किंवा त्याच्या नावावर करताच येत नाही असे बोलणाऱ्या महिला म्हणतात डॉ बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्यांचे नेते होते. परंतु सही शिवाय संपती विकता येत नाही किंवा नावावर करता येत नाही हा हक्क बाबासाहेब आंबेडकर आणि जे शब्द तोडून पडतात तोही हक्क बाबासाहेब आंबेडकर यांनीच दिलेला आहे याची जाणीव नाही. आरक्षणाचा फायदा घेणारे आरक्षणाला विरोध करतात, आरक्षण ही देन ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचीच आहे आणि विरोध करण्याचा अधिकार ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनीच दिला आहे. थोडक्यात काय तर मानवी स्वातंत्र्याचा उपभोग घेणारे मानवी स्वातंत्र्य कोणी दिले हे मान्य करायला तयार नव्हते यालाच तर मानसिक गुलामी म्हणातात. माणसिक गुलामी म्हणजे स्वतः च्या मेंदुचा कोणताही वापर न करता दुसऱ्या कोणी काहीही सांगत आले तरीही तीच गोष्ट सत्य मानायची, परंतु ती कधी तपासुन बघायची नाही व अंधपणे विश्वास ठेवायचा हिच तर माणसिक गुलामी आहे. याच माणसिक गुलामी मुळे हजारो वर्षापासून शिक्षण, नोकरी, सुविधा, समता, बंधुता, न्याय मिळू शकला नव्हता. माणसिक गुलामी मुळेच तर जाती विषमता, अंधविश्वास, पाखंड, अस्पृश्यता देशामध्ये एवढी फोफावली होती कि माणसाने माणसाला शिक्षण द्यायचा विचार केला तर तो द्रोह होता, सार्वजनिक ठिकाण चे पाणी प्यायचा खालच्या जातीतील लोकांना अधिकार नव्हता, अशी सामाजिक परिस्थिती केवळ मानसिक गुलामी मुळे निर्माण झाली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणसिक गुलामीतून बाहेर येण्यासाठी व मानवी स्वातंत्र्या साठी आयुष्य भर कष्ट केले. आणि मानवी स्वातंत्र्य देऊन त्यामध्ये शिक्षणाचा हक्क दिला.

शिक्षणाचा हक्क मिळणे हा मानवी स्वातंत्र्याचा भाग आहे तर शिक्षणाच्या माध्यमातून एखाद्या बाबींची चिकित्सा करता येणे, सत्य असत्य तपासून बघणे हे मानसिक स्वातंत्र्याचे लक्षण होय. परंपु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मानवी स्वातंत्र्याचा सोईस्कर फायदा घेणारे लोक आजही माणसिक गुलामी मधुन बाहेर यायला तयार नाहीत. आणि माणसिक गुलामी देशासाठी घातक आहे. ज्यांनी १५ ऑगस्ट ला चक्रध्वजाला वंदन करून शहिदांना आदरांजली अर्पण केली, ज्यांना असे वाटते कि राष्ट्राचे हित व्हायला पाहिजे त्यासाठी आपल्याला माणसिक गुलामी तोडणे आवश्यक आहे. जोपर्यंत माणसिक गुलामी तुडणार नाही तोपर्यंत मानवी स्वातत्र्यांचा आनंद उपभोगता येणारच नाही. मानसिक गुलामी तोडली तर देशात धार्मिक व जातीय दंगली होणार नाही, मानसिक गुलामी तोडली तर थोतांड, अंधविश्वास या बाबी लयास जाऊन विज्ञानवाद व तर्कवाद उदयास येऊन देशात वैज्ञानिक निर्माण होतील, मानसिक गुलामी नष्ट झाली तर थोतांड, पाखंड यांच्या नावाखाली भोंदुकडे जमा होणारा हजारो करोडो रुपयाचा पैसा लोक स्वतः चे आरोग्य, शिक्षण, व्यवसाय यावर खर्च करतील व त्यातून सर्वांगीण विकास व्हायला मदत मिळेल. परंतु आजही अनेक लोक जे स्वतः ला सुशिक्षित समजतात ते लोक अज्ञान, विषमता, पाखंड, थोतांड, अंधविश्वास जोपासून भोंदुगीरी करणाऱ्या समोर नतमस्तक होतात. तेव्हाच लक्षात येते याचे शिक्षण वाया गेले. माणसाने नतमस्तक नक्कीच व्हावे पण कोणासमोर यांचेही भाण नसेल केवळ जाती धर्माचा आहे किंवा इतर करतात म्हणून आपण करायचे असे विचार असलेले माणसिक गुलामच आहेत. माणसिक गुलामी तोडण्याचे प्रयत्न महाराष्ट्रात अनेक संतांनी व महापुरूषांनी केले. पण हे एवढे मानसिक गुलाम झालेले आहेत की ज्यांनी माणसिक गुलामी तोडून माणसाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आपले



आयुष्य खर्ची घातले त्याच लोकांना हे गुलाम लोक धर्माचे शत्रु मानायला लागले. मुळात वाईट प्रवृतींचा संबध कोणत्याही धर्माशी असायला नको कसे मत असताना धर्माच्या नावाखाली अंधविश्वास व पाखंड जोपासून त्यांचे संरक्षण करणारे खऱ्या अर्थाने माणसिक गुलाम आहेत. माणसिक गुलामी किती घातक असते हे माणसिक गुलामांना कळत नाही म्हणून तर मुठभर लोकांमुळे ढिगभर ताकदवान लोक गुलाम आहेत. गुलांमाचे मालक ताकदवान, बुद्धीमान बिलकुल नाहीत परंतु त्यांनी ताकदवान व बुद्धीमान लोकांना गुलाम बनवून ठेवले म्हणून त्यांना कोणत्याही शारीरिक ताकतीची गरज नाही. व गुलाम लोक स्वतः मेहनत घेऊन कमवतात आणि थोतांड व पाखंड च्या नावाखाली मालकाला देऊन मालकाला हजारो करोडो रुपयांची कमाई करून देतात. माणसिक गुलामी तोडण्यासाठी महात्मा फुले यांनी आपले आयुष्य खर्ची तर घातलेच परंतु बलशाली लोक शिक्षणाच्या माध्यमातून वाचायला लागतील म्हणून त्यांनी अनेक ग्रंथसंपदा निर्माण करून ठेवली त्यापैकी एक म्हणजे गुलामगिरी व तृतीय रत्न नाटक होय. परंतु महात्मा फुलेंचा फोटोही घरात न आणणाऱ्या लोकांनी महात्मा फुलेंचे गुलामगिरी व तृतीय रत्न नाटक वाचण्याचे धाडस होणार नाही हेही सत्यच आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते गुलामांना गुलामाची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल. परंतु झोपलेल्या माणसाला जागे करता येते सोंग करणाऱ्यांना जागे करता येत नाही. हीच माणसिकता आजही देशात आहे. लोक राष्ट्र राष्ट्रीय संपती, राष्ट्रीय हीत, राष्ट्रीय प्रतीके यांच्या बाबद गंभीर नाहीत परंतु जात धर्म याबाबत ते अतिसंवेदनशील आहेत कारण ते त्या ठिकाणी गुलाम आहेत. हि गुलामी एवढी वाढली की स्वतः ला धर्माचे प्रचारक समजणारे लोक लोकांना शेण खायचे, प्यायचे सल्ले देत आहेत, तरीही लोक ऐकून घेत आहेत, आरोपी इतर जाती धर्मातील असेल व त्याच्या कडून एखादा शब्द चुकिचा गेला तर रान उठवणारे लोक मात्र धर्माचे ठेकेदार बुद्धीला न पटणारे विधाने करतात आणि त्यांच्या विरोधात काही बोलण्याची हिंमत होत नाही ही माणसिक गुलामी होय. देशाचा विकास हा लोकांच्या एकंदरीत विकासावर अवलंबून असतो. देशाला स्वातंत्र्य मिळाले, मानवाला स्वातंत्र्य मिळाले परंतू मानसिक गुलामीमधुन अजूनही लोक बाहेर यायला तयार नाही. याचाच परिणाम मानवी स्वातंत्र्यावर होत आहे. ज्यांना मानवी स्वातंत्र्यच मान्य नव्हते अशी व्यवस्था लोकांना माणसिक गुलाम म्हणून तर मजबूत करत आहे परंतु मानवी स्वातंत्र्यावरही अनेक बंधने येत आहे. हे बंधने आणण्यासाठी ठेकेदार लोक माणसिक गुलामांचा वापर करून स्वतः चा फायदा करून घेत आहेत. यामध्ये नुकसान हे गुलामांचेच आहे परंतु हे त्यांना कळत नाही. त्यांना कळत जरी नसले तरीही जेव्हा राष्ट्रहीताचा, एकतेचा, समतेचा, बंधुभाव व न्यायाचा विषय येतो तेव्हा हे मानसिक गुलाम समोर दिसतातच म्हणून जागृत असलेल्या माणसाला प्रश्न पडतो मानसिक स्वातंत्र्याचे काय?

# श्रावण आणि आरोग्य....



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

**श्रावण म्हणजे चैतन्य, सणवार, उपवास , व्रतवैकल्ये!! आरोग्यं सर्वार्थ साधनम् श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे। क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे। श्रावण हा सणांचा, महिन्यांचा राजा मानला जातो. हिंदू संस्कृतीमध्ये श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्व आहे. श्रावण महिना हा हिंदू धर्मात पवित्र महिन्यांपैकी एक मानला आहे. हा महिना सणवार, व्रतवैकल्यांचा . उपवासाचे महत्त्व धार्मिक कारणांपुरता मर्यादीत नाही तर आरोग्यदायी राहणीमानासाठी असतो.**

मराठी वर्षातील पाचवा महिना म्हणजे श्रावण महिना होय. वैशाखाच्या प्रचंड गरमीतून आषाढाच्या सरीमुळे सर्वांची सुटका होते. शुष्क वातावरणाचे सर्वत्र हिरवेगार होण्यास सुरुवात होते. त्याच वेळी श्रावण मासास प्रारंभ होते. याच विषयी बालकवीनीं आपल्या कवितेत श्रावणमासी, हर्ष मानसी असे सुंदर वर्णन केले आहे. हिंदू धर्मात श्रावण महिन्याला अनन्यसाधारण असे महत्व आहे. या महिन्यात बहुतांश लोकं देव देव करण्याकडे वळतात. मांसाहार खाणारे ह्या महिन्यात वर्ज्य करतात. काही लोकं या महिन्यात केस कापणे देखील टाळतात. पूर्ण महिनाभर हिंदू धर्मातील मंडळी कोणतेही अधर्म होऊ नये याची काळजी घेतात. यामागे धार्मिकसोबत काही वैज्ञानिक कारणे आहेत. जसे की या महिन्यात मांसाहार वर्ज्य करणे. श्रावण महिन्यात संपूर्ण दिवसभर वातावरण ढगाळ असते, बहुतांश वेळा सूर्याचे दर्शन होत नाही. त्यामुळे माणसाचे चयापचय क्रिया मंदावते आणि विविध आजार बळावू शकतात. त्यातल्या त्यात मांसाहार करणे म्हणजे पोटासाठी कठीण आहे म्हणून ते खाणे टाळले पाहिजे. या महिन्यात पाऊस खूप पडत होता. पूर्वी आता सारखी केस कापण्याची दुकानं नव्हती. घरातच केस कापले जात. कापलेले केस घरात राहून अन्नात मिसळले जाण्याची भीती होती म्हणून या महिन्यात फार पूर्वीपासून केस कापणे टाळले जात होते. पण आज कोणी ही आपल्या घरी केस कापत नाहीत, तर दुकानात जाऊन ते केस कापतात. त्यामुळे श्रावण महिन्यात ही नेहमी प्रमाणे केस कापले जात आहे. पूर्वीच्या काळी श्रावण महिन्यात खूप पाऊस असायचा. पूर्वीचे लोकं असे म्हणायचे की, पाऊस असा पडायचा की 'ढगाकडे बघा आणि चुलीपुढे ......'अति पावसामुळे पिण्याचे पाणी खराब होत असत व त्यामुळे जुलाब, कावीळ सारखे साथीचे आजार बळावू शकतात. म्हणून दिवसभर खा - खा न करता एकवेळचे जेवण करणे किंवा दोन - तीन वेळा जेवण केल्यास साधे जेवण करण्यावर भर देत असत. पावसामुळे लोकांना शेतात किंवा अन्यत्र कोठे ही जाता येत नसत त्यामुळे गावातच ही मंडळी एकत्र येत असत आणि त्यातलाच एखाद्याला वाचन करता येत असे तो रामायण, महाभारत, किंवा अन्य धार्मिक पुस्तकाचे वाचन करीत याला पारायण असे म्हटले जाई. रात्रीच्या वेळी देखील काही वृद्ध मंडळी एकत्र येऊन पोथी वाचन ऐकण्याचे काम करीत. या महिन्यात सोमवारी शिवलिंगाचे म्हणजे महादेवाचे पूजन केल्या जाते तर शनिवारच्या दिवशी हनुमानाची पूजा केली जाते. सोमवारी आणि शनिवारी महिला मंडळ उपवास करतात तर काही पुरुष मंडळी फक्त शनिवारचा उपवास धरतात. तर काही मंडळी महिनाभर एकवेळचे जेवण " नक्त" किंवा एक भुक्त राहतात. त्यामागे दुसरे तिसरे काही कारण नसून या महिन्यात माणसांची अन्न पचविण्याची शक्ती कमी असते म्हणून असे करणे आपल्या शरीरासाठी योग्य आहे. या महिन्यात नागपंचमी, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी. दीप अमावस्याने सुरुवात झालेला महिना पिठोरी अमावस्येला पोळा या सणाने या महिन्याची समाप्त होतो. याशिवाय मागील काही वर्षांपासून उपवासाचा एक नवाच ट्रेण्ड आला आहे. "स्वार्थ आणि परमार्थ " याची सांगड घालत , एरवी तोंडावर ताबा राहत नाही आणि त्यामुळे मग वजन कमी होत नाही. पण जर श्रावणात उपवास केले तर आपोआपच उपवास कसा मोडायचा, म्हणून तोंडावर नियंत्रण राहील आणि त्यामुळे मग वजनही आटोक्यात राहील, असा विचार अनेकजणी करत आहेत. त्यामुळे आता डाएटींगचा उत्तम पर्याय म्हणूनही काही जणी श्रावणातल्या उपवासांकडे पाहत आहेत. तुमची श्रद्धा असेल, तर उपवास जरूर करा. पण आपल्याला तो उपवास चालतोय ना, आपल्या आरोग्याला तो मानवतोय ना, याची काळजी जरूर घ्या. ....सुंदर साजिरा श्रावण आला.... असं म्हणत श्रावण महिन्याला सुरूवात झाली आहे. व्रतवैकल्यांनी सजलेला श्रावण महिना म्हणजे महिला वर्गाची एकच लगबग. पुजाअर्चा, व्रतवैकल्ये, देवदर्शन आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे उपवास ही श्रावणाची वैशिष्ट्ये. करतात. अन्नपदार्थ तयार करतांना फोडणीमध्ये लसूण, आले, हिंग, जिरे, कोथिंबीर, पुदिना, सैंधव मीठ यांचा योग्य वापर जरूर करावा. शक्यतो सुकी उसळ या स्वरूपात न खाता, रस्सा असेल अशा स्वरूपात कडधान्ये या ऋतूत सेवन करावीत. श्रावण महिन्यात शक्यतो कडधान्ये रोज खाणे टाळावे. शरीरातील त्रिदोष, मल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पचनशक्ती यांची अवस्था जाणून घेणे आवश्यक ठरते. आपल्या वैद्यकशास्त्राचा मूलभूत पाया वात, पित्त, कफ या दोषत्रयींवर अवलंबून आहे. वर्षांऋतूच्या काळात हा वातदोष बिघडण्याचा काळ असतो, शरीरातील पित्त संचित होण्याचा काळ असतो व सर्वत्र असलेल्या ओलाव्यामुळे कफाची ,पाणीयुक्त घटकाची पातळी वाढत असते. या श्रावण महिन्याच्या दरम्यान सर्वधर्मीय भारतात, संस्कृतीचा, परंपरेचा व धार्मिकतेचा वारसा चालवताना हिंदू, मुस्लीम, पारसी, जैन या अशा सर्वधर्मीयांचे एकादशी, नारळीपौर्णिमा, नागपंचमी, रमजान, पर्युषण असे उत्सव व सण साजरे केले जातात. विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची देवाणघेवाण व रेलचेल या काळात या सर्व समाजात दिसते. पचन व्यवस्थित झाल्यावरच आपल्याला मिळणारे बळ व शक्ती ही आपल्या आहारातून मिळते. आहार सेवन केल्यावर, शरीरात त्याचे पचन होते. त्यापासून पोषक घटक शरीरात शोषून घेतले जातात.

बहुधा श्रावण महिन्यात , वर्षांऋतूमध्ये शरीरातील अग्नीदेखील काहीसा मंद होतो. परिणामी भूक मंदावते आणि पचनक्रिया कमी प्रमाणात होते. विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची देवाणघेवाण व



रेलचेल या काळात दिसते.संपूर्ण वर्षभरात उपलब्ध नसतील एवढे खाद्यपदार्थ श्रावण महिन्याच्या काळात निसर्गात निर्माण होतात. आपल्या शरीरातील बदलांचा परिणाम त्रासदायक होऊ नये यासाठी निसर्ग तयार असतोच. निसर्गात अनेक भाज्या , फळे उगवतात. जे शरीराला हितकर असते. त्यांचाच वापर आपण देवाला अर्पण करण्यासाठी करतो आणि त्यापासून बनविलेल्या पदार्थांचा, या ऋतूतील श्रावणसरी अनुभवताना आपण त्यांचा आस्वादही घेतो. श्रावण महिन्यात ज्या पदार्थांच्या सेवनाने आपले आरोग्य टिकून राहण्यास मदत होते त्यांचाच वापर केला जातो.वर्षभराचे धान्य गोदामात, कोठारात , घरातील कोठीच्या जागेत जेथे ओलावा अत्यंत कमी असतो अशा ठिकाणीं साठवले जाते. पावसाळ्यात ओलावा, दमटपणा वाढल्यामुळे हे धान्यकण थोडेसे ओलसर होतात. या धान्यापासून बनवण्यात येणारी पोळी, भाकरी बनवण्यासाठी ते कोरडे असणे आवश्यक असते. हे पचावेत म्हणून थोडेसे ओलसर झालेले धान्य- गहू, तांदूळ, नाचणी, ज्वारी, बाजरी, मका हे कढईत कोरडे भाजून ,थंड झाल्यावरच त्यांचे पीठ करावे ह्यालाच 'भाजणी ' म्हणतात. द्विदल धान्ये म्हणजेच कडधान्ये. म्हणजे मूग, मसूर, तूर, चवळी, मटकी, कुळीथ, चणा, हरभरा इत्यादी. हि कडधान्य पावसाळ्यात पचायला जड, म्हणून त्या आठ ते दहा तास भिजवणे गरजेचे असते. भिजल्यानंतर त्यांचा दाणा फुलतो मोड येतात . त्यानंतर त्यांच्यापासून उसळी, कोशिंबीर, सूप, सार, कढण, आमटी असे वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. प्रत्येकाने आपल्या पचनशक्तीप्रमाणे यांचा वापर करावा. धान्य पूर्ण शिजलेले आहे याची खात्री करावी. पदार्थ पचण्यास हलका व्हावा यासाठी फोडणीमध्ये लसूण, आले, हिंग, जिरे, कोथिंबीर, पुदिना, सैंधव मीठ यांचा वापर जरूर करावा. पालेभाज्या, फळभाज्या, कंदमुळे जरा जपूनच खावीत. श्रावण महिन्यात सगळीकडे पाणीच पाणी असते आणि त्यामुळे ओलावा असते. पावसाळ्यात म्हणजेच श्रावणात चाकवत, अळू, तांदुळजा, अंबाडी, शेवग्याचा पाला, कंटोली,शेपू, भाज्यां मिळतात. इतर नेहमीच्या भाज्या वर्षभर उपलब्ध असतातच, मात्र या भाज्या श्रावणातच भाजी मंडईत खासकरून मिळतातच. यातील प्रत्येक भाजीमध्ये स्वतःचे विशिष्ट गुण असतात. आपल्याकडे पान वाढताना, डाव्या बाजूस मीठ ( सैंधव ), लिंबू, ओल्या नारळाची, पुदिन्याची चटणी, कारल्याचे, मिरच्याचे,पंचामृत, कोशिंबीर , रायते उजव्या बाजूला भाजी उसळीअसे विविध प्रकार वाढले जातात. श्रावण महिन्याचे व व्रतवैकल्य , उपवासाच्या पदार्थांचे वेगळेच नाते असते सणवाराप्रमाणे नैवेद्याचे पदार्थ तयार केले जातात. यामध्ये पिष्टमय पदार्थ, तसंच गोड पदार्थांचा समावेश होतो. वेलदोडे, मिरे, दालचिनी घालण्याने अन्नपचनास मदत होते.

श्रावणात सारखाच ऊनपावसाचा खेळ सुरू असतो. पावसामुळे सर्वत्र चिखल, गढूळ पाणी असल्याने उघडयावरील पदार्थ, उसाचा , फळांचा रस, उघडयावरील कापून ठेवलेली फळे , टाळावेतच .

श्रावण महिन्यातील उपवास करताना दूध वापरतातच . ते केव्हाही पिताना शक्यतो गरम अथवा कोमट प्यावे. हळद, केशर, वेलदोडा, सुंठ असे पदार्थ घालून दूध उकळून पिणे नक्कीच उत्तम. पावसाळ्यात नद्यांना पूर येतो व समुद्र खवळलेला असतो. मासेमारी हा व्यवसाय अंशतः बंद असतो. या काळात मासे अंडी घालतात व अंडयातून निर्माण होणाऱ्या माशांमुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. म्हणूनच मांसमच्छी खाणाऱ्यांनी ही मासे खाऊ नयेत. मत्स्याहार व मांसाहार यात मोठया प्रमाणात तिखट, तेल मसाला वापरला जातो. यामुळे शरीरात चरबी वाढते. हे पदार्थ पचायला जड असतात. माणसाची पचनशक्ती कमकुवत झालेली असते हे लक्षात घेऊनच श्रावण महिन्यात असा आहार, निषिद्ध मानला आहे. श्रावणातल्या या सणांमध्ये नागपंचमीला पुरणाचे उकडून दिंड, भाजणीची थालीपीठ, गरमागरम खिचडी, तूप . नारळीपौर्णिमेला नारळ आणि गूळ यांचा वापर करून केलेला नारळीभात . मंगळागौरीच्या प्रसंगी पुरण, वरण , मटकीची उसळ करंज्या चकल्या लाडू असे जड पदार्थ खाल्ल्या वर ते पचावेत म्हणूनच मंगळागौरीचे खेळ खेळत असावेत. सणावारा प्रसंगी गरमागरम ताजे शुद्ध सात्विक अन्न खाल्ल्याने पचनशक्ती चांगली राहते त्यासाठी चविष्ट कमी तेलातले, कमी मसालेदार पदार्थ खावे. वात-पित्त-कफ या दोषांचे निराकरण करण्यासाठी पचनशक्ती उत्तम ठेवावी . निसर्गाने दिलेल्या भरभरून दानाचा आपण योग्य तो वापर आपल्यासाठी केला तर आपल्यालाच उपयुक्त ठरतो. लेखाच्या शेवटी श्री दर्शन जोशी यांची ही कविता श्रावणाचे वर्णन करणारी, अगदी चपखल बसते.....

**सणासुदीचं दाराला सये लागू दे तोरण**
**सुख सौभाग्य घेऊन आला श्रावण श्रावण !**
**हृदयात सखे तुझ्या आज नाचतो श्रावण !**
**लक्ष्मीच्या तोंडावरी भरभरून समाधान !**
**काढ़ दारात रांगोळी कर सड़ासंमार्जन !**
**फूल ,बेलाच गं पान महालक्ष्मीला अर्पण !**
**कर लहान थोराला भर भरुन औक्षण !**
**गोड़ा धोड़ाच ताटात खीर , लाडू नि पुरण !**

# जेव्हा डोळे भरुन येतात..



सोनू दरेगावकर
संपर्क क्र. 7507161537

आधुनिक केसरी

**मातृत्वाच्या भूमीमध्ये आई नावाची एक संकल्पना आहे, त्या संकल्पनेमधून मनुष्य नावाचा घटक तयार होतो. जेव्हा आई बाळाला जन्म देते, तिला होणाऱ्या वेदना ती सहन करून आपल्या पोटात असणाऱ्या बाळाला जन्म देते. आईला होणाऱ्या वेदना सहन करण्याची शक्ती तिच्यामध्ये तयार होते. डोळ्यातून येणाऱ्या अश्रूच्या धारा काही वेळासाठी त्या त्रास देतात, परंतु काही वेळात माझा बाळ जन्माला आला म्हणून आनंदाच्या अश्रू सुद्धा दाटून येतात. बाळ जन्माला घातल्यानंतर चोहीकडे आनंद पेरला जातो, त्या आनंदामध्ये कौटुंबिक वातावरण अतिशय मनशांतीचं प्रतीक बनलेला असतं. बाळ थोडं-थोडं मोठं व्हायला लागलं तेव्हा त्याला आपण बोबड्या शब्दांमध्ये बोलायला शिकवतो.**

त्याचा हात धरून आपण त्याला चालायला सुद्धा शिकवतो. पाळण्याची दोरी घेऊन त्याला आपण आपले चांगले संस्कार आणि चांगले विचार देतो. एवढं सर्व करून सुद्धा आज कालच्या दुनियेमध्ये खरोखरच चांगल्या संस्काराची मुलं निघतील का ?
हा मात्र प्रत्येक आई-वडिलांना प्रश्न पडत आहे. खरं पाहता माणसाच्या जीवनामध्ये वेदना नावाचा एक आजार अंगामध्ये शिरला आहे. कारण जीवन जगावं कशासाठी ते सुखासाठी जगाव का दुःखामध्येच राहावं अस अजून सुद्धा अनेकांना खरं जीवन समजलं नाही. कारण प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये दुःख आणि सुख ही संकल्पना नैसर्गिक आहे. परंतु जरी ती संकल्पना नैसर्गिक असेल तिला कशा प्रकारे हाताळता यावी म्हणून त्यावर उपाययोजना सुद्धा आपणच करू शकतो हे सुद्धा विसरता कामा नये. मानसिक ताण-तणावात जीवन जगणारी माणसं काही काळच जीवन जगू शकतात. म्हणून जीवन जगत असताना जगण्याचा एवढा आनंद घ्यावा की, आनंद सुद्धा आपल्याला कंटाळून जावा कारण मानसिक त्रासामध्ये जीवन जगू लागलो तर नवीन येणारी पिढी आपल्याकडून कोणते संस्कार घेतील हे सुद्धा स्वतःला आपण विचार करावा लागेल. काळाप्रमाणे जीवन जगावं लागतं प्रत्येकासोबत चांगलंच वागाव लागत, प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न असतं की, आपली मुलं कुठेतरी आपल नाव रोशन करतील, ते करण्यासाठी त्यांना चांगले संस्कार चांगले विचार चांगली संगत आपण खरोखरच त्या गोष्टीची त्यांना ओळख करून देतो का ? हे सुद्धा कुठेतरी तपासन गरजेचं असतं. कारण हे जर तपासलं तर आपण खरंच आपल्या मुलाबाळांना योग्य शिकवण देणारी एक संस्कार पेरणारी संस्था बनू शकतो.
पुढे मूलबाळ शिक्षण शिकून जेव्हा मोठी होतात, तेव्हा मात्र आई-वडिलांच्या डोळ्यांमध्ये आनंदाचे अश्रू दाटून येतात. आजकाल बोटावर मोजण्या इतकी मुलं आहेत की, आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून त्यांची सेवा करण्यासाठी तत्पर पुढे असतात, परंतु काही मुलं आई-वडिलांना विसरून त्यांना अनाथ आश्रमामध्ये पाठवण्याची काम आजच्या पिढीमध्ये खूप वेगाने वाढत आहे. अस पाहायला मिळतो.

याची मात्र खूप मोठी खंत आहे. जे काही आपण आपल्या जीवनामध्ये यश संपादन केलं त्याचे खरे हकदार कोण असतील तर ते आपले आई-वडील परंतु आजचा जमाना एवढा स्वार्थी आणि लबाडू निघाला की, तो आपल्या जन्म दिलेल्या आई-वडिलांना त्यांच्या डोळ्यासमोर आनंद पेरण्यापेक्षा दुःखाच्या वेदनेचा डोंगर त्यांच्या समोर ठेवला. जी मुलं आई-वडिांवर जीवापाड प्रेम करतात ती मुलं जेव्हा आई वडिलांवर बोलत असताना ओठावरच्या शब्दांनी डोळे ओले करतात, असे शब्द त्यांच्या ओठातून निघतात मायेचा जो आधार असतो जेव्हा ते व्यक्त होतात. तेव्हा या जगामध्ये मुलांना कितीही मोठा सन्मान मिळालेला तो मोठा सन्मान नसून परंतु आई-वडिलांच्या उपकाराची जाण जी माणसं ठेवतात त्या माणसासाठी आपले आई-वडील तेच आपला सन्मान म्हणून जीवन जगताना पाहायला मिळतात. रस्त्याने चालताना ठेच जरी लागली तरी तेव्हा आपल्या आईची आठवण आपण लगेच काढतो. "आई ग" असा शब्द नकळत आपल्या तोंडातून बाहेर पडतो. पुन्हा एका रस्त्यावरून दुसऱ्या रस्त्याकडे जात असताना भर वेगाने जर आपल्यासमोर मोठा ट्रॅक जर आला तर "बापरे" असा शब्द आपल्या तोंडून निघतो. जेव्हा जेव्हा आपल्यावर संकट येतात तेव्हा तेव्हा आपल्या आई वडिलांची आठवण मनातून



आणि शब्दातून व्यक्त होते. मग जेव्हा संकट असताना आपण आपल्या आई-वडिलांची आठवण काढतो, मग जेव्हा आपण आनंदामध्ये असतो तेव्हा सुद्धा आपल्या आनंदामध्ये त्यांना सामावून घेणं हे सुद्धा प्रत्येक मुला मुलीचं कर्तव्य आहे. त्यांच्या डोळ्यात येणार पाणी आपल्याला पुसता आलं पाहिजे कारण लहान असताना जेव्हा आपण खाली पडायचं तेव्हा रडायचं परंतु जेव्हा आपण रडत होतो तेव्हा आपले डोळे पुसायला आपला बाप किंवा आई धावत धावत येऊन आपले डोळे पुसून आपले रडणे बंद करायचे. मग आपण एवढे मोठे होऊन सुद्धा ज्यांनी आपले डोळे पुसले त्यांचे डोळेच भरून येणार नाहीत. असं आपलं वागणं जोपर्यंत बनवणार नाही तोपर्यंत आयुष्यामध्ये आपल्याला सुद्धा सुख नावाची संकल्पना कधीच कळणार नाही. कारण जी माणसं आपल्याला कष्टातून घडवली जीवाचं रान करून त्यांनी आपल्या जीवनाच सोनं केलं, मग त्यांचा जर विसर पडला तर आपल्या जगण्याला काहीच अर्थ राहणार नाही असे सुद्धा मनाला वाटते. जीवन जगत असताना कधी कधी काही गोष्टी सोडून द्यायच्या असतात. जर का त्या गोष्टी आपण सोडलो नाही तर येणाऱ्या नवीन गोष्टी आपल्याला शिकायला खूप अवघड जातील कारण काही गोष्टींमध्येच आपण गुंतून गेलो असतो, त्यापासून आपल्यावर होणारा विपरीत परिणाम आपल्यालाच धोकादायी बनवतो. याची सुद्धा आपल्या मनाला कल्पना देण्यासाठी सुचक केंद्र म्हणून सावधगिरीने वागण्यासाठी हा मोलाचा संदेश सुद्धा आपल्या आयुष्याला सुंदर जगणे बनवण्याचा मुख्य घटक म्हणून सुद्धा ठरू शकतो.
अनेकांसोबत टिंगल टवाळी करण्यापेक्षा अनेकांचे कौतुक करायला जर आपण शिकलो तर आपण सुद्धा अनेकांच्या नजरेमध्ये ग्रेट आणि या जगामध्ये श्रेष्ठ या यादीमध्ये समाविष्ट होण्यासाठी आपल्याला सुद्धा वेळ लागणार नाही. त्याचं कारण ज्या माणसांना आपण जाणून बुजून त्रास देतो जाणून बुजून त्याचा अपमान करतो त्या माणसाकडून आपल्याविषयी भावना कधीच निर्मळ मनाची नसते. म्हणून एखाद्याचं आपल्याला चांगलं करता येत नसेल तर त्याचं वाईट करावं हा कुठेही नियम लिहून ठेवलेला नाही. म्हणून जर आपल्या न कोणतीच गोष्ट सिद्ध होत नसेल तर आपण गप्प बसाव. अनेकांच्या मनात आपल्याविषयी वैर नसावं. जीवनाचा सारांश लिहीत असताना अगदी ओले चिंब होऊन डोळे भरून येतात कधी दुःखाचे तर कधी सुखाचे काही प्रसंग मनाच्या अवतीभोवती फिरतात मनाला विचलित करण्याचा प्रयत्न करतात. परंतु मनाच्या तंत्रज्ञानावर एवढा मंत्र टाकलेला आहे की, जगणं कितीही कठीण असलं तर त्या जगण्याला मी कठीण मानणार नाही. त्याचं कारण जीवन कठीण व सुखमय दोन्ही गोष्टी मानवापासून निर्मिती झालेल्या गोष्टी आहेत म्हणून कठीण परिस्थितीवर मात करून मी आनंददायी जीवन जगण्याचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करील आणि नुसता प्रयत्न करत नसून तो मिळवण्याचा हक्क सुद्धा माझ्या मनामध्ये मला सातत्यपूर्ण ऊर्जा प्राप्त करून देणारा माझा विश्वास आहे. म्हणून जगण्यावरच्या गोष्टी चा विचार करताना माणसाच्या आयुष्यातलं दुःख वेचून जाता जाता कधी पेचून गेलं हे अनेकांना कळलच नाही म्हणून तर दुःखाचं आणि सुखाचं मित्रत्व कधी जुळलं नाही, म्हणून जेव्हा डोळे भरून येतात. कधी सुखाने तर कधी दुःखाने त्या आलेल्या वातावरणाला कशाप्रकारे व्यवस्थितरित्या सोबत घेऊन सावरायला आणि आवरायला ज्या ज्या व्यक्तीला जमतं त्या व्यक्तीचं दुःखात आणि सुखात आयुष्यभर मन रमत..

# युक्रेन युद्धामुळे बिघडली अन्नपुरवठा साखळी



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**एक वर्ष उलटून गेलेतरीही रशिया व युक्रेनमधील युध्द अद्यापही संपलेले नाही. त्याचा परिणाम सबंध जगाच्या शांतता व सुव्यवस्थेवर जसा झाला आहे, तसा जगाच्या जग अन्न सुरक्षेवरहीझाला आहे.त्याचे कारण असे की सबंधजगालारशिया व युक्रेनमधूनगव्हाचा पुरवठा केला जात असे.युक्रेनला सबंध जगाची ब्रेड बटरबास्केट म्हणून ओळखले जात असे. युध्दामुळे प्रश्न सुटत नाहीत, परंतु ते अधिक बिकट होतात, या सत्याची प्रचिती युक्रेन युध्दामुळे पुन्हा एकदा जगाला आली आहे. एकीकडे युरोपीय राष्ट्राने रशियावर निर्बंध लादले, तर दुसरीकडे रशियाने काळया समुद्रात युक्रेनच्या जहाजांची कोंडी केली, त्यामुळे सागर मार्गाने दक्षिण आफ्रिकेला जाणारा गहु हा रस्त्यातच अडकून पडला आहे व तो योग्य वेळी सोमालिया सुदान इ. राष्ट्रांपर्यंत पोहोचू शकत नाही. तसेच युध्दजन्यतणावामुळे प्रत्यक्ष युक्रेनमध्ये होणारे विक्रमी गव्हाचे उत्पादनही घटले आहे.**

आपला जीव वाचविण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी शेजारी राष्ट्रामध्ये पलायन केले आहे. या सर्व घटनांचा परिपाक म्हणजे जगभरात अन्न-धान्यांच्या किंमती आकाशाला भिडत आहेत आणि आफ्रिका खंडातील सोमालिया सारख्या देशावर उपासमार आणि कुपोषणाची पाळी आली आहे. युक्रेन हा पूर्वीच्या सोसिएट रशियाचा एक भाग हे भूमी कृषिप्रधान म्हणून ओळखली जाते. युक्रेनला गव्हाचे कोठार असे म्हणतात.युक्रेनमध्ये गव्हाप्रमाणे सूर्यफुल व मका तसेच बार्ली या पिकांचेही भरघोस उत्पादन होते. या कृषिप्रधान देशामध्ये पिकणारा गहु युध्दामुळे घटला आहे. तसेच सूर्यफुलाचे उत्पादन कमी झाल्यामुळे अनेक देशांना मिळणारे खाद्यतेलही कमी झाले आहे व त्याच्या किंमतीही भडकल्या आहेत.

जगामध्ये जेव्हा सर्वंकष युद्ध होते तेव्हा युध्दामुळे अन्नपुरवठा साखळी विस्कळीत होते. तसेच मागणी व पुरवठा यांच्यातील संतुलन बिघडल्यामुळेखाद्यपदार्थांच्या किंमती वाढु लागतात आणि सामान्य माणसाला जगणे अवघड होते. या ना त्या कारणामुळे अमेरिका, युरोप व आशिया खंडातील अनेक देशामध्ये जीवनावश्यक वस्तुंची टंचाई निर्माण झाली आहे; परंतु पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतामध्ये मुबलक अन्नधान्य उपलब्ध असून पाकिस्तान, श्रीलंकेच्या तुलनेत किंमतीही बऱ्यापैकी स्थिर आहेत.

युक्रेनला जगाचे ब्रेड बास्केट म्हणून ओळखले जात असले तरीही युक्रेन युध्दामुळे गहु, मका यांचा पुरवठा कमालीचा घसरला आहे आणि जगभर किंमती वाढल्या आहेत. जेव्हा अन्नधान्याचा पुरवठा कमी होतो तेव्हा व्यापारी लोक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन साठवण आणि किंमत वाढ असे तंत्र वापरतात. या सर्व प्रतिकूल परिस्थितीमुळे आफ्रिकी देशांना टंचाई उपासमार आणि राजकीय अस्थिरतेला सामोरे जावे लागत आहे. एकत्रितपणे रशिया आणि युक्रेन जगातील गहु आणि बार्ली या पिकांपैकी एक तृतीयांश म्हणजे 70 टक्के उत्पादन करत असत. तसेच सूर्यफुल तेलाच्या क्षेत्रात 70 टक्याहुन अधिक उत्पादन या युक्रेनमध्ये केले जाते आणि युक्रेन हा जगातील मका या पिकाचा पुरवठादार देश आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बिकट प्रश्नांची गुंतागुंत सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटना तर शेतीसाठी आवश्यक असलेल्या जगातील अन्न सुरक्षा व पुरवठा साध्यकरण्यासाठी नवी कृषी योजना तयार करण्याचा प्रयत्न करत आहे, परंतुयुध्द काही थांबत नाही, कृषि पुरवठा सुधारत नाही त्यामुळेप्रश्नांची गुंतागुंत कायम राहते. अमेरिका व चीन ही बडी राष्ट्रे संघर्ष मिटवण्याऐवजी युद्धजन्य परिस्थितीत अधिक तेल टाकण्याचे काम करत आहेत. पण त्याचा मोठा फटका गरीब आफ्रिकन देशांना बसत आहे. युक्रेनमधुन गव्हाचे उत्पन्न घटले आहे. शिवाय झालेले उत्पादन सागरी मार्गाने आफ्रिकेपर्यंत पोहोचविणे अवघड झाले आहे. युध्द परिस्थिती बिकट झाली तर, 20 दसलक्ष टन युक्रेनमधील धान्यपुर्व आणि उत्तर आफ्रिकेत पोहोचणे अवघड होईल त्यामुळे गव्हाच्या किंमती आकाशाला भिडतील आणि आफ्रिकेतील सुदान व सोमालियातील लोकांवर उपासमारीची पाळी येईल.

युक्रेनचा गहु काळया समुद्रातील बंदरातुन बाहेर काढण्यासाठी सुरक्षित कॉरिडॉर बाबत चर्चेचे गुऱ्हाळ चालले आहे, पण यातुन फारसे काही निष्पन्न झाले नाही. अमेरिकेतील मॅसॅच्युयेट्स विद्यापीठातील आपत्ती व्यवस्थापन विभागातील संशोधन तसेच कीव स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थांनी केलेल्या संशोधनानुसार पुढील कालखंडात काही सकारात्मकबदल घडण्याची गरज आहे. नाहीतर अन्नपुरवठा साखळी बिघडल्यामुळे तिसऱ्या जगातपरिस्थिती भयंकर गंभीर होऊ शकते. जगातील 400 दसलक्ष लोक युक्रेनकडून होणाऱ्याअन्नपुरवठ्यावर अवलंबून आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या एफ. ए. ओ. म्हणजे फुड ॲण्ड ॲग्रीकल्चर ऑर्गनायझेशन या संस्थेच्या अभ्यास गटाने केलेल्या पाहणीनुसारजगाच्या 41 देशातील 181 दसलक्ष लोक यावर्षी अन्न संकटामुळे भूक व उपासमारीचा सामना करत आहे. यावरुन जागतीक अन्नसंकट किती कठीण परिस्थितीत सापडले आहे. याची कल्पना येथे त्यामुळे अन्नपुरवठा सुधारणेसाठी सागरी मार्गास पर्यायी विमानसेवा, तसेच भूमार्गाने व जलमार्गाने पर्यायी दळणवळण सेवा असे उपाय योजावे लागतील.

युद्ध परिस्थिती तीव्र होण्यापूर्वी युक्रेनच्या शेतातून 90 टक्के गहु आणि इतर धान्य समुद्रामार्गे जागतीक बाजारपेठेत पाठविला जात असे. परंतु रशियाने केलेल्या काळया समुद्रातील नाकेबंदीमुळे हा पुरवठा थांबला आहे. काही प्रमाणात युक्रेनचा गहू युरोपातील शेजारी राष्ट्रातूनरेल्वे मार्गाने पाठविला जात आहे. परंतु सागर मार्गाच्या तुलनेत रेल्वे मार्गाने अशी धान्याची ने-आण करण्यात बऱ्याच अडचणी आहेत. युक्रेनच्या कृषि उपमंत्री मार्कीयन गिनीक्रासेवीच यांच्यामते, युक्रेन युरोपीय देशाला अधिक धान्य निर्यात करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु त्यासाठी डॅन्युग नदीमध्ये अधिक मालवाहु धक्केबांधावे लागतील. एकुण परिस्थिती गंभीर आहे कारण ज्यांना धान्याची गरज आहे, त्यांच्यापेक्षा युक्रेनचे अंतर खुप दुर आहे. एकीकडे रशियावर लादण्यात आलेले जाचक आर्थिक निर्बंध आणि दुसरीकडे रशियाने केलेली युक्रेनची सागरी व नाविक कोंडी यामुळे'काखेत कळसा व गावाला वळसा', अशा विचित्र परिस्थितीतुन युक्रेन जात आहे. युध्दानंतर प्रारंभीच्या काही महिन्यामध्ये युक्रेन फक्त दिड ते दोन दसलक्ष टन धान्य निर्यात करु शकला. पुर्वीपेक्षा ही निर्यात 6 दसलक्ष टनांनी कमी आहे. युक्रेन पेक्षाही रशिया अधिक प्रमाणात युध्दात मग्न आहे. त्यामुळे रशियाचे धान्य बिल्कुल बाहेर पडत नाही. रशियाचे म्हणणे असे आहे की, बँकीग व शिपिंग क्षेत्रामध्ये युरोपने जाचक अटी लावल्यामुळे रशियाला जगात इतरत्र गहु पुरवठा करणे परवडत नाही. जोपर्यंत नाटो अमेरिका व युरोपीय देश हे निर्बंध सैल करत नाही तोपर्यंत रशिया अशीच आडमुठी भूमिका घेत राहील. असे हे दुष्ट चक्र आहे. आई जेवण देत नाही आणि बाप भिक मांगू देत नाही अशी अवस्था गरीब आफ्रिकन देशांची झाली आहे.



या बिकट संकटातुन मार्ग काढण्यासाठी रशिया आणि युक्रेन दरम्यानचे युध्द कसे थांबेल, तणाव कसा कमी होईल, त्यावरच अन्नधान्याचे सुरळीत वितरण अवलंबून असणार आहेत. रशियन सैन्याचे युक्रेनच्या पायाभूत सुविधावरील हल्ले व गोळीबार तसेच शेतकऱ्यांना वाटणारी असुरक्षितता अशा अनेक कारणांमुळे युक्रेनचे शेतकरी शेतावर जाण्यास तयार नाही. काहींनी तर भयापोटी शेजारच्या देशात स्थलांतर केले आहे. अशा प्रकारे अन्न पुरवठा साखळी बिघडल्यामुळे आफ्रिकेतील अन्न परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. रॉयटरने शेतीमधील समस्यांचे वस्तुनिष्ट चित्र रेखाटले आहे. रशियाचे परराष्ट्र मंत्री करगेयी लार्चेरो यांनी असे अभिवचन दिले आहे की, अन्न पुरवठ्याच्या वेळी रशिया आपल्या नौदलाचा दुरुपयोग करणार नाही आणि धान्याच्या निर्यातीमध्ये अडचणी आणणार नाही, असे म्हणाले आहेत. रशियन मंत्री असे म्हणाले असले तरी त्यांच्या उक्ती व कृतीमध्ये अंतर पडते. त्यांचे खाण्याचे व दाखविण्याचे दात वेगळे आहेत. तथापि त्यावर युरोपिय देशांचा विश्वास नाही. गेल्या दोन- तीन वर्षातआफ्रिकेतील अन्नधान्य टंचाईचे संकट कोविड-19 महामारीमुळे बिकट बनले होते. त्यात युक्रेन युध्दाने या सर्व कठिण समस्यांची भर टाकली.खुद्द आफ्रिकेतील अनेक देशामध्ये दुष्काळाने,तापवान वाढीमुळे अन्न धान्याचे उत्पन्न कमालीचे घटले आहे. शिवाय इसीस ते दहशतवादी हल्ले व अंतगर्तत तणावामुळे स्थलांतराची समस्याही वाढली. सोमालिया, लिबिया, लेबनान, इजिप्त आणि सुदान या देशांना युक्रेन युध्दाचा मोठा फटका बसला आहे. कारण त्यांच्यापर्यंत पोहोचणारा युक्रेनचा गहु आता थांबला आहे.

युक्रेन युध्दामुळे अन्नधान्य पुरवठा क्षेत्रातील बिकट प्रश्नांची मालिका उभी आहे. हे संकट आफ्रिकन देशासमोर अधिक भयावह आहे.अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीचा भार त्यांच्यावर पडत आहे हे एक मानवतावादी संकट आहे. उपासमारीच्या दुष्ट चक्रातुन या विकसनशील देशांना कसे सोडवावे, हा संयुक्त राष्ट्रसंघापूढे मोठा यक्ष प्रश्न उभा आहे. उपासमार आणि दुष्काळ दुर करण्यासाठी सुदान आणि यमनला युरोपियन युनियन मदत करत असतांना अन्नधान्य समस्या हाकेंद्रबिंदू आहे. नाहीतर आफ्रिकेत कुपोषणामुळे पुन्हा बालमृत्युचा स्फोट होईल असा इशारा युनीसेफने दिला आहे.

सध्याच्या परिस्थिती सोमालियातील 20 लाखाहुन अधिक लोकांना भूक आणि उपासमारीचा सामना करावा लागत आहे.19 दसलक्ष यमन मधील लोक त्याच मार्गावर आहेत, शिवाय अन्नधान्याच्या किंमती 75 टक्यांनी वाढलेल्या आहेत.शिवाय लोकांना कसे बसे पोट भरण्यासाठी आवश्यक ब्रेड व पाव मिळणेसुध्दा दुरापास्त झाले आहे. या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी काय केले जात आहे, व काय केले पाहिजे, याकडे लक्ष वेधले असता, काही उपाय नोंदविता येतील.संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस अँटोनियो गुपेरस यांच्या मते, रशियाच्या बंदरातून अन्नधान्य पाठवण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. दोन्ही पक्षातून मानवतावादी दृष्टीने आता हे महाभारत थांबविण्यासाठी दोन्ही पक्षांनी मानवतावादी दृष्टीने युद्ध थांबवले पाहिजे. युक्रेनमध्ये शेतात धान्य पिकावे,ते काढले जावे, त्याची कापणी व्हावीव बंदरातून परदेशी पाठवावे. हा नित्यक्रम केंव्हा सुरु होईल, याची आफ्रिकी जगातील गरिब लोक वाट पाहत आहेत. या सर्व पापासाठी लढणारे व लढविणारे सारेच मानवी जीवणाच्या विनाशाचेभागीदार आहेत. परंतु युक्रेन व रशिया या दोन्हीराष्ट्रातील वाढता तणावपाहता युद्ध थांबेल, प्रश्न सोडविण्यासाठी योग्य वातावरण तयार होईल, असे चित्र तुर्ततरी पहावयास मिळत नाही.युक्रेन युद्धामुळे मागील तीन महिन्यात जगभरातअन्नधान्याच्या किंमती 45 टक्यांनी वाढल्या, तर भाजीपाल्याच्या किंमती 55 टक्यांनी वाढल्या. या वाढीचा फटका आफ्रीकेतील लोकांवर मोठ्या प्रमाणावर आहे.आंतरराष्ट्रीय खाद्य पुरवठा संस्थेने पुढाकार घेऊन अंती सर्वांनी मिळुन एकत्रयेऊन प्रश्न सोडवले पाहिजे. तरच काही मार्ग निघेल.

रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये युध्दाचा तणाव सतत वाढत गेला तर भविष्यात त्यामुळे जगभरात अन्नधान्य समस्या अधिक बिकट होईल, ती सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने विशेष कृतीकार्यक्रम आखावा.आफ्रिकेतील गरीब आणि शोषीत राष्ट्रासाठी,अल्प दरात धान्य पुरवठा करण्याची आणि खाद्यपदार्थ पुरवण्याची योजना आखावी. युरोपियन युनियनच्या वतीने काही कल्याण निधी जाहीर केला असला तरीतो तुटपुंजा आहे. आता प्रत्येक युरोपीय राष्ट्राने सुध्दा विशाल दृष्टिकोन ठेवून भरघोष मदतीचा हात पुढे केला पाहीजे. त्यामुळे कोविड -19 महामारी, जागतिक हवामान बदल आणि युक्रेन युध्दाने खंडीत झालेल्या अन्नपुरवठा साखळीला मजबुत करणे शक्यहोईल.यासाठी भारताने पुढाकार घेऊन आफ्रिकन देशास मदत केली तर चित्र बदलू शकेल. तसेच जी-20 राष्ट्राच्या मदतीने कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी, भाववाढ रोखण्यासाठी,खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देण्यासाठीउपयुक्त उपाय सुचित करावेत.संयुक्त राष्ट्रसंघाने कृषी संशोधन व विकास या क्षेत्रात अन्नधान्य उत्पादन वाढीसाठी ठाम पावले उचलावीत. प्रश्न अनेक आहेत पण उपाय एकच आहे, तो म्हणजे बिकट रशिया-युकेन युध्दाची गाठ कशी उकलता येईल यावर प्रथम भर दिला पाहिजे. अमेरिका आणि चीनपेक्षाही भारत याबाबतीत मध्यस्थीसाठी पुढाकार घेवून ठोस पावले उचलू शकतो. त्यामुळे महागाईने त्रस्थ झालेली युरोप व आफ्रिकेतील राष्ट्रे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आशेने पाहत आहेत. त्यांनी पुढाकार घेतला तर युक्रेनचे पुनर्वसन होईल व अन्नपुरवठा साखळी पूर्ववत सुरळीत होऊ शकेल.

# आनंदालय...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**त्या दिवशी टक टक करत त्या दोन तीन पायऱ्या चढून सभोवार एक नजर गेली. बाजूने जाणारा तो शांत रस्ता माहित नाही पूर्वेकडून पश्चिमेकडे की पश्चिमेकडून पूर्वेकडे तसे तर तो रस्ताच .. शेवटी रस्ताच तो!रस्त्याच्या एका बाजूला एक जुना वृक्ष त्याच्या फांद्यांच्या झालेला तो अवाढव्य विस्तार आणि त्याखाली पडलेली त्याचीच ऊन सावली. पक्षांचा तो मंद किलबिलाट सोडता आजूबाजूचे वातावरण अगदी शांत, अन् कधीतरी मध्येच त्या शांततेला भेदणारा रस्त्यावरून जानाऱ्या एखाद्या गाडीच्या हॉर्न चां आवाज.झाडाच्या पानांची ती सळसळ उगाचंच नीरव शांततेत लुडबुड करून काहितरी खुणावत असल्याचा तो सुखद भास. आज कळत नकळत योगायोगाने तिकडे पाऊले वळली.**

सहजच एक स्नेह भेट म्हणून तीच दंगामस्ती,तीच रांगोळी डोळ्यामध्ये तरळली आणि पंचवीस वर्षापूर्वीची ती एक सायंकाळ डोळ्यामध्ये अश्रूरुपाने विसावली. त्या दोन तीन पायऱ्या चढून बरामद्यातून आत गेले. स्वच्छ, टापटिप, निटनेटकेपणा मनात एक थोडीशी आदर युक्त भीतीची भावना. काही क्षणाच्या प्रतीक्षेत सहज समोर नजर गेली.अन् कुतुहल म्हणून बरामद्याच्याखिडकीतून ...समोरच्या झाडावर बसलेला तो पक्षी आणि त्याच्या मनातला भावनांचा मुक सागर, कल्लोळातल्या त्या लाटा नि किनाऱ्यावर येऊन तुषारांचे ते शांत असे सप्तसूर खुणावत होते पुन्हा नव्याने लाटेवर स्वार होण्यासाठी मनाच्या खोल तळाशी त्याचे त्याचे अवकाश तो शोधत होता ते सुरेल गीत गाण्यासाठी माहित नाही का पण कुठल्याशा पूर्ततेची जाणीव झाली. स्नेहभेट औपचारीकता होता होता मनाच्या त्या रीतेपणात समोरच असलेल्या टेबलवरची ती पुस्तके आणि सकारात्मकतेने भारलेली ती रुम अगदी अलगद सामावली. कधी कधी कस होत ना! कुठलिशी एक अनामिक ओढ मनाला ओढ लावून जाणारी. खूप काहीतरी करण्याची भावना ,प्रेम, आपलेपणा, आपुलकी ची ती भावना,तळमळ त्या समोरच्या व्यक्तीमत्वाच्या डोळ्यात जाणवत होती.ऋणानुबंध ते कोणी कोणासाठी काय बोलावं किंवा लिहावं, पण एका जवळीकीतून जाणवलं ते फक्त शब्दातून उतरलं. नजर फिरता फिरता सहज समोर असलेल्या फळ्याकडे वळली. 'घे उंच भरारी' अगदी हेच ते. अशी भावना मनाला स्पर्शून गेली. काही वाक्ये अशी असतात. जी एक नवी उर्जा प्रेरणा देत राहतात. छोट्याशा स्नेह भेटीनंतर ... वर्गाच्या दिशेने वाटचाल करणारी पाऊले वर्ग खोलीकडे वळली.अन् एक नजर आश्चर्याने चकित झाली. वर असलेल्या त्या इयत्ता तिसरी, चौथी, पाचवी ऐवजी शौर्य ,नम्रता ,वीर ही नावे पाहता पाहता थबकली.

अरे ! किती सुंदर, शाळा म्हणजे काय तर हेचते. अर्थात शाळा शिकण्यासाठी की शिक्षणासाठी एका क्षणाला भारावून गेले.तुकडीअ तुकडी ब तुकडी यापेक्षा बालमनाचा विचार अभ्यास करता अभिमानाने वर्गात प्रवेश करतानाच शिक्षणाची ओढ नसलेल्या मुलाला देखील ओढ निर्माण होऊन विकासाच्या नव्या वाटेवर चालणाऱ्या पावलांना चाकाची गती नक्कीच प्राप्त होऊ शकेल यात शंकाच नाही. मनाचे अत्युच्च शिखर म्हणत होते, हेच ते त्या कोवळ्या बालमनावर संस्कार शिक्षण भावना पहिल्या पावला पासूनच म्हणजे मातीतून रुजनारा अंकुर मातीची पाबळी बाजूला सारून वर येतो असेच काही. जणू सकारात्मकतेने भरलेल्या दिवसाची



सुरुवात किती छान ना! काहीतरी होते जे शब्दातून म्हणण्यापेक्षा भावनेत अडकले. नि सहज शब्द शब्दातून.... **अंकुर तो कोवळा कोवळा, उद्या पानाफुलांतुनी होईल त्याचा सोहळा. फुलातूनी फळ फळातुनी बीज बिजाचा त्या जिव्हाळा. लाविते जणू लळा, मज आवडते मनापासूनी शाळा.** लहान मुलात मुल होऊन पुन्हा वर्गात बसून मी शौर्य वर्गात मी वीर वर्गात मन अगदी रमून गेले. हीच ती सुरुवात अगदी अभिमानाने मिरवावे असे. भेटी मध्ये मध्येच आलेल्या त्या मुलांच्या डोळ्यातली सकारात्मकता त्या छोट्या छोट्या डोळ्यात अगदी स्पष्ट जाणवत होती. मूलात मुल होऊन जाण्याची ती भावना खूप काही देवून गेली. बोलायचे म्हणून नाही. मुलं म्हटली की गोंधळ दंगामस्ती या गोष्टी आल्याचं पण तो गोंधळ गोंधळ असे नाही म्हणता येणार . ते एकमेकांना समजून घेऊन आपुलकी आपलेपणा काही औरच होता.म्हणजे संस्कार वर्ग म्हणून अगदी तंतोतंत जुळत होता. भावनेच्या ओलाव्याला शब्दात बांधणे म्हणजे छे हो...नाही सांगू शकत पण खूप छान वाटले. भारावलेल्या मनाने अन् काही क्षणानंतर परतीच्या त्या वाटेवर त्या दोन तीन पायऱ्या उतरताना एक नजर हळूवार मागे फिरली. ज्ञान संवर्धिनी 'आनंद विद्द्यालय' अक्षरे पाहता मनाच्या एका खोल तळापासून ओठांमधून उमटलेला तो हाच एक शब्द 'आनंदालय' टक टक करत त्या दोन तीन पायऱ्या उतरून मागे सुटलेल्या त्या क्षणाना मनाच्या एका सकारात्मकतेचा एका खोल कप्प्यात साठवून.... परतीच्या वाटेवर चालताना मागे वळून पाहता पाहता मन ओलेचिंब झाले. सांज वेळच्या सावलीसारखे don't say good bye बोलता बोलता भविष्याच्या चाहुलीत बुडाले..



## अबोल नेत्र..

"स्वप्नं मनी ठेऊन ती ,
विचारात मग्नअसे ,
आठविता क्षण जुने ,
एकटी हसत असे .

थोडी हळवी मनाने ,
सर्वांना धीर ती देते ,
आपुलकीने सर्वांना ,
सांभाळून सदा घेते .

असे सदैव आनंदी ,
निराशा दूर च राहे ,
मनी विचार मात्र त्या,
गालावरी सदैव हसू राहे .

हास्य तिचे चेहऱ्यावरी
सदैव अटळ राहते...
स्वप्नं तिचे ते सारे ती
लेकरांमध्ये पहात जगते ...!!

अबोल नेत्र हे क्षणोक्षणी,
बोलून खूप काही सांगू पाहते .
न बोलता मनातील सर्व काही ,
आयुष्यात सर्वांसंगे आनंदात
जगत रहाते.
तुषार लाखे, 8600548913

## नाग पिल्ली ..

नाग पंचमी आली
नागाचीसेना भ्याली
शिव शंभोला शरण
तुम्ही आमचे वाली

नाग पुजा करायची
इच्छा जागृत झाली
गारूडी लागे पकडू
नागसापाची पिल्ली

नागाला दुरडी भरुन
फिरता गल्लो गल्ली
नागासह सेल्फी घ्या
टूम निघालीयं हल्ली

नागापेक्षाही विषारी
आहेत काही वल्ली
संस्कृती काय सांगे
कसे करी पायमल्ली

महत्व नकळे सणाचे
उत्साहे आम्ही टल्ली
फुत्कार पहा नागाचे
कंबर होईलं ढिल्ली

नागसापांचे संरक्षण
शक्कल भलीचांगली
जाणा सणाचे महत्त्व
उडवू नकात खिल्ली

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.



## माझी कोरडीच माया

झाली व्याकुळ माऊली ,
वाट पाहते शिवारी...
कधी येईल लाडाची,
लेक अंगणात दारी...
रोजच्या गं संसाराला,
मीठ मिरची पूरेना...
किती राबले तरीही,
मागे काहीच उरेना...
आला अधिकाचा मास,
कशी करू बोळवंण... ?
नुसत्या धोंडे जेवणाने ,
कसे भरेल गं मन ?
लोक करतात किर्ती,
थाटं-माटं जावयाचा
माझा हात पोहोचेना...
संसार गरिबीचा...
घरोघरी आल्या लेकी,
झाला जावयाचा मान...
अंगठीच्या विचाराने,
माझा व्याकुळला प्राण...
गेला कुंकवाचा धनी,
माझा उघडा संसार...
लग्न लेकीचे कराया,
झाला कर्जाचा डोंगर...
लुगडाच्या पदराने,
पुसते ओल्या पापणीला...
देवा सुखी ठेव माझ्या,
लेक आणि जावयाला...
लेकीच्या संसाराचा,
वेल मांडवाला गेला...
माझ्या व्याकुळ जीवाला,
किती गारवा मिळाला...
सुरकुतला हा देह,
थरथर कापें काया...
माझा गुणाचा जावई,
माझी कोरडीच माया...
माझी कोरडीच माया...
सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे
चोपडे परभणी ९८२३०६६६०६

## आला श्रावण श्रावण

आला श्रावण श्रावण
सणांचा उत्सव घेवून
शिवालयी जावूनी
वाहू महादेवाला बेलपान
आला श्रावण श्रावण
रिमझिम पाऊस घेवून
शेतशिवार बहरले
बळीराजाचे सुखावले मन
आला श्रावण श्रावण
सृष्टी सजली छान
खळखळ वाहती झरे
हिरवाईने नटले रान
आला श्रावण श्रावण
पाठशिवणिचा खेळ घेवून
कधी ऊन कधी पाऊस
चाले नित्यनेमानं
आला श्रावण श्रावण
नवचैतन्य घेवून
नभोमंडपी खुलून दिसे
इंद्रधणूचे सप्तरंगी तोरण
- रविंद्र व्ही. चालीकवार
जि.यवतमाळ,
मो.9011559106

## कोणावर हसू नका

कोणावर हसू नका
चहाडी, चुगली करू नका
त्रास देऊ नये कोणाला
भलत्याच वाटेला जाऊ नका
कोणावर हसू नका
स्वतःचा हासा करू नका
जगावे माणसासारखे
माणुसकी धर्म विसरू नका
इथे कोणाचे काहीच नसते
याचे सदैव भान ठेवावे
इतरांवर हसल्याने भले होत नाही
कायम आठवणीत ठेवावे
कोणावर हसू नका
दुःख देऊ नये कोणाला
आपण आहोत माणूस प्राणी
लागा प्रेमाने जगायला
सौ.संगीता संतोष ठलाल
७८२१८१६४८५

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

थाटात संपन्न होतोय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
सर्वत्र ओसंडूनी वाहिला देशभक्तीचा भाव
जगी सर्वत्र गाजते हिंदुस्तानाचे वैभव
अजून सुविधांसाठी रडते ओसाड गाव
जेव्हा करू स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा
तेव्हा तरी व्हावा सुखी आमुचा बळीराजा
येऊन गेल्या अनेक सत्ता उपभोगल्या अनेक घराण्यांनी
पण बदलली नाही कधीही माझ्या शेतकऱ्याची राहनी
स्वातंत्र्य स्वातंत्र्य मिळालं राजकीय पुढाऱ्यांना
बांधत गेले शेतकऱ्यांना आपल्या दावणीला
जमून माया करोडोंची स्पीस ला नेत गेले
दैना गरीब दुबळ्यांची हे नाठाळ करत गेले
स्वातंत्र्याचा लाभ हा माझ्या शेतकऱ्यांना
मिळाला पाहिजे
कष्टातून पिकवलेल्या मालाला स्वतःच्या
मर्जीने विकता आले पाहिजे
आसमानी सुलतानी संकटांसोबत लढतो आहे
स्वतंत्र भारतात शेतकरी गुलामीत जगतो आहे
ए.सी.त बसून विकासाच्या गप्पा हाणून बरबाद
केल्या अनेक पिढ्या
आता तरी शेतकऱ्याला चांगलं जगवलंच पाहिजे
संदिप वाकडे पाटील
रा. खेडा ता. कन्नड, 9766992776



## दिवस मावळतीला जातो

जसा जसा दिवस मावळतीला जातो
तसा तसा जीव उलगडत जातो
नकळत मन घरी खेचून नेतो
तिला हो गजरा चोरून देतो
सांज ढळत,ढळत चालती
रात खुलत,खुलत चालती
काळरात्र पेटवते चांदण्याची दिवे
देहावर बरसती गार गुलाबी फुले
जसा जसा दिवस मावळतीला जातो
तसा तसा जीव उलगडत जातो
हळूहळू मनाच्या पाकळ्या
उलगडत जात्या मनमोकळ्या
मध्येच कुजबुजतो
डीम लाईट झिमझिमतो
जसा जसा दिवस मावळतीला जातो
तसा तसा जीव उलगडत जातो
लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## आला श्रावण...

आला श्रावण श्रावण
धारा सरींच्या घेऊन
घर दार पटांगण
चिंब चिंब भिजवून ॥१॥

आला श्रावण श्रावण
बहरून आले वन
सणासुदी बोलावणं
होई पुनवेचे भान ॥२॥

आला श्रावण श्रावण
येती पीकं तरारून
खेळे नभी तारांगण
आला पाऊस फिरून ॥३॥

आला श्रावण श्रावण
फिटे जाळे पांघरून
दह्या दुधाचे रांजण
पाट वाहती भरून ॥४॥

आला श्रावण श्रावण
दारी तुळस मालन
राती टिपूर चांदणं
मन जाहले प्रसन्न ॥५॥

प्रदीप बडदे, नवी मुंबई
मो.९५९४०२७९९५



## संसार

अरे हा संसार। पहावा करून।
संयम धरून ।मनामध्ये।।
बहिणाई सांगे। संसाराचे सार
मानू नये हार। जीवनात।।
संसारी माणसा। नको लोभ मनी।
त्यात तुझी हानी। होऊ पाहे।।
कर्म करतांना। ढळू नये तोल
तुच अनमोल। माझ्या जीवा।।
असा हा संसार ।उत्तराला प्रश्न।
नित्य उभे प्रश्न। जीवनात।।
अरे हा संसार। हारजित खेळ।
नको हळहळ। करू कधी।।
संसार सुखाचा। आस जर उरी।
भार देवावरी। ठेव सदा।।
ज्ञानेश्वर गायके,
कन्नड



## नागपंचमी...!

श्रावणात नागापंचमीचा सण आला,
चला गं सयांनो झोका खेळायला.
रिमझिम पाऊस पडे रानावनात
नदी - नाले वाहुनी पिके आली
जोमात, पावसाच्या पुढे ऊन लागे
पळायला चला गं सयांनो झोका
खेळायला. नवी साडी हिरवा चुडा
सखींच्या अंगात दूध- लाहया
घेऊनी साऱ्याजणी ताटात, त्या,
हळदकुंकवांनी पुजे वारूळाला
चला गं सयांनो झोका खेळायला.
फुगडी खेळू गं खेळू गं ही फिरकीची
तिरक्या- तिरक्या गं फुगडी ही
गिरकीची, बालपणीचे खेळ हे लागे
कळायला चला गं सयांनो झोका
खेळायला.
माहेराच्या भेटीने सखींना आनंद होई
आईच्या ममतेने कंठ दाटुनी येई,
"सासुरवास," लागेल पुन्हा छळायला
चला गं सयांनो झोका खेळायला...!
- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४

## अर्थ...

ती गेली, पाऊस थांबला
ती आली, शब्द लाजला
पावसातला अर्थ
गालावर जरा हसला
निःशब्द होकार
ओठावर अता दिसला
पाखरांची कुजबूज
माझा एकांत संपला

नजरा नजरेत
बघ उत्सव सजला
स्वप्नात ही विरह
काय सांगु तुजला
पहाट झाली तरी
सोबत चंद्र जागला
बलराज संघई
9420015108

## प्रकाश.

पुर्व दिशेला प्रकाश पडतो
रोज सकाळी तेजोमय
नित कर्तव्यास जागूनी
सृष्टी उजळतो सुर्योदय..

पश्चिमेस या निळ्या नभातूनी
शशांक शीतल डोकावतो
सवे चंद्रिका सहीत आपण
कलेकलेने आकारतो ...



समयी मधली तेलवातही
दिव्यात बसूनी तेवते
मंदमंद ती मंगल ज्योती
देवघराला न्याहाळते..
स्वयंप्रकाशी असती तारे
घेऊ त्यांची उदारता
स्वंये जळूनी प्रकाश देते
ज्योतीची ती निस्पृहता..

अज्ञानी तम दूर सारूनी
ज्ञानदीप हा उजळूया
स्वच्छ प्रकाशासम राहूनी
सुविचारी उर्जा पसरूया..

सौ. अंजली राजेंद्र कस्तुरे,
मो.नं.9420623481
छत्रपती संभाजीनगर

## तरुणपण

मानव नावाचं रोपटं
त्यावर बालपणाची कळी
तरुणपणाचं उमलतं फुल
मात्र जबाबदारीची पाळी
इथुन सुरु होत असते
जीवन नावाची खरी खेळी
रोपट्याचं करण्या वृक्षात रुपांतर
रुजवावं लागते खोलवर मुळी
त्यासी खतपाणी देण्सास
भाजावी लागते कष्टाची पोळी
संघर्षाच्या या चढावोढीत
करावी लागते स्वप्नांची होळी
जीवन नावाच्या या शिखरावर
चढउताराच्या कित्येक झडी
त्यावर क्वचितच यशाचे आणि
जास्तीत जास्त अपयशाची छडी
अशा या तरुणपणाच्या वृक्षावर
दुःखाच्याच बहारीच्या लडी
उरी असंख्य वेदना तरी
मुखी मधूर सुखफळाची गोडी
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९



# पुरुषांमधील लैंगिक दोष...

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**

- फायमोसिस - पुरुषांमध्ये प्रामुख्यानं आढळणारा दोष म्हणजे फायमोसिस. यामध्ये पुरुषांच्या अवयवांची त्वचा पूर्णपणे मागे न जाणे, त्वचा मागे जाताना खूप त्रास होणे, त्वचेला तडे जाऊन जखमा होणे, तेथे रक्तस्राव होणे अशी विविध लक्षणे आढळतात. - पॅराफायमोसिस - पुरुषांमध्ये आणखी एक दोष आढळून येतो ज्याला पॅराफायमोसिस असं म्हणतात. या दोषामध्ये पुरुषांच्या अवयवावर असणारी त्वचा आजारांमुळे किंवा वारंवार मागे जाऊन त्वचेला सूज येते. त्यालाच पॅराफायमोसिस असे म्हटले जाते. - पेरॉनिज प्लेक- काही कारणांमुळे पुरुषांच्या अवयवांमध्ये गाठी निर्माण होतात आणि त्याला वाकडेपणा येतो. अवयवाला कठोरता आली की वेदना होतात. वैद्यकीय परिभाषेमध्ये यालाच पेरॉनिज प्लेक असं म्हटलं जातं, या दोषावर स्टेम सेल थेरपी, पेनाईल लिथोट्रिप्सी यासारखे अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत. आता यातील काही दोष असे आहेत जे लहानपणापासून आढळतात किंवा लहान ते बाळांमध्ये आढळतात, आता आपण ते पाहूया. - हायपोस्पॅडिअस या दोषामध्ये रुग्णाचे जन्मतःच लघवीचे छिद्र अवयवाच्या खालच्या बाजूला असणे, ते आकाराने लहान असणे आणि त्यामुळे लघवीची धार पायावरच पडणे अशी लक्षणे दिसून येतात. या रुग्णांच्या लिंगामध्ये वाकडेपणासुद्धा आढळतो. जर या रुग्णांच्या अवयवाची लहानपणीच शस्त्रक्रिया केली गेली नाही तर या रुग्णांना मोठेपणी शारीरिक क्रिया आणि वीर्यपतनासंबंधीच्या समस्या उद्भवतात. त्यामुळे योग्य डॉक्टरांच्या सल्ल्याने वयाची दोन वर्षे पूर्ण झाली की अशा रुग्णावर शस्त्रक्रिया करुन घेणे फायदेशीर ठरते. - अनडिसेंडेड टेस्टीज - बऱ्याचदा लहान मुलांचे एक किंवा दोन्ही टेस्टिकल्स लिंगाच्या खालच्या बाजूस असलेल्या पोती किंवा पिशवीत (स्क्रोटम) मध्ये आलेले नसतात. नऊ महिन्यांपर्यंत ते खाली आले नाहीत तर शस्त्रक्रिया करणे हाच त्यावरील उपाय असतो. टेस्टिकल पोटातच राहिली तर त्याचा परिणाम शुक्राणूंवर होतो. तसेच कॅन्सरचा धोकाही उद्भवू शकतो. इंटरसेक्स बाळ जन्माला आल्यानंतर त्याच्या लिंगाचा आकार अर्धवट किंवा संमिश्र असल्यास त्वरित युरॉलॉजिस्ट व सेक्सॉलॉजिस्ट यांचा सल्ला घ्यावा. लहान मुलांमध्ये प्रामुख्याने अशा पद्धतीचे दोष आढळून येतात. आता आपण पुन्हा एकदा मोठ्या पुरुषांमधील दोषांसदर्भात जाणून घेऊया. - कॉर्डी ऑफ पेनिस - ज्या पुरुषांच्या अवयवात जन्मजात वाकडेपणा येत असतो त्याला कॉर्डी ऑफ पेनिस असे म्हणतात. जन्मतःच काही लिंगे ही आकाराने लहान आणि त्वचेला चिकटलेली असतात. त्यामुळे असे लिंग कठोरता आली की एका बाजूला झुकतात. वेळीच शस्त्रक्रिया करून हा दोष नाहीसा करता येतो. - हायपोगोनॅडिजम काही हार्मोनल प्रॉब्लेम्समुळे अवयवाची योग्य वाढ होत नाही. यालाच हायपोगोनॅडिजम म्हटलं जातं. हार्मोनल ट्रीटमेंट आणि शस्त्रक्रिया यांच्या माध्यमातून याही दोषांवर मात करता येते. - व्हेरिकोसिल- वंध्यत्व येण्यासाठी असलेल्या कारणांपैकी व्हेरिकोसिल हे सुद्धा एक कारण आहे. या दोषामध्ये अंडाशयाची नस आकाराने वाढते. यामुळे वीर्याची गुणवत्ता घटून शुक्राणू कमी होणे, कमकुवत होणे किंवा पूर्णपणे नसणे अशा व्याधी उत्पन्न होतात आणि वंध्यत्व येते. यावर उपाय म्हणून जर मायक्रो सर्जरी केली तर वंध्यत्व निवारण होऊ शकते. पुरुषांमध्ये आढळणाऱ्या अशा किती तरी दोषांवर, समस्यांवर रामबाण इलाज उपलब्ध आहेत. गरज आहे ती ज्ञानी होण्याची. आपल्याला कोणती तरी लैंगिक समस्या आहे आणि त्याकरिता मी तज्ज्ञ अशा सेक्सॉलॉजिस्टला दाखवणे गरजेचे आहे याची जाणीव होणे आव्यक आहे.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड
सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# 'इंडस्ट्रियल मीट'च्या माध्यमातून सामंजस्य करार :डॉ. भागवत कराड



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रिय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या उपस्थितीत आज कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत झालेल्या 'इंडस्ट्रियल मीट'च्या माध्यमातून 250 सामंजस्य करार करण्यात आले आहेत. युवकांना रोजगार देण्यासोबतच आपल्या महानगरातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन अर्थ राज्यमंत्री डॉ. कराड यांनी केले.
चिकलठाणा एमआयडीसी येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने आयोजित औरंगाबाद व नाशिक विभागाच्या वतीने 'इंडस्ट्रियल मीट'कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे आयुक्त डॉ.रामास्वामी एन, मसिआचे अध्यक्ष अनिल पाटील, लघू उद्योग भारतीचे अध्यक्ष रविंद्र वैद्य, माजी महापौर बापू घडामोडे, सहायक आयुक्तज संपत चाटे, उपायुक्त सु.द. सैंदाणे उपस्थित होते. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे उपस्थित होते.
केंद्रिय अर्थ राज्यमंत्री डॉ. कराड म्हणाले, आपल्या महानगरात उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण आहे. उद्योगांना पायाभूत सुविधा व कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे सहकार्य असेल. केंद्र व राज्य शासन रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी कटीबद्ध आहे. ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवक, युवतींना रोजगार उपलब्ध करुन देण्यासोबतच आवश्यक प्रशिक्षण, कौशल्य विकासाबाबत मार्गदर्शन, बॅंकेच्या माध्यमातून कर्ज उपलब्धतता याबाबतही आपण सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ते म्हणाले. आपल्या देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर आणण्यासाठी उद्योग क्षेत्रात काम वाढवावे लागणार आहे. 2047 ला आपला देश विकसीत राष्ट्र तसेच विश्वगुरू व्हावा, यासाठी प्रत्येक घटकाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचा उल्लेख डॉ. कराड यांनी केला.

# सिद्धार्थ इंटरनॅशनल स्कूल येथे स्वातंत्र्यदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सिद्धार्थ इंटरनॅशनल स्कूल आणि विक्रमशिला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, औरंगाबाद यांच्या सयुंक्त विद्यामाने १५ ऑगस्ट २०२३ रोजी ७६ वा स्वातंत्र्य दिन उत्सहात साजरा करण्यात आला. जी.एस.टी उपायुक्त रवींद्र जोगदंड यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

निवृत्त शिक्षणाधिकारी सुधाकर बनाटे, निवृत्त शिक्षक सुभाष वैरागड, डॉ.पंकज वैरागड या प्रसंगी उपस्थित होते. यावेळी देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. देश भक्तीपर गीते सादर केली.तसेच फॅशन डिझाईनच्या विद्यार्थ्यांनी गारमेंट्स बनवून त्या गारमेंट्सचे प्रदर्शन कारण्यात आले. सुत्रसंचालन रकक्षिंदा जोशी यांनी केले तर आभार जयश्री बागुलनी मानले.सिद्धार्थ इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सविता तलरेजा,आणि विक्रमशिला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या प्राचार्या अर्चना साळवे,यांच्यासह सर्व स्टाफ, कर्मचारी, विद्यार्थी पालक यांची उपस्थित होती. सर्वांनी कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला आहे.



# शिवसेना उपजिल्हा प्रमुखपदी डॉ.गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** शैक्षणिक, सामाजिक, साहित्य, राजकीय, पत्रकारिता,आणि सांस्कृतिक कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे वाळूज महानगर येथील प्रा.डॉ.बी.जी. गायकवाड यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची औरंगाबाद पश्चिमच्या शिवसेना उपजिल्हा प्रमुखपदी निवड करण्यात आली. शिवसेना जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी नियुक्ती पत्राद्वारे त्यांना कळविले आहे.
वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाची शिकवण पुढे नेण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री डॉ.एकनाथराव शिंदे, शिवसेना प्रवक्ते आमदार संजय शिरसाठ, जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या बांधणीला आणखी बळकटी देऊन प्रसार अन् प्रचार करावा असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. प्रा.डॉ.बी.जी.गायकवाड यांच्या निवडीबद्दल शिवसेना पश्चिमचे दशरथ मुळे, सरपंच सुनील काळे, सचिव कविता गायकवाड, ग्रा.पं. सदस्य माधुरी सोमासे, मुख्याध्यापक लक्ष्मण हिवाळे, ग्रा.पं. सदस्य अशोक लगड, उद्योगपती संकल्प गायकवाड, उद्योगपती शशिकांत ढमढेरे, शिक्षक संघटनेचे नेते रामकृष्ण बिघोत, समाधान हराळ यांच्यासह अनेक मित्रांनी अभिनंदन केले आहे.

# वडोद बाजार येथे सिमेंट रस्त्याचे काम सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** जैन मंदिरापासून जुने पोलीस स्टेशन पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने रस्त्याचे काम सुरू असून या रस्त्याचे खोदकाम करण्यात आले असून यावरती सोलिंग टाकून सिमेंट रस्त्याचे काम सुरू झाले आहे या सिमेंट रस्त्यामुळे गावातील एक चांगला रस्ता तयार होणार आहे त्यामुळे नागरिकांची गैरसोय थांबणार आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता साहेबराव जाधव यांची या कामाकडे विशेष लक्ष असून वडोद बाजार येथील पत्रकार रमेश धनके यांनीही या कामाची पाहणी केली रस्त्याचे काम चांगल्या प्रकारे होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापासून वाहतुकीसाठी रस्ता असून या रस्त्यावरून वाहतूक सध्या सुरू आहे. शाखा अभियंता साहेबराव जाधव व वडोद बाजार चे उपसरपंच गोपाळ वाघ यांच्या प्रयत्नामुळे गावात एक दर्जेदार सिमेंट रस्ता करण्यात येत आहे. जैन मंदिरापासून ते जुने पोलीस स्टेशन पर्यंत सिमेंट रस्त्याचे काम चालू आहे.

# राष्ट्र प्रथम सूत्राकडे माध्यमविश्वाचे दुर्लक्ष नको : शहजाद पूनावाला



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** समाज माध्यमांच्या प्रभावामुळे माध्यमविश्वाचे लोकशाहीकरण होते आहे. प्रत्येक व्यक्ती माध्यम होत असतानाच्या काळात राष्ट्रप्रथम हे सूत्र नजरेआड होणार नाही, याकडे गांभिर्याने पाहावे लागेल, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी शनिवारी येथे केले.
विश्व संवाद केंद्र पश्चिम महाराष्ट्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार वितरणप्रसंगी पूनावाला बोलत होते. यावेळी पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे नगरचे दिव्य मराठीचे ब्युरोचीफ अनिरुद्ध देवचक्के, झी २४ तासचे वरिष्ठ पत्रकार अरुण मेहेत्रे, पुढारीच्या पत्रकार सुषमा नेहरकर आणि सोशल मीडियाकर्मी आशुतोष मुगळीकर यांना पुनावाला यांच्या हस्ते आद्य पत्रकार देवर्षी नारद पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परिषद व नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, कार्यवाह धनंजय कुलकर्णी, विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. देवर्षी नारद पुरस्कारांचे यंदाचे १२ वे वर्ष आहे.ज्येष्ठ पत्रकार यांना २१ हजार रुपये, तर अन्य तीन पुरस्कार प्रत्येकी ११ हजार रुपये आणि देवर्षी नारद मूर्ती असे पुरस्काराचे स्वरूप आहे.
याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. संजय तांबट आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.
वर्षी नारद हे आद्य वृत्तनिवेदक व पत्रकार ठरतात. कारण, ते प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून, परिस्थितीची पूर्ण माहिती घेऊन मगच भाष्य करत. चारित्र्य, संवाद, उत्सुकता, कटिबद्धता, नवनिर्मिती, सभ्यता व संस्कृती ही सात तत्वे त्यांच्या पत्रकारितेची बलस्थाने होती. काळ कितीही पुढे गेला, तंत्रज्ञान कितीही बदलले, तरी ही तत्त्वे चिरस्थायी असल्याने माध्यमकर्मींनी नारदांच्या या तत्त्वांचा अंगीकार करून पत्रकारिता करावी, असे आवाहनही पूनावाला यांनी केले.
यावेळी अभय कुलकर्णी म्हणाले, राजकीय स्वातंत्र्य हे आपण ७५ वर्षांपूर्वी मिळवले आहे पण मानसिक स्वातंत्र्य मिळवणे महत्वाचे आहे. देवर्षी नारद यांना आपण आपल्या संस्कृतीत आद्य पत्रकार मानतो. त्यांच्या नावाने आपण दरवर्षी पुरस्कार देतो. पत्रकार वर्षभर कशाप्रकारे काम करतात आणि ते सकारात्मक पद्धतीने कशा बातम्या देतात यावर आधारित पुरस्कारार्थी यांची निवड विशेष समितीद्वारे केली जाते.

# अटल अर्थसाह्य योजनेला वाटाण्याच्या अक्षता

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** राज्यातील सहकार पणन व वस्त्र उद्योग विभाग यांच्या विद्यमाने जानेवारी २०१९ च्या शासननिर्णयान्वे महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांसाठी 'अटल अर्थसाह्य योजना' लागू करण्यात आली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी नूडल एजन्सी म्हणून, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र, सदर एजन्सी कडून राज्यातील सहकारी संस्थांना वेगवेगळी कारणे दाखवून अर्थसाह्य करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप अटल अर्थसाह्य बचाव संघर्ष समितीने केला आहे. अटल अभिनव सहकारी संस्थेचे बजेट २६ आगस्ट पर्यंत न दिल्यास २८ ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथील एमसीडीसी कार्यालयाला कुलूप ठोकून आंदोलन करण्यात येईल असा इशारा बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री अंकुशराव श्रीमंतराव बोबडे यांनी एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालकआखरे यांना दिलेल्या एका निवेदनाद्वारे दिला आहे.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यामधील शेतकऱ्यांच्या मुलांना कृषी पूरक व्यवसाय करता यावा व बेरोजगारांना रोजगार मिळावा या हेतूने अटल अर्थसाह्य ही नावीन्यपूर्ण योजना, शेतीपूरक उद्योग, व्यवसाय उभे करण्यासाठी सण २०१८-१९ मध्ये तत्कालीन युती सरकारने हा स्तुत्य निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने राज्यामध्ये चार हजार ८५० सहकारी संस्थांची नोंद झाली आहे. त्यापैकी एक हजार८७१ सहकारी संस्थांनी आपल्याकडे प्रस्ताव दाखल करून मंजुरात घेतली आहे. त्यातील १०१५ संस्थांचे सर्वेक्षण सुद्धा झाले आहे. तर ६७२ संस्थांच्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने शिफारसी केल्या आहेत. त्यापैकी ५९२ संस्थांचे ऑडिट रिपोर्ट सुद्धा प्राप्त झाले आहेत. त्या संस्थांनी त्यांचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ मर्या. पुणे यांच्याकडे दाखल केले असून, दाखल प्रस्तावापैकी प्राथमिक छाननी पूर्ण करून ३३१ संस्थांनी आपली निकष पूर्तता पूर्ण केलेली आहे.

अशा संस्थांना हिवाळी अधिवेशनादरम्यान ७२ कोटी ४२ लाख रुपये मंजूर करण्यात आले असून, ३१ मार्च २०२३ रोजी एमसीडीसी पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहेत. परंतु सदर निधी अदा करण्यासाठी व योजनेला मंजुरी देण्यासाठी राज्यस्तरीय समितीची आवश्यकता असल्याचे कारण पुढे करून, एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक आखरे साहेब जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत. एवढेच नव्हे; तर एक महिन्यात होईल, दोन महिन्यात होईल, आता १५ ऑगस्टला पालकमंत्र्यांच्या हस्ते चेक वाटप होईल अशी उडवा उडवीची उत्तरे देऊन लाभार्थी संस्थांना वाटाण्याच्या अक्षदा देत आहेत. परिणामी संस्थांच्या चेअरमन व सभासदांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. त्यामुळे आम्ही एमसीडीसीच्या पुणे येथील कार्यालयाला कुलूप लावून आंदोलन करणार आहोत. सदर आंदोलनात काही अनुचित प्रकार घडल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील असा इशारा सुद्धा शेवटी बचाव संघर्ष समितीने दिलेल्या निवेदनातून दिला आहे.



# वृद्धांच्या सेवेत परमेश्वराचे खरे दर्शन घडते : डॉ. पंढरी इंगळे

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** तुकाराम आश्रय वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे हे निराधार बेघर अशा वयोवृद्ध लोकांना मोफत सेवा देत असल्यामुळे खऱ्या परमेश्वराचे दर्शन दररोज घेतात व आरोग्य शिबिराच्या माध्यमातून आम्हाला हि घडवतात त्यांचे कार्य खूप कौतुकास्पद आहे. त्यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त वृद्धाश्रमातील वृद्धासह गावातील गरजू लोकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करून आम्हाला सेवेची संधी दिली असे विचार गंगाई हॉस्पिटल चे डॉ पंढरी इंगळे यांनी व्यक्त केले. १८ ऑगष्ट रोजी आयोजित आरोग्य शिबीराच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भोकर ग्रामपंचायत च्या वतीने वृद्धाश्रमासह शिबिरातील नागरिकांना फळ फराळाचे वाटप करण्यात येऊन वृद्धाश्रमासाठी लागेल ती मदत करण्याचे संतोष काळे यांनी आश्वासन दिले. यावेळी कार्यक्रम चे अध्यक्ष भोकर चे प्रतिष्ठित तथा ग्रामपंचायत चे मार्गदर्शक संतोष काळे, प्रमुख मार्गदर्शक गंगाई हॉस्पिटल चे डॉ पंढरी इंगळे तर विशेष उपस्थितीत सरपंच गजानन फोलाने, उपसरपंच अनंता डोंगरदिवे, रमेश डोंगरदिवे, गणेश डोंगरदिवे हे होते. दि. १८ ऑगष्ट २०२३ रोजी ऋणानुबंध समाज विकास संस्थे द्वारा संचलित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम चे संचालक प्रशांत डोंगरदिवे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त वृद्धाश्रमात आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. गंगाई हॉस्पिटल च्या वतीने वृद्धाश्रमातील वृद्धासह शेकडो गरजु रुग्णाची भर पावसात तपासणी करून औषधं उपचार मोफत देण्यात आला.



# मेरी माटी, मेरा देश अभियानातून शहीद वीरांच्या स्मृतींना वंदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी 'मिट्टी को नमन, वीरों का वंदन' या घोषवाक्यासह जिल्हाभरात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानाचा जिल्हास्तरीय सांगता समारंभ आज धुळे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पांझरा नदीकिनारी, शासकीय ग्रंथालय जवळ, जिल्हा प्रशासन व महानगरपालिका, धुळे यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास खासदार डॉ. सुभाष भामरे, महापौर प्रतिभाताई चौधरी, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता,जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, मनपा आयुक्त देविदास टेकाळे, उपमहापौर वैशाली वराडे, मनपा स्थायी समिती सभापती किरण कुऱ्हेवार, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, अतिरिक्त उपायुक्त विजय सनेर, उपायुक्त संगिता नांदुरकर, श्रीमती. डहाळे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, यांच्यासह नगरसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आझादीच्या अमृतमहोत्सवाच्या 'मेरी माटी, मेरा देश' कार्यक्रमानिमित्त जिल्ह्यातील स्वांतत्र्यवीरांनी केलेल्या कार्यांची जनतेला तसेच विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी जिल्ह्यातील स्वांतत्र्य वीरांची एक पुस्तिका तयार करण्यासाठी जिल्हा परिषद, महापालिका व जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा. अशी पुस्तिका तयार झाल्यास जिल्ह्यातील प्रत्येक शाळा, वाचनालयामध्ये विद्यार्थ्यांना वाचनासाठी ठेवल्यास खऱ्या अर्थाने जिल्ह्यातील शहीद वीरांना मानवंदना देऊन या कार्यक्रमाची फलनिष्पती होईल असे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले.

# निमखेडी येथे स्वातंत्र्यदिवस जल्लोषात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील निमखेडी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त सामाजिक कार्यकर्ते रोशन खैरनार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

निमखेडी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील विद्यार्थ्यांतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त ढोल ताशांच्या गजरात रॅली जल्लोषात काढण्यात आली. यानंतर 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन व महापुरुषांसह सैनिकांनी देशासाठी दिलेल्या योगदानाबद्दल माहिती देण्यात आली. व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते तिरंगा झेंड्याचे पुजन करण्यात आले. ध्वजारोहण करतांना राष्ट्रगीत म्हणत मानवंदना देण्यात आली. तसेच ध्वजारोहण सामाजिक कार्यकर्ते रोशन खैरनार यांच्या हस्ते करण्यात आले.

# विद्युत वितरण कंपनीच्या मनमानीमुळे जनता त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

लाईन संदर्भात सदरील कार्यालयात कॉल केल्यानंतर सब स्टेशनचे कर्मचारी उद्धटपणे वागतात आणि आरेरावेची भाषा वापरतात आणि उडवा उडवी चे उत्तर देतात याची वरिष्ठांनी नोंद घ्यावी .
**गजानन जाधव, शहर प्रमुख उद्धव बाळासाहेब गट**

लोणार शहरातील सर्वच वार्डा मध्ये विद्युत पुरवठा योग्य पद्धतीने झाला पाहिजे ! एका वार्डात उजेड दुसऱ्या वार्डात अंधार असा दुजाभाव विद्युत वितरण कंपनीने करू नये .
**शेख समद शेख अहमद, भा .रा .काँ कमिटी शहर अध्यक्ष**

व्यापारीवर्ग व ग्राहक वेळोवेळी विद्युत बिलाचा भरणा करतात तरीही त्यांना महावितरणचा लोड शेडिंगचा त्रास सहन करावा लागतो हा प्रकार योग्य नाही .
**अनिकेत मापारी, जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस बुलढाणा**

**यासीन शेख**

**लोणार :** शहरामध्ये सतत विद्युत वितरण कंपनीच्या मनमानी कारभाराला लोणार शहरातील रोशनपुरा, कोळी वेटाळ, मारवाडी गल्ली,माळीपुरा, गुलाबखां मोहल्ला, मातंगपुरा या भागात राहणाऱ्या नागरिक त्रस्त झाले आहेत. या भागातील नागरिकांची विजचोर व थकीत बिलच्या बहाने या भागात दररोज अवेळी रात्री बेरात्री दोन-तीन तास केव्हा ही लाईन पुरवठा खंडित केला जात आहे. शहरातील दुसऱ्या भागातील जामा मज्जिद ते बस स्टॅन्ड परिसरातील विद्युत पुरवठा चालू ठेवण्यात येतो.या संबंधी विद्युत अभियंता टेकाळे यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क केला असता वरील भागात वीज चोरी व वसुली कमी असल्यामुळे या भागात लोड शेडिंग घ्यावी लागते.असे दिनांक १७ ऑगस्ट रोजी १०० ते१५० लोकांसमोर विद्युत अभियंता यांनी माहिती दिली. विद्युत वितरण कंपनीला सदैव सहकार्य करणारे व वेळोवेळी बिल भरणारे माळीपुरा, रोशनपुरा, कोळी वेटाळ, मारवाडी गल्ली, मातंगपुरा भागातील लोकांना सुद्धा लोड शेडिंग च्या त्रास सहन करावा लागत आहे.यामुळे काही नागरिकांनी ग्राहक मंचाकडे तक्रार करणार असल्याची माहिती दिली. दिनांक १७ ऑगस्ट रात्री १०:३० वाजे दरम्यान लोणार शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने जमा झाले होते.यावेळी समाजसेवक रौनाकअली सिद्दिकी,माजी नगरसेवक अब्दुल उबेद अब्दुल मुनाफ,उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख गजानन जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष तोसिफ आली, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद,माजी नगरसेवक शाम राऊत,मोहम्मद अकीब कुरेशी जिल्हा उपाध्यक्ष एन. एस. यु. आय,लुकमान कुरेशी,कैलास आंभोरे, शेख बबलू शेख जमीर,शेख अन्सार, शहरातील विविध भागातील नागरिक उपस्थित होते.



# भोकर मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजेश वाघमारे, कार्याध्यक्ष बी.आर.पांचाळ

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजेश वाघमारे, कार्याध्यक्ष पदी बी.आर.पांचाळ तर सचिव मनोजसिंह चौहाण यांची शनिवारी (ता. १९) बिनविरोध निवड करण्यात आली. येथील नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी विश्राम ग्रहावर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी, सरचिटणीस राम तरटे,निमंत्रक रवींद्र संगणवार,संघटक किरण कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकारांची बैठक घेण्यात आली प्रारंभी मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर मावळते अध्यक्ष बी.आर. पांचाळ यांनी मराठी पत्रकार परिषदेचे कार्य अतिशय चांगल्या प्रकारचे होत असल्याचे मत मांडले त्यानंतर नूतन कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली.अध्यक्ष राजेश वाघमारे, कार्याध्यक्ष बी.आर.पांचाळ,उपाध्यक्ष अनिल डोईफोडे,सिद्धार्थ जाधव,सचिव मनोजसिंह चौहाण, सहसचिव लतीफ शेख, संघटक जयभीम पाटील, सल्लागार मनोज गिमेकर, श्रीकांत देव प्रसिद्धी प्रमुख अरुण डोईफोडे, सदस्य शंकर कदम, सुभाष तेले,शिवाजी गायकवाड आदींची निवड करण्यात आली.ऊपस्थित मान्यवरांनी नूतन कार्यकारिणी घोषित करून मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात यावेत असे मत मांडून नवीन कार्यकारिणीचे स्वागत केले.



## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424



# तिरंगी डोसा

आधुनिक केसरी

**साहित्य :** 3 वाट्या तांदूळ ,1 वाटी उडीद डाळ , 1 चमचा मेथ्या , 1 वाटी पालक प्युरी , 1 वाटी म्हणजेच 5..6 केशरी रंगाची साले काढून कट करून मिक्सर मधून एकदम बारीक वाटलेली गाजराची पेस्ट , मीठ ,बटर , उकडलेल्या बटाट्याची भाजी व नारळाची हिरवी चटणी .

**कृती :** प्रथम डोशाचे बॅटर बनवण्यासाठी तांदूळ व उडीद डाळ वेगवेगळे 4..5 वेळा स्वच्छ पाण्यातून धुवून 6..7 तास भिजवावेत .त्याच बरोबर मेथ्या सुद्धा भिजवाव्यात. मग मेथ्या ,उडीद डाळ मिक्सर मधून बारीक वाटून घ्यावी . बारीक वाटण्यासाठी भिजवलेल्या डाळीतील पाण्याचा वापर करावा .म्हणजे व्यवस्थित बारीक होईल कारण उडीद डाळ व मेथ्या दोन्ही मध्ये चिकटपणा असतो .मेथ्यांचा स्वाद तर छान येतोच डोशाला शिवाय त्या केसांना , कंबरेसाठी व एकूणच आरोग्यासाठी खूप लाभदायक असतात .मग तांदूळ सुद्धा चांगले बारीक वाटून एकत्र करून फेटून घट्ट झाकून शक्यतो सकाळी करायचे असेल तर रात्रभर व संध्याकाळी करायचे असतील तर दिवसभर म्हणजेच किमान 7..8 तास भिजत ठेवावे . म्हणजे पीठ हलके होते व व्यवस्थित फुगून एकदम हलके होते . पीठ आंबले की भरपूर फुगून वर येते म्हणून भिजवताना मोठ्ठ्या आकाराच्या भांड्यात ठेवावे .नाहीतर ते खूप फुगले की बाहेर येते .

आता पिठात चवीनुसार साधारण 1ते दीड चमचा मीठ घालून शक्यतो वर्तुळाकार व एकांच दिशेने फेटावे म्हणजे जाळी छान पडते. मग या पिठाचे 1 जास्त व 2 त्याच्या निम्मे अशा प्रकारे भाग करून 3 बाऊल मध्ये काढावेत. त्यांपैकी 2 भाग असलेले पीठ पांढरे बाजूला ठेवावे.

आता एका पिठात केशरी गाजराची पेस्ट घालून थोडे मीठ घालावे व व्यवस्थित फेटून केशरी रंगाचे बॅटर बनवून ठेवावे .

गरम पाण्यात पालकाची पाने थोडा वेळ ठेवून नरम झाली की थंड पाण्यातून काढून मिक्सर मधून एकदम बारीक वाटून बनवलेली प्युरी दुसऱ्या भागातील पिठात चवीनुसार थोडेसे मीठ घालून व्यवस्थित फेटून हिरवे बॅटर बनवावे . आपली केशरी , पांढरी व हिरवे अशी तिन्ही पिठे तयार आहेत .

आता गॅसवर नॉनस्टिकचा तवा असेल तर उत्तमच ,नाहीतर तवा थोडा गरम झाला की तेल किंवा तूप लावून छान तापला की थोडे पाणी घालून काढायचे असे 2 वेळा करावे म्हणजे साधा तवा असेल तरीही डोसे झटपट छान निघतात व कमी तेल किंवा बटर लागते . यालाच तवा डोशासाठी तयार करणे म्हणतात.

तवा तयार झाला की आधी केशरी बॅटर घालून डावाने पातळ व गोलाकार पसरावे .लगेंच पांढरे बॅटर त्या भोवती गोलाकार घालून त्यातील डावाने पातळ गोलाकार पसरून घ्यावा व लगेंच त्याच्या भोवती हिरवे बॅटर घालून त्यातील डावाने पातळ व गोलाकार् पसरावे .मग त्यावर बटर पातळ केलेले चमच्याने सोडावे .मग बाजूने डोसा सुटायला लागला की एका बाजूने गुंडाळत रोल बनवावा. आता आपला तिरंगी डोसा तयार आहे .तो छान सर्व्हिंग डिश मध्ये काढून डोशाच्या खास उकडलेल्या बटाट्याच्या भाजी बरोबर व नारळाच्या चटणी बरोबर सर्व्ह करावा.

**वैशिष्ट्य :** हा तिरंगी डोसा खूपच आकर्षक दिसतो .पालक ,गाजर यांमुळे त्यातील पौष्टिकता वाढते , मुले तर पाहूनच खुश होतील हा रंगीत डोसा पाहून.

# १४० गाव पाणीपुरवठा योजनेची पाणपोई भागवतेय एस.टी. कर्मचाऱ्यांची तहान

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** पाणी हे अनमोल आहे. पाणी हे जीवन आहे. पाणी आहे तर सर्व काही आहे अस म्हटल्या जाते. याच पाण्यासाठी लोक पाणपोई लावतात व लोकांची तहान भागवतात. यासाठी समाजातील दानशूर लोक, समाजसेवी संस्था यांचा वाटा महत्त्वाचा असतो. पण याच पाण्यासाठी रहदारीच्या ठिकाणी जीथ लोकांची नेहमीच रेलचेल असते अशा जळगाव जामोद एस.टी. डेपोत पाण्यासाठी लोकांना वनवन फिराव लागत आहे. एवढे नव्हे तर चंक्क एस.टी. डेपोमध्ये कार्यरत असलेले डायव्हर व कंडक्टर यांना सुद्धा पाण्यासाठी पायपीट



करावी लागते.गेल्या कित्येक महिण्यापासून एस.टी. डेपोत पीण्याच्या पाण्याची वानवा आहे.भर उन्हाळ्यात सुद्धा एस.टी. डेपोच्या साहेबांनी पाण्याची काही व्यवस्था केली नाही.

जळगाव जामोद ते आसलगाव रोडलगत १४० गाव पाणी पुरवठ्याची पाईपलाईन गेली आहे.याच पाईपलाईनवर रोड लगत तीन ते चार पाण्याचे वाल आहेत. त्यांना चोवीस तास छोटी पाण्याची धार वाहत असते. उन्हाळा, पावसाळ हिवाळा बाराही महिने याच वालवर रोडवरून खाजगी व सरकारी वाहणातून प्रवास करणारे प्रवासी व वाहण चालक आपली तहान भागवतात. एस.टी. डेपोतील डायव्हर आणि कंडक्टर गाडी चालवतांना याच वालवर आपली तहाण भागवतात. तिथे पाणी पितात व जवळील पाण्याच्या बाँटल मध्ये पाणी भरून घेतात. रस्त्यावरून जाणारे येणारे ज्यांना तहान लागली ते हमखास इथ थांबतात व आपली तहान भागवताय. हाच वाँल पीण्याच्या पाण्याच मुकी जणावर आणि लोकांसाठी हंक्काच ठिकाण ठरलं आहे एवढ मात्र खर...!





# मिस कॉल देऊन भाजपाशी जोडण्यासाठी अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात काल दि. 16 ऑगस्ट रोजी भारतीय जनता पार्टी च्या वतीने केंद्र सरकारशी जोडण्यासाठी व सरकारच्या विविध योजनांची माहिती पोहचण्यासाठी या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. हे अभियान 7820078200 या नंबर वर मिस कॉल देऊन भाजपाशी जोडण्यासाठी अभियान सुरू करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित असलेले भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, फुलंब्री शहराध्यक्ष योगेश मिसाळ भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मिक जाधव, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, आकाश गोरवणे, नवाब पटेल आदींची उपस्थिती होती.

# रुग्णांना सोयीसुविधा द्या अन्यथा आंदोलन : झोडे

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात चंद्रपूर जिल्ह्यासह यवतमाळ, गडचिरोली तेलंगणा राज्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येत असतात. मात्र याच रुग्णालयात भोंगळ कारभार सुरू असून अनेक मशीन बंद अवस्थेत पडले आहेत. तर स्ट्रेचर, व्हेंटिलेटर, औषध व डॉक्टरांचा मोठ्या तुटवडा असून रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नुकतेच डॉक्टरांच्या हलगर्जीपणा मुळे एका परिचरिकेला आपला जीव गमवावा लागला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात परिचारिकाच सुरक्षित नाही तर येथे येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांचे काय? असा सवाल राजू झोडे यांनी उपस्थित केला असून रुग्णालयातील आरोग्य सेवा पूर्णपणे व्हेंटिलेटरवर आहे. त्यामुळे रुग्णांना सोयीसुविधा उपलब्ध करून द्या अन्यथा आंदोलन करू असा गंभीर इशारा उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी दिला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यासह गडचिरोली आणि तेलंगणा राज्यातील ग्रामीण भागातील अनेक गरीब आणि गरजू रुग्ण कमी खर्चात उपचार व्हावे, यासाठी येथे भरती होत असतात. मात्र, येथील रुग्णालयात योग्य उपचार सुविधा मिळत नसल्याचे दिसून येत आहे. सामान्य माणसांना उपचार न मिळणे ही नित्याचीच बाब झाली असताना याच रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या परिचारिकेला जीव गमवावा लागला, हा रुग्णालयाच्या भोंगळ कारभाराचा पुरावा आहे. इतरांची काळजी घेण्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या एका परिचारिकेला जीव गमवावा लागतो, यासारखी लाजिरवाणी घटना नाही. रुग्णालयात काम करणारी परीचारीकाच सुरक्षित नाही तर सामान्य रुग्णांचे काय? असा सवाल देखील राजू झोडे यांनी उपस्थित केला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सोयी सुविधांकडे सत्ताधाऱ्याचे लक्ष नाही, पालकमंत्री आढावा घेत नाहीत. वैद्यकीय अधिकारी कोणालाच जुमानत नाही, अशी स्थिती निर्माण झाल्याने सामान्य माणसांच्या आरोग्याचे हाल होत आहे. रुग्णांची दुर्दशा ही चिंतेची बाब असून, या घटनेची आरोग्यमंत्र्यांनी चौकशी करावी, जिल्हा रुग्णालयात औषध साठा उपलब्ध करून द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा राजू झोडे यांनी दिला आहे.

# मनपाच्या सार्वजनिक वाचनालयाची झाली कचराकुंडी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** सिडकोतील संभाजी कॉलनी या नागरी वसाहतीत मुलांना खेळण्यासाठी असलेली मैदाने व अभ्यास करण्यासाठी असलेले वाचनालय कचरा व टाकाऊ साहित्य पडल्याने गलिच्छ झाली आहेत. प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने मुलांना रस्त्यावर खेळावे लागत आहे.

प्रशासनाने नागरी वसाहत भागात मुलांना खेळण्यासाठी तसेच सार्वजनिक उपक्रमासाठी मैदाने राखीव ठेवली आहेत. परंतू प्रशासनाकडून या मैदानाच्या देखभाल व दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही. लगतचे रहिवाशी मोकळ्या मैदानातील वाचनालयाच्या समोर ओला व सुका कचरा, खरकटे तसेच टाकावू साहित्य टाकत आहेत. शिवाय मोकाट जनावराचाही सतत वावर असतो. त्यामुळे संभाजी कॉलनी व सिडकोतील मैदानाची व वाचनालयाची तसेच व्यायाम शाळेची दुरावस्था झाली. मैदानात कचरा, झाडे, व दगड गोठे साचल्याने मुलांना खेळता येत नाही. कचऱ्यामुळे दुर्गंधीही पसरली आहे. पर्यायी जागा नसल्याने लहान मुलांना रस्त्यावर किंवा दुर्गंधीचा त्रास सहन करत मैदानात खेळावे लागत आहे. खेळताना दगडामुळे पडून जखमी होत आहेत. येथील नागरिकांकडून मैदान स्वच्छ व देखभालीची मागणी केली जाते. पण प्रशासनाकडून त्याकडे डोळेझाक केली जाते. त्यामुळे कचऱ्याची समस्या तत्काळ सोडवून दिलासा द्यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिनखरात) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी मनपा प्रशासनाला केली आहे.



# शांताराई बालक विद्यालयमध्ये ७६वा स्वातंत्र्यदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ताजनापूर येथील शांताराई बालक विद्यालय ताजनापूर ग्रामपंचायत उपसरपंच अशोक कारभार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे रामकृष्ण काळे, अजिनाथ काळे, बाबासाहेब काळे मच्छिंद्र काळे, सीताराम काळे, भीमराव गायकवाड, संतोष शेठ काळे, प्राचार्य गणेश काळे, प्राध्यापक सुनील इनामदार, कोमल इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर, अमोल दांडेकर नलावडे मॅडम अतुल गुळवे, भगवान साळुंखे, किरण काळे, शिक्षक कल्पना काळे अनेकांची उपस्थिती होती.



# नंदलाल धूत हॉस्पिटलमधे महाराष्ट्रातील पहिली यशस्वी शस्त्रक्रिया

## हृदयाच्या कोरोनरी धमनीनमधे होते कॅल्सिफाइड ब्लॉकेजेस

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** हृ दयाच्या कोरोनरी धमनीमध्ये अत्यंत गंभीर प्रमाणात कॅल्शियमयुक्त ब्लॉकेजमुळे ६३ वर्षीय महिलेच्या सतत वेदना आणि श्वास लागणे ही समस्या होती. ही शस्त्रक्रिया करताना गंभीर कॅल्शियममुळे पेशंटला खूप धोका निर्माण होण्याची शक्यता असते. वरील रुग्ण शहरातील नामांकित सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी विभागात दाखल झाल्यांनतर सर्व बाबींचे अवलोकन करून ही शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांनी गुंतागुंतीची अँजिओप्लास्टी करून या महिलेचे प्राण वाचवले. धमनीमध्ये जमलेले कडक कॅल्सिफाइड ब्लॉकेजेस दूर करण्यासाठी इंट्राव्हस्क्युलर लिथोट्रिप्सी (आयव्हीएल) या अद्ययावत तंत्राचा वापर करून त्यात या प्रकारातील नवीन आलेल्या C2 + ह्या कॅथेटर बलूनचा वापर करून रुग्णाची यशस्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली.

डॉ. विलास मगरकर, हृदयरोग विभागप्रमुख यांनी सांगितले कि, हृदयाच्या ज्या रक्तवाहिनी असतात (कोरोनरी आर्टरीज्) ज्या मध्ये जर खूप मोठ्या प्रमाणात कॅल्शियम असेल तर हे कॅल्शियम अँजियोप्लास्टी करताना खूप मोठा अडथळा बनतात. या कॅल्शियम मुळे एन्जोप्लास्टी आणि स्टेण्ट करणं हे खूप अवघड जात त्यामुळे अशा प्रकारच्या कॅल्शियम असलेल्या रक्तवाहिन्यांसाठी कटिंग बोलून, स्कोर्ड बलून, रोटाब्लेटर आणि अशा मध्ये आलेलं एक इंट्राव्हस्क्युलर लिथोट्रिप्सी (IVL) नावाचं उपकरण यासाठी वापरल्या जातात. या इंट्राव्हस्क्युलर लिथोट्रिप्सी उपकरणांमध्ये हे कॅल्शियम सोनिक वेव्हनी (ध्वनिलहरीनी) ब्रेक केल्या जातात आणि या कॅल्शियमला ब्रेक केल्यानंतर मग तिथे दुर्बिणीच्या सहाय्यातून आत मध्ये बघून मग त्याला विशेष प्रकारचे बलून वापरून तो रस्ता मोकळा केला जातो. त्यानंतर स्टेन्टिंग केले जाते.

स्टेन्टिंग झाल्यानंतर पुन्हा बलून च्या साहाय्याने रक्त वाहिनीचा व्यास हा व्यवस्थित झालेला आहे हे दुर्बिणीच्या माध्यमातून बघितले जाते. अशा प्रकारच्या या आयव्हीएल तंत्रज्ञानामध्ये आत्तापर्यंत एक जी केबल उपलब्ध होतील ती फक्त सोनिक वेव्हच्या 80 पल्सेस देऊ शकत होती. महाराष्ट्रामध्ये प्रथमच मुंबई व्यतिरिक्त १२० पल्स देण्याची केबल वापरून एका रुग्णाला खूप गंभीर आणि लांबलचक कॅल्शियम ब्लॉक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या प्रकाराचा वापर करण्यात आला. हे जे कॅल्शियम कट केले आहे ते आयव्हीएल च्या C2+ बलूनच्या माध्यमातून हे करण्यात आलं आणि *48 मिलिमीटरचा लांब असा मेडिकेटेड स्टेण्ट टाकून या रुग्णाची एन्जोप्लास्टी करण्यात आली.

याच रुग्णाला जर इतरही रक्तवाहिन्यात ब्लॉक असले असते तर बायपास हा ऑप्शन होता पण हृदयाची एक नंबरची मुख्य धमनी डाव्या बाजूची एलएडी नावाची आर्टरी आहे त्यामध्ये ब्लॉक नसल्यामुळे बायपास हा पर्याय नव्हता आणि त्यामुळे याच रुग्णाला आयव्हीएल तंत्राद्वारे हे कॅल्शियम कट करून तिथे आपण अँजिओप्लास्टी करू शकलो.

हा रुग्ण या सर्व प्रकारांनी अत्यंत व्यवस्थित होऊन रिकवरी रॅपिड झाली. अशा प्रकारच्या कॅल्शियम असलेल्या रुग्णांमध्ये जर आपण हे कॅल्शियम कट करणारे उपकरण न वापरता जर अँजियोप्लास्टी केली तर रक्तवाहिनी फाटण्याचा आणि शस्त्रक्रिया करताना अधिक गुंतागुंत होण्याचा व मृत्यू होण्याचा प्रमाण हे साधारण पन्नास टक्क्यांपर्यंत असतं. त्यामुळे हे अत्यंत अद्यावत असे उपकरण ठरलेले आणि त्यातल्याही या उपकरणाच्या ॲडव्हान्स वर्जनचा इथे वापर करण्यात आलेला आहे.

या शस्त्रक्रियेत डॉ. विलास मगरकर यांना डॉ. प्रवीर लाठी, डॉ. रोहित वळसे, डॉ. देवेंद्र बोरगावकर, डॉ. मुनीर अहमद व भूलतज्ञ डॉ. सुजित खाडे यांनी मोलाचे सहकार्य केले.सर्वच कॅथलॅब व सीसीयूच्या टीमने रुग्णाची पाच दिवसात दवाखान्यातील वास्तव्या दरम्यान व्यवस्थित काळजी घेतली. टीम वर्क मुळे सदर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया सुलभ पद्धतीने पार करणे शक्य झाले असे डॉ. मगरकर यांनी सांगितले.

या अद्वितीय कार्याबद्दल सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलचे विश्वस्त माननीय राजकुमार धूत, प्रशासक डॉ. हिमांशू गुप्ता व फायनान्स हेड सुशील मंत्री यांनी सर्व कार्डिऑलॉजी विभागाच्या डॉक्टरचे व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सेठ नंदलाल हॉस्पिटलने प्राप्त केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी औरंगाबाद येथील वैद्यकीय क्षेत्रातून कौतुक होत आहे तसेच समाजातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित मंडळी कडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, नागपूरच्या राख्या जाणार सीमेवर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** रक्षाबंधन म्हणजे बहिणभावांच्या प्रेमाचा, विश्वासाचा रेशीमधागा हाच रेशीमधागा सिमेवरील बांधवांच्या हाताला जर बांधला जात असेल तर या रेशीमधाग्याची किंमत कशातच मोजता येणार नाही आणि या सणाचा आनंदही द्विगुणित होईल. सिमेवरील जवान हे सुद्धा आमचं रक्षण करण्यासाठीच आपल्या कुटुंबियांपासून दुर सिमेवर उभे असतात. बहीणभावाच्या प्रेमाच्या या आनंदाच्या सणात सिमेवरील आपल्या बांधवांना आम्ही तुमच्या सोबत आहोत हा संदेश, हे प्रेम त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा एक अभिनव उपक्रम महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, नागपूरद्वारे करण्यात आला.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था नागपूर प्रकल्प अंतर्गत सुरु असलेल्या MKSSS VOCATIONAL TRAINING इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थीनी द्वारे भारतीय सैन्य दलातील सैनिकांकरिता राखी पौर्णिमेच्या निमित्त विविध प्रकारातील (1000) राख्या तयार करण्यात आल्या असून त्या सर्व राख्या नागपूर प्रकल्प च्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. सुरेखा सराफ, हेमंत अंबासेलकर, श्रीकांत गाडगे यांच्या पुढाकाराने प्रहार संस्थेच्या कर्नल देशपांडे यांच्या माध्यमातून देशाच्या सीमेवर तैनात वीर सैनिकांना पाठविण्यात आल्या. या सर्व राख्या 'मेरा भाई देश का सिपाही " या संकल्पनेतून VOCATIONAL TRAINING INSTITUTE च्या प्रमुख अश्विनी बुजोणे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आल्या आहेत. या राख्या तयार करण्यासाठी व उपक्रमाच्या यशस्वीतेकरीता VOCATIONAL TRAINING CENTER नागपुर च्या सर्व विद्यार्थिनिं, तसेच श्वेता विघ्ने, मेघा ठाकुर व आनंद काळे, प्रवीण गेडाम, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांचे सहकार्य लाभले. अतिशय साध्या पद्धतीने संस्था पातळीवर आयोजित करण्यात आलेल्या या हृदयस्पर्शी कार्यक्रमात संस्थेच्या विद्यार्थिनींनी तसेच प्राध्यापकवृंद तथा कर्मचारीवृंदांनी अथक परिश्रम घेतले.



# आगाखान एजन्सी फॉर हॅब्हिटेड इंडियाकडून चौदा हजार झाडांचे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**ढाकेफळ :** आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया आणि जिल्हा परिषद आरोग्य विभाग औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ढाकेफळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारामध्ये 14 हजार रोपांची लागवड मिया वाकी पद्धतीने करण्यात आली.

मीया वाकी पद्धतीने 80 विविध प्रकारच्या रोपांची लागवड दीड एकर जमिनीत करण्यात आली.

वृक्षारोपणाचे उद्घाटन मेडिकल ऑफिसर डॉक्टर आयशा पटेल मॅडम यांनी केले तर प्रमुख पाहुणे सरपंच भीमराव रामभाऊ मोरे यांनी वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

कार्यक्रमाला गावातील अरुण देविदास कोल्हे अमोल शामराव आव्हाड अनिल दौलतराव जगदाळे व इतर प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी संदीप हानवते अजय शेजुळ शेषराव भवर तसेच कुलकर्णी मॅडम हजर होत्या तुकाराम हायस्कूलचे शिक्षक आरसेवाड सर व सोनटक्के सर शाळेतील नववी व दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी सोबत कार्यक्रमास हजर होते. आगाखान एजन्सी चे राजकुमार तोगरे सर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करत मी यावा की पद्धतीने वृक्षारोपण करण्याचे फायदे वृक्षारोपणाची सध्या असलेली गरज याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आगाखान एजन्सीचे प्रेरणा देशमुख आकाश घुले, धोंडीराम पडूळ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन धोंडीराम पडूळ सर यांनी केले.

# देशासाठी वीर जवानांचे मोलाचे योगदान

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** देशातील सैनिकांना शत्रुंशी दोनहात करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ते सिमेवर असल्याने आपण सूरक्षीत आहोत. स्वातंत्र्य सैनिक, वीर जवान यांचे देशासाठी मोलाचं योगदान आहे, असे प्रतिपादन गट विकास अधिकारी डी. एस. कदम यांनी गुरुवारी (ता.१८)केले आहे.

येथील पंचायत समिती कार्यालयात" माझी माती माझा देश "या उपक्रमाअंतर्गत शिलाफलक अनावरण, वसुधा वंदन व वीर जवानांच्या परिवारातील सदस्यांचा सत्कारासह विविध उपक्रम घेण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्वांतत्र्य सैनिक व शहीद माता पिता यांच्या हस्ते शिलाफलकास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले स्वांतत्र्य सैनिक व शहीद जवानांच्या परिवारातील सदस्यांचा शाल श्रीफळ देवून सन्मानित करण्यात आले. शहीद पिता गणपतराव गौवंदे, स्वांतत्र्य सैनिक गंगाधर गंगाराम कोल्लुरे, कमलबाई गणपतराव जाधव, गणपती मोरोती पाटील, पांडुरंग गंगाराम पाटील, दिगांबर महादू पल्लेवाड, रामराव महादू उटनुरवार, नारायण रामलू बोंनतलवाड, मिलया गंगाराम ईटलावाड, शहीदाची माता आशाबाई गणपतराव गोवंदे,सखुबाई शिवाजी जिल्लेवाड, सरस्वतीबाई राजलींगू गोलीवाड, अरविंद पंडीतराव कल्याणकर, सतीष किन्हाळकर, चिठ्ठे बेंबरकर यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी दीपप्रज्वलन करून पंचप्रण शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमास सतीष किन्हाळकर, बी.आर. पांचाळ, उत्तम बाभळे, शिवाजी गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी गणेश पाटील कापसे बटाळकर, मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बी.आर.पांचाळ, कृषी अधिकारी संदीप कोसकेवाड भिसीकर ,पत्रकार राजेश वाघमारे, ग्रामसेवक संघटनेचे बी.के. पाटील, पत्रकार उत्तम बाभळे ,अनिल शिरसाठ, विस्तार अधिकारी सुर्यकांत कांबळे, पत्रकार जयभीम पाटील, एस. आर. कांबळे, पत्रकार शिवाजी गायकवाड, बालाजी दमकोंडवार, गजेंद्र सादुलवार , शिवाजी मुपडे तोकलवाड विजय, ओमप्रकाश हिंगमिरे , मनोज शिंदे आदीसह ग्रामसेवक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पंचायत समिती कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन अरविंद मुनगे यांनी केले तर आभार बी. के. पाटील यांनी मानले.

# महावितरण उपकेंद्राचा मोबाईल नंबर बंदच!

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील महावितरण कंपनीच्या ऊपकेंद्र (सबस्टेशन )च्या अंतर्गत चारठाणा व परिसरातील अनेक खेडे पाड्याला या उपकेंद्राअंतर्गत विद्युत पुरवठा केला या परीसरातील विद्युत तारांवर कुजक्या झालेली आहेत,तसेच लोखंडी खांब (पोल )कुजके झालेली असुन या तुटक्या मोडक्या तारावर व खांबावर गेले कित्येक वर्ष झालीत की आशीच आलेली वेळ काढू पणा( धकाधकवी )केली जात आहेत या कडे या महावितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दुर्लक्षित पणा करीत आहेत हे दिसून येत आहेत.

या परीसरात जर विद्युत पुरवठा खंडित झाला,कोठे विद्युत तारांवर तुटली ,शॉर्ट सर्किट झाले या घटनेतून मानवी जिवाला धोका निर्माण होऊ शकतो,यावेळेस ही घटना रोखण्यास व संपर्क साधून हा विद्युत पुरवठा खंडित बंद करण्यासाठी महावितरण कंपनीकडून येथील उपकेंद्राला एक मोबाईल फोन यामध्ये७८७५४७४०३४हा नंबर दिलेला परंतु हा मोबाईल नंबर गेल्या काही दिवसांपासून कधी सुरु तर कधी तासनतास बंदच! अवस्थेत आहे,या संदर्भात चौकशी केली येथील उपकेंद्राचे ऑपरेटर्स म्हणतात की मोबाईल फोन खराब झाला यास आम्ही काय करावेत वरिष्ठ अभियंता अधिकारी संपर्क साधून विचारले आसता आम्ही काहीतरी यावर उपाय योजना करीत या सर्व गोष्टींवर महावितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष पणा आहे सिध्द होत आहेत. जर या पावसाळ्यातील दिवसात महावितरण कंपनीच्या गलथान कारभार वेळ काढुपणा व उपकेंद्राचा मोबाईल फोन बंद या सर्व हलगर्जी पणा मुळे चारठाणा व परिसरातील विद्युत ग्राहकांची जिवीत हानी झालीतर या गोष्टींसाठीच जबाबदारी कोणाची आहेआसा प्रश्न ऐरणीवर आहे.जर सा मोबाईल फोन सुरु असेल तर कोठे अनुचित प्रकार घडत असेल तर संपर्क साधून विद्युत पुरवठा बंद करता येईल पण हा मोबाईल फोन गेले कित्येक दिवसांपासून बंदच!च्या अवस्थेत आहे.या कमान कोण ठेवेल असा प्रश्न उपस्थित होत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार संरक्षण कायद्याची होळी

## धर्माबाद तालुका अध्यक्ष लक्ष्मण तुरेराव यांच्या नेतृत्वात तीव्र निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** पत्रकार हा आपला जीव धोक्यात टाकून वार्तांकन करतो तेव्हा त्यांच्यावर प्राणघातक हल्ले होतात पण त्यावर पत्रकार संरक्षण कायदा असुनही त्यांची अंमलबजावणी केली जात नाही त्यामुळे धर्माबाद मराठी पत्रकार संघाचा वतीने दि.१७ ऑगस्ट रोजी शहरातील पानसरे चौकात तीव्र स्वरुपात पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करण्यात आली.

महाराष्ट्रात चार वर्षांपूर्वी म्हणजेच सन २०१९ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्यात आला.पण त्यांची अंमलबजावणी होत नसल्याने कुचकामी ठरली आहे.राज्यात चार वर्षांत २०० पत्रकार वर हल्ले झाले मात्र केवळ ३७ प्रकरणात पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्यात आला पण त्यातील एकाही आरोपीला शिक्षा झाली नाही त्यामुळे पत्रकार संरक्षण कायदा केवळ नावालाच राहिली असल्याने समाजकंठकात पत्रकार कायद्याची भिती उरली नाही. परिणामी पत्रकारवर हल्ले वरचेवर वाढत आहेत.



अलिकडेच पाचोरा येथील पत्रकार संदिप महाजन यास आमदार किशोर पाटील यांनी अश्लील शिवीगाळ करून धमकी दिली. दुसऱ्या दिवशी आपल्या गुंडा मार्फत प्राणघातक हल्ला केला. पण त्याच्यावर पत्रकार संरक्षण कायदा खाली गुन्हा दाखल केला नाही. असेच हल्ले ७५ टक्के राजकीय पक्ष नेता व कार्यकर्त्यांकडुन होतात,अशा वेळी पोलिस प्रशासन पत्रकार संरक्षण कायदा लागू न करता साधी एनसी दाखल करुन फाईल बंद करतात. हे राज्यात वारंवार पत्रकार वर अन्याय होत असल्याने राज्यात दि.१७ ऑगस्ट रोजी संतापुन मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करून तीव्र संताप करण्यात येत असल्याने, त्याअनुषंगाने धर्माबादेत मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक जी.पी. मिसाळे, धर्माबाद तालुका अध्यक्ष लक्ष्मण तुरेराव यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करून तीव्र भावना व्यक्त केल्या. यावेळी इतर पत्रकार संघटनेने याला पाठिंबा दिला. धर्माबादेत एकजुटीने कायद्याची होळी केली, कायद्याची अंमलबजावणी करावी अशा आक्रोश करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार संघाचे सुदर्शन वाघमारे, गणेश वाघमारे,किशन कांबळे, व बहुभाषिक पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष गंगाधर धडेकर,धर्माबाद पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाबुराव पाटील आल्लूरकर, सतीश पाटील शिंदे, शिवराज गाडीवान, भगवान कांबळे, सुधाकर जाधव, सुरेश घाळे, अब्दुल रजाक, गजानन चंदापुरे, महेश जोशी, बाबुराव गोणारकर, नागनाथ माळगे, पंडित जाधव, नारायण सोनटक्के, सिध्देश्वर मठपती, संजय झगडे, किरण गजभारे, धनंजय गायकवाड, गजानन कुलकर्णी, शेख मुबशीर, लालाजी ईमनेलु आदी पत्रकार उपस्थित होते. यावेळी तहसीलदार, पोलिस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठविण्यात आले.



# स्व. किसनराव सदार विद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जल्लोषात

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील खडकी ( सदार )येथील स्व. किसनराव सदार विद्यालयात स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जल्लोषत साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष सौ स्वाती ज्ञानेश्वर सदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सांगता दिनांक ३० ऑगस्ट रोजी होत आहे. त्या अनुषंगाने ' मेरी मिट्टी मेरा देश ' या शासकीय उपक्रमांतर्गत स्व. किसनराव सदार विद्यालयात देशभक्तीपर कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरे करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने देशातील विविधतेतून एकता दर्शविणारे वेशभूषेतील विद्यार्थी कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. तर काही विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. यानिमित्ताने संस्थेच्या भव्य प्रांगणात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थितांनी ' पंचप्रण शपथ ' ग्रहण केली. तसेच बाल विवाहविरुद्ध लढण्याची प्रतिज्ञा घेतली. दरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पुणे येथील डीएसपी अकॅडमीचे डॉ. ज्ञानेश्वर सदार यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष संजय सदार, सचिव संदीप सदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री जाधव सर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यासह सौ. स्वाती मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री फुफाटे सर यांनी केले, तर आभार श्री वाठोरे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे शिक्षक सर्वश्री प्रवीण बकाल, माधव खडसे, श्री वायाळ व शिक्षकेतर कर्मचारी मार्कड कोरडे यांनी परिश्रम घेतले.

# जनार्दन भापकर यांची साहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** हसनाबाद पोलीस ठाणे अंतर्गत राजूर पोलीस चौकी येथे कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी जनार्धन अंबादास भापकर यांची राज्य शासनाच्या गृह विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार व जालना जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांच्या आदेशानुसार जनार्धन भापकर यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे.हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे यांच्या हस्ते स्टार हे पदोन्नती चिन्ह लावून भापकर यांचे अभिनंदन करण्यात आले.

जनार्धन भापकर यांनी पोलीस दलामध्ये तीस वर्षाची सेवा पूर्ण केली असून त्यांनी जालना, भोकरदन, टेंभुर्णी या ठिकाणी कर्तव्य पार पाडले आहे. सध्या ते हसनाबाद पोलीस ठाण्यांतर्गत राजूर पोलीस चौकी येथे कार्यरत आहेत.

भापकर यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल हसनाबद पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी ग्रेड पीएसआय शिवाजी देशमुख, राजू वाघमारे, हेड कॉन्स्टेबल नरहरी खार्डे, राहुल भागिले, राजेंद्र पवार आदींनी अभिनंदन केले आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर